
मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।

# अर्थसंवाद

भारतीय सौर पौष - फाल्गुन, 1925

जानेवारी-मार्च, 2004 / खंड 27, अंक 4

- महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचे राजकीय अर्थशास्त्र
- अर्थशास्त्राने हायजॅक केलेला 'विकास'
- राजर्षी शाहू प्रेरित कामगार संघटनेची चळवळ
- जागतिकीकरण : एक पुनरीक्षण
- वरकड मूल्यांचा विनियोग आणि कामगार वर्ग
- महाराष्ट्राची अर्थव्यवस्था - बदलती संरचना व नवे प्रवाह
- सत्ताविसावे आणि अठ्ठाविसावे वार्षिक आधिवेशन
- कृष्ण राज / पॉल स्विझी



लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिद्धये।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः ॥

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

जानेवारी - मार्च, 2004/ खंड 27, अंक 4

**प्रमुख संपादक**
विनायक श्रीधर देशपांडे

**सहायक संपादक**
रवीन्द्र शंकर जोशी

**सल्लागार मंडळ**
(2003-06)
कमलाकर हणवंते
रामकृष्ण सोळुंके
आशुतोष राराविकर
वंदना दांडेकर

**संपादकीय पत्रव्यवहार**
विनायक श्रीधर देशपांडे
'श्रीकमल', 48 विद्या-विहार
प्रतापनगर, नागपूर 440022
दूरध्वनी क्र.(95712) 2237042

## अनुक्रमणिका

- महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचे राजकीय अर्थशास्त्र
  सूर्यकांत जगदाळे..............................299
- अर्थशास्त्राने हायजॅक केलेला 'विकास'
  दिलीप कुलकर्णी..............................315
- राजर्षी शाहू प्रेरित कामगार संघटनेची चळवळ : एक सैध्दांतिक आढावा
  श्रीनिवास जाधव..............................322
- जागतिकीकरण : एक पुनरीक्षण
  शि. ना. माने..............................329
- वरकड मूल्यांचा विनियोग आणि कामगार वर्ग
  वसुधा जोशी..............................335
- महाराष्ट्राची अर्थव्यवस्था - बदलती संरचना व नवे प्रवाह
  अ. रा. पडोशी..............................339
- सत्ताविसावे वार्षिक अधिवेशन : अहवाल
  अंजली कुलकर्णी, विनायक देशपांडे / वसंत जुगळे. रवीन्द्र दोशी / विनायक देशपांडे / सर्जेराव टोंवरे ......346
- अठ्ठाविसावे वार्षिक अधिवेशन : विषयांची रूपरेषा
  बी. बी. कवडे / अंजली कुलकर्णी / व्ही.बी.घुगे.......374
- कृष्ण राज / पॉल मार्लर स्विझी (श्रद्धांजली)
  विनायक देशपांडे..............................387

मराठी अर्थशास्त्र परिषद

कार्यकारी मंडळ (2003-04)

..............................

- अध्यक्ष
**सूर्यकांत जगदाळे**

..............................

- कार्याध्यक्ष
**ज.फा. पाटील**

..............................

- कार्यवाह खजिनदार
**सर्जेराव ठोंबरे**

..............................

- प्रमुख संपादक 'अर्थसंवाद'
**विनायक श्रीधर देशपांडे**

..............................

- सदस्य

**दिलीप कदम**
**जनार्दन जाधव**
**कांतीलाल ठक्कर**
**चारुदत्त गोखले**
**विजय कांत**
**कुंदा दामले**
**रवींद्र जोशी**
**राम देशमुख**
**दिनकर टकले**
**अमृत पोळ**
**प्र.ब. कुलकर्णी**
**बा. भा. पावडे**

..............................

- अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार :
1) पश्चिम विभागीय केंद्र, भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, मुंबई
2) महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई
(टिप : म. रा. सा.सं. मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असतीलच असे नाही.)

- कार्यालयीन पत्रव्यवहार

..............................

(वर्गणी पाठविणे, सदस्यत्वाची नोंदणी करणे, अर्थसंवाद वितरणाविषयी पत्रव्यवहार, इत्यादी.)

**डॉ.सर्जेराव ठोंबरे**
कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा समन्वयक, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र, विवेकानंद महाविद्यालय, समर्थ नगर, औरंगाबाद-431001
(दूरध्वनी : 95240-2380702)

..............................

- परिषदेचे प्रमुख कार्यालय
मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेंज, एम.एन.रॉय ह्यूमन डेव्हलपमेंट कँपस, फ्लॅट क्रमांक 6 'एफ ब्लाक' कार्डीनल ग्रेशियस स्कूल जवळ, सरकारी वसाहत इमारत क्र. 323 समोर, बांद्रे(पूर्व), मुंबई 400051

..............................

## वर्गणी

**अ) परिषदेचे सदस्य**

| | |
|---|---|
| **1) आजीव सदस्य** | **: रु. 1200 (एकरकमी)** |
| **2) साधारण सदस्य** | **: रु. 150 (वार्षिक)** |
| **3) संस्था सदस्य :** | |
| **शैक्षणिक संस्था** | **: रु. 150 (वार्षिक)** |
| **व्यवसायिक संस्था** | **: रु. 200 (वार्षिक)** |

**(परिषदेच्या सदस्यांना अर्थसंवाद त्यांच्या वर्गणीतच दिला जातो.)**

**आ) अर्थसंवाद वर्गणीदार**

| | |
|---|---|
| **ग्रंथालये** | **: रु. 150 (वार्षिक)** |
| **इ) वर्षगणना** | **: 1 एप्रिल ते 31 मार्च** |

..............................

कृपया वर्गणी मनीऑर्डर वा डिमांड ड्राफ्ट ने 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने कार्यवाहांकडे पाठवावी.

# महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचे राजकीय अर्थशास्त्र

● सूर्यकांत जगदाळे, वाशी
*प्राचार्य, कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय, वाशी, जि. उस्मानाबाद*

***सोनोपंत दांडेकर कला, व्ही. एस. आपटे वाणिज्य व एम.एच. मेहता विज्ञान महाविद्यालय, पालघर जि. ठाणे येथे संपन्न झालेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या 27व्या वार्षिक अधिवेशनात दि. 23 नोव्हेंबर, 2003 रोजी केलेले अध्यक्षीय भाषण.***

**प्रस्तावना**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या 27व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षपदी बहुमताने माझी निवड करून परिषदेने माझा जो सन्मान केला त्याबद्दल मी आपणा सर्वांचाच अत्यंत ऋणी आहे.

गेली सव्वीस वर्षे मराठी अर्थशास्त्र परिषद सातत्याने अर्थशास्त्रीय प्रश्नांची व्यावहारिक आणि सैद्धांतिक प्रश्नांची चर्चा करीत आहे. अनेक अडचणींवर मात करुन परिषदेने आपली प्रगती धडाडीने चालू ठेवली आहे. या सर्व प्रगतीमध्ये विविध संस्था आणि व्यक्तींचा सक्रिय सहभाग लाभलेला आहे. 'अर्थसंवाद' या परिषदेच्या मुखपत्राचाही या प्रगतीत मोलाचा वाटा आहे. या सर्वांप्रती ऋण व्यक्त करणे आवश्यक आहे.

15 ऑगस्ट 1947 रोजी भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले आणि त्यानंतर भाषावार प्रांतरचनेच्या धोरणातून 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. महाराष्ट्र राज्य अस्तित्वात येऊन 43 वर्षे झालेली आहेत. या 43 वर्षांमध्ये महाराष्ट्राने कृषीक्षेत्र, सहकार, औद्योगिक क्षेत्र, सेवा क्षेत्र इ. सर्वच क्षेत्रात लक्षणीय प्रगती साध्य केलेली आहे. या प्रगतीमध्ये आणि प्रगतीच्या वेगात राज्याने स्वीकारलेली आर्थिक नीति किंवा राजकीय अर्थशास्त्र हे महत्त्वाची भूमिका बजावत असते. या राजकीय अर्थशास्त्राने प्रगतीचे अनेक टप्पे पार केले आहेत. परंतु या प्रगतीचा लाभ सामान्य लोकापर्यंत पोहचला का? हा खरा संशोधनाचा भाग आहे. आर्थिक विकासाचे राजकीय धोरण स्वीकारतांना त्यामध्ये बहुसंख्यांकांचे हित हा मूलभूत मुद्दा गृहित धरुन धोरणे व भूमिका स्वीकारल्या जातात. यामुळे या सर्वच बाबतीत राजकीय अर्थशास्त्राची भूमिका महत्त्वपूर्ण ठरत असते.

1980च्या दशकापर्यंत राजकीय अर्थशास्त्राने राज्याच्या आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका पार पाडलेली दिसते. परंतु 1980 च्या दशकानंतर अर्थशास्त्रापेक्षा राजकारणाचे अर्थशास्त्र प्रभावी ठरत असल्याचे दिसून येते. राजकीय अर्थशास्त्र हे लोकांच्या कल्याणासाठी असते तर राजकारणाचे अर्थशास्त्र हे पक्षासाठी व राज्यसत्ता प्राप्त करण्यासाठी उपयोगात आणले जाते.

राजकारणाच्या अर्थशास्त्रात लोकहित, जनकल्याण दुय्यम मानले जाते व पक्ष बळकटी व सत्ता प्राप्ती या हेतूंना प्राधान्य दिले जाते. हे सर्व विस्ताराने पाहण्यासाठी गेली 43 वर्षे महाराष्ट्राच्या राजकारणाची व अर्थकारणाची झालेली वाटचाल पाहणे आवश्यक ठरते. पुलोदची दोन वर्षे व युतीची चार वर्षे वगळता सुमारे 37 वर्षे काँग्रेस या पक्षाचीच सत्ता राज्यात प्रभावी होती.

काँग्रेस पक्षाने उद्योगपती व व्यापारी यांना सुरक्षिततेची हमी दिली व त्याचबरोबर ग्रामीण विकासावर भर देऊन व कृषी उद्योगांना प्रोत्साहन देऊन शेतकी हितसंबंधही सुरक्षित राहतील याचीही हमी घेतली. नंतर वसंतराव नाईकांच्या कारकिर्दीत ऊस व कापूस इ. नगदी पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांचे हित तर जपलेच पण त्याचबरोबर उद्योग क्षेत्राचे हित जपण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. तसेच सहकारी चळवळीत साखर कारखानदारी शिवाय दुग्धोत्पादनापासून पत पुरवठ्यापर्यंतची यंत्रणा उभी केली.

1977 नंतरचा कालखंड हा महाराष्ट्राच्या राजकीय जीवनाला कलाटणी देणारा कालखंड ठरतो. कारण याच कालखंडात दलित पँथर, युवक क्रांती दल, शिवसेना व शेतकरी संघटना या सारख्या चळवळींचा उदय झाला.

काँग्रेसने कृषी व सहकार क्षेत्रात मोठी प्रगती साध्य केली. सहकारी चळवळीतून ग्रामीण नेतृत्व पुढे आणले व साखर कारखानदारीला गती देऊन उसाचे राजकारणावरील प्रभुत्व वाढविले. 'शुगर लॉबी', राज्याच्या राजकारणात प्रभावी झाली.अनेक वर्षे या शुगर लॉबीचेच वर्चस्व राज्याच्या राजकारणावर व अर्थकारणावर राहिले. या अर्थकारणाने ग्रामीण भागात मोठे शेतकरी व ऊस बागायतदार यांना खूप मोठा फायदा झाला. परंतु साखर कारखानदारी आपल्या काबाडकष्टाने विकसित करणारा शेतमजुर व ऊसतोड कामगार वर्ग हा मात्र या लाभांपासून वंचित राहिला. साखर व उसाच्या अर्थकारणातून राजकारणावर प्रभाव टाकून सत्ताप्राप्ती करण्याचाच हा कालखंड होता. त्यानंतर मात्र विशेषत: आघाडी सरकारांच्या उदयानंतर साखर सम्राटांचा राजकारणातला व अर्थकारणातला प्रभाव कमी कमी होत गेला. या सर्वांचे विवेचन करण्यासाठी महाराष्ट्र स्थापनेची पूर्वपीठिका बघावी लागेल.

महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची होती. या संयुक्त महाराष्ट्र चळवळीत विरोधक(काँग्रेस व इतर पक्ष) प्रभावी होते. त्यांनी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्यामध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे.महाराष्ट्र राज्य स्थापनेपूर्वी काँग्रेस हाच प्रमुख राजकीय पक्ष होता. काही शहरांमधून समाजवादी पक्षाचे अस्तित्व होते. तर भारतीय जनसंघाला अगदी मर्यादित पाठबळ होते. 1957 साली रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाली होती. तसेच मार्क्सवादी विचारांच्या प्रभावाखाली असणाऱ्या काही लोकांनी एकत्रित येऊन शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली.

विदर्भाचा काही भाग मध्यप्रदेशात तर मराठवाडा विभाग हैद्राबाद संस्थानात होता. या सर्व मराठी भाषिक प्रदेशांचे मिळून एक राज्य व्हावे यासाठी 1947 नंतर दीर्घकाळ लढा झाला. 1956 साली कन्नड भाषिक प्रदेश कर्नाटकात गेला व सर्व मराठी भाषिक प्रदेश व गुजराथी भाषिक प्रदेश हे एकाच राज्यात ठेवण्यात आले. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी सर्व पक्षीय चळवळ झाली. 1957च्या निवडणुकीत बिगर काँग्रेस पक्ष आणि आंदोलनकर्ते यांची संयुक्त महाराष्ट्र समिती काँग्रेसच्या विरोधात लढली.[1]

या चळवळीमुळे अनेक भिन्न-भिन्न संस्कृतीचे लोक एकत्र आले, अनेक विभाग (पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, कोकण, खानदेश इ.) एकत्र आले. सांस्कृतिक दृष्ट्या राज्यात एकत्रीकरण घडून आले.परंतु या एकत्रीकरणाच्या प्रक्रियेत आर्थिक दृष्ट्या एकत्रीकरणाचा फारसा विचार झालेला नाही. कारण या सर्व प्रक्रियांमध्ये प. महाराष्ट्र हा तौलनिक दृष्ट्या अधिक उद्योग प्रधान बनला तर विदर्भ, मराठवाडा व खानदेश हे विभाग शेती प्रधानच राहिले. त्यामुळे स्वाभाविकच: राज्याच्या राजकरणावर व अर्थकारणावर प. महाराष्ट्राचे वर्चस्व सतत राहिले. त्यातून विभागीय विकासाची मागणी पुढे येत गेली. सत्यशोधन समिती, वैधानिक विकास मंडळे, स्वतंत्र विदर्भाची मागणी ही त्याचीच परिणती आहे. विकासाचा फार मोठा हिस्सा प. महाराष्ट्राने घेतला तर विदर्भ, मराठवाडा, खानदेश व कोकणाच्या विकासाकडे मात्र म्हणावे तेवढेसे लक्ष दिले गेले नाही. म्हणून प्रत्येक विभागाला स्वतंत्रपणे आपला विकास साधण्याची संधी द्यावी ही मागणी मूळ धरु लागली. विभाग हा विकास आंदोलनाचा घटक झाला. मराठवाडा हा एकमेव विभाग आहे की ज्याने विकास आंदोलन छेडले.

**महाराष्ट्राची लोकसंख्या व साक्षरता**

लोकसंख्येच्या प्रमाणात होणारे स्थित्यंतर हे विकास प्रक्रियेतील महत्त्वाचे गमक असते. 1961 ला राज्याची लोकसंख्या सुमारे 4 कोटी होती. ती केवळ 40 वर्षात अडीच पटीने म्हणजे जवळपास 10 कोटीपर्यंत वाढली. लोकसंख्येतील ही वाढ मृत्युदरातील घटीमुळे व तसेच वेळोवेळी पर राज्यातून महाराष्ट्रात विशेषतः मुंबईत होत असणारे स्थलांतर यामुळे झालेली आहे. नागरी लोकसंख्येतील होणारी वाढ हेही विकासाचे एक गमक असते. राज्यात गेल्या 40 वर्षात नागरी लोकसंख्येचे प्रमाण 28% वरुन 42.4% पर्यंत वाढले. त्यामुळे प्रदूषण, राहण्याच्या जागेचा प्रश्न, सर्वत्र होणारी गर्दी व सुविधांवर पडणारा अतिरिक्त ताण इ. प्रश्नही निर्माण झाले

**तक्ता क्रमांक 1**
**महाराष्ट्राची लोकसंख्या व साक्षरता**

| | 1961 | 1971 | 1981 | 1991 | 2001 |
|---|---|---|---|---|---|
| लोकसंख्या (कोटी) | 3.96 | 5.04 | 6.28 | 7.89 | 9.67 |
| दशवार्षिक दर | 23.6 | 27.45 | 24.54 | 25.73 | 25.57 |
| नागरी लोकसंख्या (शे.प्र.) | 28.2 | 31.2 | 35.0 | 38.7 | 42.4 |
| साक्षरता (एकूण) | 35.1 | 45.8 | 57.1 | 64.9 | 77.3 |
| पुरुष | 42.0 | 51.0 | 69.7 | 76.6 | 86.3 |
| स्त्रिया | 16.8 | 26.4 | 41.0 | 52.3 | 67.5 |
| 1000 पुरुषांच्या प्रमाणात स्त्रिया | 936 | 930 | 937 | 934 | 922 |

स्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी - 2002

आहेत. लोकसंख्येतील संख्यात्मक बदला एवढेच किंबहुना त्याहीपेक्षा अधिक महत्त्वाचे बदल हे गुणात्मक स्वरुपाचे मानले जातात. साक्षरतेच्या प्रमाणात होणाऱ्या वाढीवरुन हे गुणात्मक बदल दर्शविता येतात. राज्यात गेल्या 40 वर्षात साक्षरतेचे प्रमाण 35.1 टक्क्यां वरुन 77.3 टक्क्यां पर्यंत वाढले. परंतु एकूण साक्षरतेत स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण पुरुषांच्या साक्षरतेच्या तुलनेत अद्यापही कमीच आहे. वस्तुतः स्त्रियांच्या साक्षरतेतील वाढ ही लोकसंख्या वाढीस आळा घालण्यासाठी, कुटूंबाचे जीवनमान उंचावण्यासाठी व त्यास निरोगी व आरोग्यदायक ठेवण्यासाठी महत्त्वाची ठरते. साक्षरता व इतर घटकांतून मानवी विकासाच्या संधी प्राप्त होतात. म्हणून मनुष्यबळाच्या विकासाच्या विकास प्रक्रियेत साक्षरतेतील वाढ हा घटक महत्त्वाचा असतो.

**महाराष्ट्रातील उत्पादन स्थिती**

महाराष्ट्र राज्यात 1960-70 या दशकात उत्पन्न वाढीचा वेग दर साल 2.5% होतो. तो वाढत जाऊन 1990-2000 या दशकातील वेग दर साल 6.2% इतका झाला आहे. उत्पन्नातील वाढीबरोबर दरडोई उत्पन्नातही वाढ होत असून महाराष्ट्रातील दरडोई उत्पन्न अखिल भारतीय सरासरीपेक्षा जास्त आहे. दरडोई उत्पन्नाच्या संदर्भात महाराष्ट्र सध्या तिसऱ्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्र राज्यातील क्षेत्र निहाय उत्पन्न स्थितीत कालौघात बदल झालेले दिसून येतात. 1960-61 मध्ये एकूण उत्पन्नातील प्राथमिक क्षेत्राचे प्रमाण 42.2%, 1970-71 मध्ये 29.9 %, 1980-91 मध्ये 27.7 %, 1990-91 मध्ये 2.9 % तर 2000-01 मध्ये 17.4 % असे क्रमशः कमी होत गेले आहे.

दुसऱ्या बाजूस द्वितीयक क्षेत्र 1960-61 मध्ये 26.1 % वरुन 2000-01 मध्ये 32.2 % इतके अधिक उत्पन्न देणारे ठरले आहे. आर्थिक विकासाच्या सिद्धान्तानुसार, विकास प्रक्रियेत प्राथमिक क्षेत्राचे असलेले सापेक्ष महत्त्व क्रमशः कमी होत जाते तर द्वितीयक क्षेत्र आणि तृतीयक क्षेत्राचे राज्य उत्पन्नातील प्रमाण वाढत जाते. त्याप्रमाणेच महाराष्ट्रातील तृतीयक क्षेत्राचे 1960-61 मध्ये असलेले 31.7 % क्रमशः वाढत जाऊन 2000-01 मध्ये 50.4 % इतके झाले आहे.

प्राथमिक क्षेत्रात शेती हा घटक महत्वाचा आहे. शेतीतून मिळणारे 1960-61 मधील उत्पन्नाचे प्रमाण 36.2 %होते. ते कालौघात कमी होऊन 2000-01 मध्ये 15.5 % झाल्याचे स्पष्ट होते. द्वितीयक क्षेत्रात वस्तू निर्माण व बांधकाम हे घटक महत्त्वाचे असून यांचा द्वितीयक क्षेत्रातील वाटा जवळपास 30 प्रतिशत राहिला आहे असे दिसून येते. वस्तूनिर्माणा क्षेत्राचे असलेले सापेक्ष महत्त्व वाढत गेले तर बांधकाम उपक्षेत्राचे असलेले प्रमाण मात्र कालौघात कमी झाले आहे. तृतीयक क्षेत्रातील महत्त्वाचे घटक म्हणजे परिवहन, बँक व विमा, व्यापार व सार्वजनिक प्रशासन हे आहेत. यामध्ये बँक व विमा आणि व्यापार-उपहार गृहे या बाबींचे सापेक्ष महत्त्व अधिक असल्याचे दिसून येते. तृतीयक क्षेत्रात 2000-01 मध्ये बँक व विमा या आधारे मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाण 10 % तर व्यापार व उपहार गृहे या आधारे मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाण 13.9 % असल्याचे आढळून येते. सध्या महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक क्षेत्राचा सापेक्ष हिस्सा भारताच्या तुलनेत फारच कमी आहे तर द्वितीयक आणि तृतीयक क्षेत्राचा सापेक्ष हिस्सा अधिक आहे. याबाबतीत महाराष्ट्र राज्य इतर राज्यांचा तुलनेत प्रगत आहे ही समाधानाची बाब आहे.

**महाराष्ट्र राज्याची वित्तीय स्थिती**

राज्यातील वित्तीय स्थितीत कोणत्या प्रकारची स्थित्यंतरे घडून आली याचा थोडक्यात

**तक्ता क्रमांक 2**

**महाराष्ट्रातील उत्पादन स्थिती**

| | 1960-61 | 1970-71 | 1980-81 | 1990-91 | 2000-01 |
|---|---|---|---|---|---|
| नक्त राज्य उत्पन्न | 1706 | 4298 | 15163 | 58137 | 213040 |
| (चालू किमती कोटी रु.) | | | | | |
| चक्रवाढ दर | - | (2.5) | (4.0) | (5.8) | (6.2) |
| प्राथमिक क्षेत्र(%) | 42.2 | 29.9 | 27.7 | 22.9 | 17.4 |
| (पैकी शेती) | (36.2) | (24.4) | (23.6) | (19.6) | (15.5) |
| द्वितीयक क्षेत्र (%) | 26.1 | 31.7 | 32.6 | 32.9 | 32.2 |
| (पैकी वस्तुनिर्माण) | (16.9) | (20.9) | (23.9) | (24.9) | (24.6) |
| (पैकी बांधकाम) | (8.7) | (9.5) | (7.3) | (5.9) | (5.3) |
| तृतीयक क्षेत्र (%) | 31.7 | 38.4 | 39.7 | 44.2 | 50.4 |
| पैकी (परिवहन, दळणवळण) | (3.8) | (5.9) | (6.4) | (7.1) | (9.9) |
| (बँक, विमा) | (2.7) | (4.2) | (4.5) | (7.8) | (10.0) |
| (व्यापार, उपहार गृहे) | (12.3) | (11.6) | (12.8) | (13.4) | (13.9) |
| सार्वजनिक प्रशासन | (1.0) | (2.1) | (3.2) | (3.5) | (4.3) |

संदर्भ - मानवी विकास अहवाल - 2002

कंसातील आकडे वास्तविक उत्पन्नातील वाढीचा चक्रवाढ दर दर्शवितात.

1990-91 पर्यंतची माहिती एम.ई.डी.सी (2000) वरुन घेतली आहे.

आढावा घेण्याचा प्रयत्न पुढील भागात केला आहे. वित्तीय स्थिती समजावून घेण्यासाठी विकास खर्च, विकासेतर खर्च, महसुली खर्च, भांडवली खर्च या बाबींसोबत महसुली उत्पन्न, भांडवलीजमा तसेच महसुली तूट व वित्तीय तूट या बाबी लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते.

### उत्पन्न स्थिती

1960-61 साली महाराष्ट्रातील महसुली उत्पन्न 117.46 कोटी रुपये व भांडवली जमा 99.97 कोटी रुपये म्हणजे एकंदर जमा 207.43 कोटी रुपये असल्याचे दिसते. यात महसुली उत्पन्न एकूण उत्पन्नाच्या 56.62 % तर भांडवली जमा 43.38 % असल्याचे स्पष्ट होते. पहिल्या दशकात महसुली व भांडवली जमेत सारखीच म्हणजे जवळपास चार पट वाढ झाली. 1970-71 मध्ये महसूली उत्पन्न एकूण उत्पन्नाच्या 57.07 % आणि भांडवली जमा 42.93 % राहिले. याचा अर्थ महसुली उत्पन्न व भांडवली जमा यांचे तौलनिक महत्त्व सारखेच राहिले. परंतु या प्रमाणात 1980-81 मध्ये लक्षणीय बदल झाल्याचे स्पष्ट होते. यामागील महत्त्वाचे कारण म्हणजे राज्याचा कर महसूल

साडेचार पट झाला, केंद्रीय करातील वाढ 3.3 पट झाली आणि कराव्यतिरिक्त उत्पन्न 4.5 पट झाले. दुसऱ्या बाजूस राज्य शासनाचे ऋण निम्यावर आले. एकूण उत्पन्नाशी महसुली उत्पन्नाचे प्रमाण 67.07 % तर भांडवली जमेचे प्रमाण 32.94 % राहिले. याचा अर्थ असा की या कालावधीत महसुली उत्पन्नाचे एकूण उत्पन्नातील सापेक्ष महत्व वाढले. 1990-91 मध्ये महसुली उत्पन्न एकूण उत्पन्नाच्या 79.08 % तर भांडवली जमा 20.92 % होती. याच कालावधीत एकूण उत्पन्नातील वाढ जवळपास 3.61 पट होती. 2000-01 मधील महसुली उत्पन्नाचे एकूण उत्पन्नाशी असलेले प्रमाण 61.17 % तर भांडवली जमेचे प्रमाण 38.83 % राहीले आहे. या कालावधीत महसुली उत्पन्नाचे प्रमाण कमी झाले तर भांडवली जमेचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते. तसेच एकूण उत्पन्नात 4.43 पट वाढ झाली आहे. 2000-01 साली महसुली उत्पन्न 29567 कोटी रुपये व भांडवली जमा 22147 कोटी रुपये आणि एकंदर जमा 48831 कोटी रुपये इतकी होती. महसुली उत्पन्नाचे एकूण उत्पन्नातील असलेले सापेक्ष महत्त्व पुन्हा वाढले व भांडवली जमेचे महत्त्व कमी झाले. या बदलासाठी एका बाजूस राज्यातील करात व करेतर उत्पन्नात झालेली लक्षणीय स्वरुपातील वाढ तर दुसऱ्या बाजूस राज्य सरकारचे कर्ज, केंद्राकडून राज्याने घेतलेल्या कर्जात आणि राज्याच्या इतर उत्पन्नात झालेली वाढ कारणीभूत असल्याचे दिसून येते. महसुली उत्पन्न, भांडवली जमा व एकंदर उत्पन्नातील वाढ अधिक असण्यामागील महत्त्वाची बाब म्हणजे ही आकडेवारी चालू किंमतीनुसार आहे.

**खर्च स्थिती**

वित्तीय स्थितीतील दुसरी महत्त्वाची बाब खर्चाची आहे. राज्याचा असलेला खर्च हा विकास खर्च आणि विकासेतर खर्च असा विभागला जातो. विकासेतर खर्च कमी ठेवून विकास खर्च अधिक ठेवता आला तर शासन कार्यक्षम असल्याचे ध्वनित होते. या दृष्टीने पाहता 1960-61 मधील अपवाद वगळता सातत्याने महाराष्ट्रातील विकास खर्चाचे प्रमाण अधिक राहिल्याचे मान्य करावे लागते. विकास खर्चामध्ये सामाजिक सेवा, आर्थिक सेवा व स्थानिक संस्थांना दिली जाणारी अनुदाने अंतर्भूत होतात. यामध्ये सामाजिक सेवांवर केला जाणारा खर्च तुलनात्मकरित्या अलीकडील कालावधीत अधिक राहीला आहे. 1970-71 मध्ये सामाजिक सेवेवरील एकूण विकास खर्चातील प्रमाण जवळपास 50 %, 1980-81 मध्ये 47 %, 1090-91 मध्ये 54 % तर 2000-01 मध्ये 63 % राहिले आहे. आर्थिक सेवांवर केला गेलेला खर्चही कालौघात वाढला असल्याचे दिसते. स्थानिक संस्थांना दिल्या गेलेल्या अनुदानात 1990-91 च्या तुलनेत 2000-01 मध्ये मोठी वाढ झाल्याचे दिसून येते. 1990-91 पर्यंत स्थानिक संस्थांवर अनुदाना पोटी नाममात्र खर्च केला जात होता. परंतु नंतरच्या कालावधीत या खर्चात वाढ होण्याचे कारण, म्हणजे पंचायत राज संस्थांना दिले जाणारे महत्त्व होय.

महाराष्ट्र राज्यातील विकासेतर खर्च 1960-61 मध्ये 91 कोटी रुपये होता. तो 2000-01 मध्ये 15,132 कोटी रुपयांपर्यंत वाढला आहे. विकासेतर खर्चात सर्वसाधारण सेवा व व्याज देण्यासाठी केलेला खर्च समाविष्ट होतो. सर्वसाधारण सेवेवर केलेल्या खर्चात 2000-01 मधील वाढ 1990-91 च्या तुलनेत जवळपास 4.8 पट आहे. यामागील एक उल्लेखनीय बाब म्हणजे कर्मचाऱ्यांसाठी स्वीकारलेली सुधारित वेतनश्रेणी म्हणता येईल. राज्याचा व्याज देण्यासाठी होणारा खर्चही अलीकडील कालावधीत खूप वाढला आहे याचे कारण म्हणजे राज्य सरकारने घेतलेली विविध स्वरूपातील कर्जे होत. 1960-61 साली केवळ 13.71 कोटी रुपये व्याज प्रदानावर खर्च होत होते ते

**तक्ता क्रमांक 3**

**महाराष्ट्र : वित्तीय स्थिती**

**(कोटी रुपये)**

| तपशील | 1960-61 | 1970-71 | 1980-81 | 1990-91 | 2000-01 |
|---|---|---|---|---|---|
| 1. विकास खर्च | 28.27 | 301 | 1435 | 5616 | 22699 |
| अ) सामाजिक सेवा | - | 155 | 678 | 3024 | 14351 |
| ब) आर्थिक सेवा | - | 145 | 749 | 2560 | 7656 |
| क) स्थानिक संस्थांना अनुदान | 1 | 8 | 32 | 692 | - |
| 2. विकासेतर खर्च | 91.00 | 159 | 482 | 3138 | 15132 |
| अ) सर्वसाधारण सेवा | 77.29 | 85 | 328 | 1944 | 9343 |
| ब) व्याज प्रदान | 13.71 | 74 | 154 | 1194 | 9343 |
| 3. महसुली खर्च (1+2) | 119.27 | 460 | 1917 | 8754 | 37831 |
| 4. विकास खर्च | उ.ना | 152 | 623 | 1678 | 3737 |
| 5. विकासेतर खर्च | उ.ना | 171 | 554 | 341 | 7022 |
| (ऋणाची फेड) | | | | | |
| 6. भांडवली खर्च (4+5) | 66.7 | 323 | 1177 | 2011 | 10759 |
| 7. एकूण खर्च (3+6) | 185.97 | 783 | 3094 | 10773 | 48160 |
| 8. महसुली उत्पन्न | 117.46 | 456 | 2038 | 8699 | 29567 |
| अ)केंद्रीय करातील वाटा | 79.94 | 80 | 336 | 990 | 2781 |
| ब) राज्याचे कर | - | 256 | 1131 | 5120 | 19727 |
| क) कराव्यतिरिक्त उत्पन्न | 37.52 | 120 | 571 | 2589 | 7051 |
| 9. भांडवली जमा | 89.97 | 343 | 1001 | 2300 | 22147 |
| अ) राज्य शासनाचे ऋण | उ.ना. | 178 | 516 | 266 | 7294 |
| ब) केंद्र सरकारकडून कर्ज | उ.ना. | 66 | 312 | 1296 | 5401 |
| क)कर्जाची वसुली | उ.ना. | 19 | 39 | 122 | 2595 |
| ड) इतर (निव्वळ) | उ.ना. | 80 | 134 | 616 | 3974 |
| 10. एकंदर जमा (8+9) | 207.43 | 799 | 3039 | 10999 | 48831 |
| महसुली तूट (8-3) | -1.81 | -4.0 | -176 | -121 | -8264 |
| वित्तीय तूट (8-7) | -68.51 | -327 | -1056 | -2074 | -18593 |

संदर्भ - महाराष्ट्राची आर्थिक पाहणी - 2002

2000-01 मध्ये 5,359 कोटी रुपयांपर्यंत वाढले आहेत. मागील दहा वर्षांच्या कालावधीत यात जवळपास 4.5 पट वाढ झाली आहे. महाराष्ट्र राज्याच्या वित्तीय स्थितीचे एक महत्त्वाचे निर्देशक म्हणजे वित्तीय तूट. महाराष्ट्रातील वित्तीय तूट 1960-61 साली 68.51 कोटी रुपये होती. ती सातत्याने वाढत गेल्याचे आढळते. 1970-71 साली 327 कोटी रुपये, 1980-81 मध्ये 1056 कोटी रुपये, 1990-91 मध्ये 2074 कोटी रुपये आणि 2000-01 साली 18,593 कोटी रुपये वित्तीय तूट राहील्याचे स्पष्ट होते.

**सामाजिक सेवावरील खर्च**

वित्तीय खर्चात विकास खर्च हा महत्त्वाचा मानला जातो. विकास खर्चात सामाजिक सेवा व आर्थिक सेवा यांचा अंतर्भाव केला जातो. सामाजिक सेवांवरील खर्च करतांना शिक्षण, क्रीडा, कला व संस्कृती, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा व जल नि:सारण, गृहनिर्माण, नागरी विकास, अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीय संवर्गातील लोकांचे कल्याण, श्रम आणि श्रमकल्याण, सामाजिक सुरक्षा आणि कल्याण, अन्न आणि पोषक आहार, नैसर्गिक आपत्ती यासारख्या बाबींचा विचार केला जातो. यावरील खर्चाचे वर्गीकरण योजना खर्च व योजना बाह्य खर्च अशा गटात केले जाते. सामाजिक क्षेत्रावरील खर्चाची प्रमुख जबाबदारी राज्यांवर असते.

1985 मध्ये सामाजिक सेवावरील एकूण खर्चापैकी 50.80 % खर्च शिक्षण, क्रीडा, कला व संस्कृती यावर झाला होता. याबाबीवरील एकूण खर्चामध्ये योजनाबाह्य खर्चाचे प्रमाण 96.36 % इतके होते तर उर्वरित हिस्सा हा योजना खर्चाचा होता. 1990-91 मध्ये सामाजिक सेवावरील एकूण खर्चात या बाबीवरील खर्चाचे प्रमाण वाढून 56 % इतके झाले. यात योजनाबाह्य खर्चाचे प्रमाण 97.07 % होते तरयोजना खर्च 2.91 % इतका होता. इ.स. 2000 मध्ये सामाजिक सेवावरील एकूण खर्चाचे प्रमाण 60.48 % इतके झाले. ही वाढ लक्षणीय असल्याचे दिसून येते. यावर्षीही योजनाबाह्य खर्चाचे प्रमाण 95.80 % राहिले.

1985 साली सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण या बाबीस सामाजिक सेवावरील एकूण खर्चामध्ये दुसऱ्या क्रमांकाचे प्राधान्य दिल्याचे आढळते. यावर्षी 30.24 % खर्च या बाबीवर झालेला होता. या बाबीवरील एकूण खर्चातील योजनाबाह्य खर्चाचे प्रमाण 89.13 % इतके होते. 1990 मध्ये सामाजिक सेवावरील एकूण खर्चामधील या बाबीवरील खर्च 15.42 % इतका झाला. योजनाबाह्य खर्चाचे प्रमाण 73.52 % तर योजना खर्चाचे प्रमाण 26.48 % होते. 1995 मध्ये हे प्रमाण 13.55 % तर 2000-01 मध्ये 13.53% इतके झाल्याचे दिसते. याचा अर्थ असा की, कालौघात सामाजिक सेवांवरील खर्चात सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणास कमी महत्त्व देण्यात आले.

सामाजिक सेवांवरील खर्चातील तिसरी महत्त्वाची बाब म्हणजे अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीय जातीचे कल्याण ही होय. 1985 मध्ये सामाजिक सेवांवरील एकूण खर्चापैकी 8.30% इतका खर्च या बाबीवर करण्यात आला होता. 1990 साली या बाबीवरील खर्चाचे प्रमाण 4.49 % पर्यंत कमी झाले तर 2000 मध्ये ते 5.53 इतके राहिले. याबाबीवरील खर्चाचे प्रमाण देखील कालौघात कमी झालेले दिसून येते.

1985 मध्ये सामाजिक सेवांवरील एकूण खर्चापैकी गृहनिर्माणासाठी केलेल्या खर्चाचे प्रमाण 3.33 % तर नागरी विकासावरील खर्चाचे प्रमाण 2.48 % इतके होते. 1990 मध्ये या खर्चाचे प्रमाण

तक्ता क्र. 4

महाराष्ट्रातील सामाजिक सेवांवरील खर्च

(रु. लाखात)

| अ. क्र. | विवरण | 1985 | | | 1990 | | | 1995 | | | 2000 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | योजना | योजना बाह्य | एकूण | योजना | योजना बाह्य | एकूण | योजना | योजना बाह्य | एकूण | योजना | योजना बाह्य | एकूण |
| 1 | शिक्षण, क्रिडा कला व संस्कृती | 2878 (3.64) | 76238 (96.36) | 79116 (50.80) | 5048 (2.91) | 168365 (97.09) | 173413 (56.00) | 19149 (10.68) | 327487 (89.32) | 366636 (55.82) | 28959 (4.30) | 661269 (95.80) | 690228 (60.48) |
| 2 | सार्वजनिक आरोग्यव कुटुंब कल्याण | 5119 (10.87) | 41981 (89.13) | 47100 (30.24) | 12641 (26.48) | 35101 (72.52) | 47742 (15.42) | 27057 (3.41) | 61925 (69.59) | 88982 (13.55) | 45263 (29.31) | 109171 (70.69) | 154434 (13.53) |
| 3 | पाणी पुरवठा व जलनि:सारण | -- | -- | -- | 19191 (92.76) | 1497 (7.24) | 20688 (6.38) | 27562 (83.46) | 5463 (16.54) | 33025 (5.03) | 53671 (63.21) | 12236 (36.79) | 84907 (7.44) |
| 4 | गृहनिर्माण | 981 (18.94) | 4199 (81.06) | 5180 (3.33) | 1123 (11.61) | 8552 (88.39) | 9675 (3.12) | 4917 (27.56) | 12922 (72.44) | 17839 (2.72) | 6551 (25.05) | 19603 (74.95) | 26154 (2.29) |
| 5 | नागरी विकास | 357 (9.25) | 3503 (90.75) | 3860 (2.48) | 395 (36.84) | 5306 (63.16) | 8401 (2.71) | 14577 (59.17) | 10057 (40.83) | 24634 (3.75) | 19073 (58.90) | 13308 (41.10) | 32381 (2.84) |
| 6 | अनु. जाती-जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण | 1906 (14.75) | 11020 (85.25) | 12926 (8.30) | 3711 (26.68) | 10197 (73.32) | 13908 (4.49) | 15820 (42.17) | 21696 (57.83) | 37516 (5.71) | 23136 (36.69) | 39929 (63.31) | 63065 (5.53) |
| 7 | श्रम व श्रम कल्याण | 297 (10.52) | 2527 (89.48) | 2824 (1.81) | 1315 (22.63) | 4497 (77.37) | 5812 (1.88) | 4637 (33.75) | 9103 (66.25) | 13740 (2.09) | 2628 (12.92) | 17706 (87.08) | 2334 (1.78) |
| 8 | सामाजिक सुरक्षा व कल्याण | -- | -- | -- | 1141 (10.97) | 9261 (89.03) | 10402 (3.36) | 1953 (9.25) | 19156 (90.75) | 21109 (3.21) | 1820 (5.35) | 32181 (94.65) | 34001 (2.98) |
| 9 | अन्न व सकस आहार | -- | -- | -- | 2908 (52.38) | 2644 (47.62) | 5552 (1.79) | 4588 (27.05) | 12375 (72.95) | 16983 (2.58) | 20058 (92.02) | 1740 (7.98) | 21798 (1.91) |
| 10 | नैसर्गिक आपत्ती साहाय्य | -- | -- | 2760 (1.77) | -- | -- | 12073 (3.90) | 24116 (71.40) | 9662 (28.60) | 33778 (5.14) | 700 (7.22) | 9000 (92.78) | 9700 (0.85) |
| 11 | इतर | 240 (18.97) | 1025 (81.03) | 1265 (0.81) | 181 (9.04) | 1821 (90.96) | 2002 (0.65) | 136 (5.23) | 2463 (94.77) | 2599 (0.40) | 252 (5.86) | 4050 (94.14) | 4302 (0.38) |
| | एकूण | 11778 (7.61) | 250077 (92.39) | 299978 (100) | 50354 (16.26) | 259314 (83.74) | 309668 (100) | 164512 (25.05) | 492309 (74.95) | 656821 (100) | 202111 (17.71) | 939193 (82.29) | 1141304 (100) |

स्रोत : महाराष्ट्राचे विविध अर्थसंकल्प

अनुक्रमे 34.12 व 2.71 % असे झाले. 1995 मध्ये हा खर्च अनुक्रमे 2.72 व 3.75 प्रतिशत राहिला. परंतु 2000 मध्ये गृहनिर्माणासाठी खर्चाचे प्रमाण 2.29% तर नागरी विकासावरील खर्चाचे प्रमाण 2.84% असे कमी झाले. म्हणजे सामाजिकसेवामधील या बाबींसाठीचे सापेक्ष महत्त्व कमी असल्याचे स्पष्ट होते.

श्रम आणि श्रम कल्याण या घटकावरील सामाजिक सेवांमधील खर्चाचे प्रमाण 1985 मध्ये 1.81% होते त्यात 1990 व 1995 मध्ये अनुक्रमे 1.88 % व 2.09 % अशी स्थिती असल्याचे दिसते. इ.स. 2000 मध्ये हे प्रमाण 1.78 % पर्यंत कमी झाले. सामाजिक सुरक्षा व कल्याण यासाठीच्या खर्चाचे 1990 साली असलेले प्रमाण 3.36 % होते ते पुढे कमी होत जाऊन इ.स. 2000 मध्ये 2.98 % इतके झाले.

प्रभु. यु.एन.डी.पी. चेल्लिया व सुदर्शन[2] यांच्या अभ्यासातून असे निदर्शनास आले आहे की सामाजिक क्षेत्रातील खर्चाचे राज्याच्या स्थूल घरगुती उत्पादनाच्या आणि एकूण खर्चाशी असलेले प्रमाण बहुतांश राज्यांमध्ये ऐंशीच्या दशकाच्या मध्यकाळापासून घटले आहे. ही प्रवृत्ती नव्वदीच्या दशकाच्या पुर्वार्धापर्यंत सुरुच राहिली. राज्यांचा सामाजिक सेवा व ग्रामीण विकासावरील खर्चाचे राज्यांच्या स्थूल घरगुती उत्पादनाशी असलेले प्रमाण जवळपास सहा प्रतिशत होते तर एकूण खर्चाशी प्रमाण जवळपास चाळीस प्रतिशत होते. नंतरच्या कालावधीत यात घट झालेली दिसून येते.

### आर्थिक सेवांवरील खर्च

वित्तीय खर्चात सामाजिक सेवांवरील खर्चासोबत आर्थिक सेवांवरील खर्च देखील महत्त्वाचा असतो. आर्थिक सेवांवरील खर्चात कृषी आणि कृषी पूरक उपक्रम जसे पीक उत्पादन, पशुपालन, भू आणि जलसंवर्धन, दुग्धविकास, मासेमारी, जंगले, वृक्षारोपण, अन्नसाठवणूक आणि गोदामे, कृषी संशोधन आणि शिक्षण, कृषी वित्त संस्था, सहकार व इतर कृषी कार्यक्रम यांचा समावेश होतो. तसेच ग्रामीण विकास, विशेष क्षेत्रीय कार्यक्रम, सिंचन आणि पूर नियंत्रण, उर्जा, उद्योग आणि खनिजे, वाहतूक व दळणवळण, विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण, पर्यटन, नागरी पुरवठा इत्यादी बाबींचा अंतर्भाव केला जातो. कृषी व कृषी पूरक उपक्रमांवरील खर्चाचे एकूण आर्थिक सेवांवरील खर्चाशी असलेले 1985 सालातील प्रमाण 51.01% असे होते. म्हणजे एकूण आर्थिक सेवांमधील हा घटक अत्यंत महत्वाचा असल्याचे दिसून येते. 1990 व 1995 साली या बाबी वरील एकूण आर्थिक सेवांवरील खर्चातील प्रमाण अनुक्रमे 38.41 व 29.38 %इतके कमी झाले. परंतु 2000 मध्ये हे प्रमाण 56.13% एवढे वाढल्याचे आढळून येते.

महाराष्ट्र राज्यात ग्रामीण विकासावरील खर्चाचे राज्याच्या स्थूल घरगुती उत्पादनाशी असलेले प्रमाण 1990-91 मध्ये 0.86 % एवढे होते त्यातही पुढे 1995-96 मध्ये हे प्रमाण 0.85 % तर 1997-98 मध्ये हे प्रमाण 0.52 % इतके झाल्याचे दिसते. या संदर्भात देश पातळीवरील सरासरी प्रमाणापेक्षा महाराष्ट्र राज्य बरेच खाली होते. 1990-91 च्या आधार स्थितीनुसार ग्रामीण विकासावरील खर्चाचा निर्देशांक 1995-96 मध्ये 137 असा झाला. परंतु 1998-99 मध्ये तो 99 इतका कमी झाला. याचा अर्थ ग्रामीण विकासाकडे अंशतः दुर्लक्ष झालेले दिसून येते. एकूण आर्थिक सेवांवरील खर्चात ग्रामीण विकासासाठीचा खर्च जवळपास 16% इतका राहिला असल्याचे आढळून येते.

आर्थिक सेवांवरील खर्चाचा विचार

## तक्ता क्र. 5
## आर्थिक सेवांवरील खर्च

(रु. लाखात)

| अ क्र | विवरण | 1985 | | | 1990 | | | 1995 | | | 2000 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | योजना | योजना बाह्य | एकूण | योजना | योजना बाह्य | एकूण | योजना | योजना बाह्य | एकूण | योजना | योजना बाह्य | एकूण |
| 1 | कृषी आणि कृषी पूरक उपक्रम | 12229 | 61736 | 73965 | 15902 | 100374 | 116276 | 30320 | 115494 | 145814 | 30570 | 170995 | 201565 |
| 2 | ग्रामीण विकास | 17988 | 5259 | 23247 | 49666 | 77 | 49743 | 83612 | 40945 | 124557 | 59183 | 808 | 59191 |
| 3 | विशेष क्षेत्र कार्यक्रम | -- | -- | -- | 1333 | 8 | 1341 | 3526 | 6 | 3532 | 4587 | 14 | 4601 |
| 4 | सिंचन आणि पूर नियंत्रण | 6836 | 20411 | 27247 | 9953 | 54221 | 64174 | 18670 | 115193 | 133863 | 8346 | 64617 | 72863 |
| 5 | नागरी पूरवठा | -- | -- | -- | 3 | 2 | 5 | 7 | 3 | 10 | 13 | 5 | 18 |
| | एकूण | 38123 | 106824 | 144997 | 87358 | 215325 | 302683 | 157367 | 338912 | 496279 | 110004 | 209076 | 319080 |

स्रोत : महाराष्ट्राचे विविध अर्थसंकल्प

करताना सिंचन व पूरनियंत्रण ही बाब देखील लक्षात घेण्यायोग्य आहे. 1985 साली या घटकावर एकूण आर्थिक सेवांवरील खर्चाच्या 18.79 टक्के खर्च झाल्याचे दिसून येते. तर 1990 व 1995 मध्ये या खर्चाचे प्रमाणे अनुक्रमे 21.20 % व 26.97 % असे राहिले आहे. परंतु 2000 साली हे प्रमाण 20.29% कमी झाले.

आर्थिक सेवावरील एकूण खर्चातील 1985 साली योजनाबाह्य खर्चाचे प्रमाण 73.69 %, 1990 साली 61.14 %, 1995 साली 68.29 % आणि 2000 साली 69.35 % राहिल्याचे आढळून येते. याचा अर्थ असा की, योजना खर्चाचे आर्थिक सेवांवरील एकूण खर्चातील प्रमाण सातत्याने सापेक्षरित्या कमी राहिले आहे.

**महाराष्ट्रातील दारिद्र्य**

आर्थिक विकासाचा एक महत्त्वाचा निर्देशक म्हणजे दारिद्र्यात होणारी घट हे मानले जाते. राज्याच्या विकासातील, उत्पन्नातील वाढीचा लाभ तळाच्या थरातील लोकांपर्यंत पोहचतो का, तो पोहचत असेल व दारिद्र्य कमी होत असेल तर खऱ्या अर्थाने राज्याच्या विकास प्रक्रियेला गती मिळाली आहे असे मानता येते. महाराष्ट्राची गेल्या 40 वर्षातील दारिद्र्याची अवस्था पाहता 1961-62 च्या एकंदर ग्रामीण दारिद्र्याच्या प्रमाणात 61.04 % वरुन 1999-2000 पर्यंत 23.72 % इतकी घट झाली. दारिद्र्यात होणारी घट ही राज्य सरकारने 1972 ला स्वीकारलेली ग्रामीण रोजगार वृद्धीच्या, रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीत दिसून येते. महाराष्ट्रातील दारिद्र्याचे सध्याचे प्रमाण हे राष्ट्रीय पातळीवरील दारिद्र्याच्या प्रमाणापेक्षा कमी आहे.

**महाराष्ट्रातील रोजगार**

ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया घालण्यासाठी, ग्रामीण भागात रोजगाराची हमी देणारी व दारिद्र्य दूर करण्यास सहाय्यभूत ठरणारी रोजगार हमी योजना राज्याने 1972 पासून वि.स.पागे समितीच्या शिफारशी नुसार सुरु केली.

भारतात दारिद्र्य निर्मूलनासाठी आजपर्यंत वेगवेगळे दृष्टीकोन अवलंबिण्यात आले. त्यामध्ये क्षेत्रीय दृष्टीकोन, साधनांचे हस्तांतरण दृष्टीकोन आणि रोजगार निर्मितीच्या माध्यमातून दारिद्र्य निर्मूलन करणे यांचा अंतर्भाव आहे. महाराष्ट्रात पहिल्या दोन दृष्टीकोनासोबतच तिसरा म्हणजेच रोजगार निर्मितीतून दारिद्र्य निर्मूलनाच्या दृष्टीकोनावर अधिक भर देण्यात आला त्यासाठी रोजगार हमी योजना सुरु करण्यात आली. पुलोद सरकारने व काँग्रेसने रोजगार हमी योजनेकडे बरीच वर्षे पुरेसे लक्ष दिल्याचे दिसते.

या योजनेवर होणाऱ्या खर्चाच्या परिपूर्तीसाठी व्यवसाय कराची आकारणी करण्यात येते. ही योजना अत्यंत स्तुत्य असुन अनुकरणीय आहे. या योजनेवरील खर्चात व रोजगार निर्मितीच्या

**तक्ता क्रमांक 6**

**महाराष्ट्रातील दारिद्र्य**

| | 1961-62 | 1973-74 | 1983-84 | 1993-94 | 1999-00 |
|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण संख्या (%) | 61.04 | 57.71 | 54.56 | 37.93 | 23.72 |
| नागरी संख्या (%) | 58.18 | 43.87 | 41.79 | 35.15 | 26.81 |

स्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी - 2000-2001

प्रमाणात 1984-87 नंतर घट होतांना आढळते. 1984-87 या काळात रो. ह.यो. वरील खर्च (1993-94 च्या किंमतीत) 512.18 कोटी रु. होता. तो 1999 ला 325.83 कोटी रु. पर्यंत घटला तर रोजगार निर्मितीचे प्रमाणे 18.5 कोटी मनुष्य दिवसांवरुन 9.49 कोटी मनुष्य दिवसांपर्यंत घटले. याचा अर्थ युतीच्या काळात रोजगार हमी योजनेकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसते. 1984-87ला योजनेवरील खर्च व रोजगार निर्मिती महत्तम पातळीवर होती. त्यानंतर मात्र त्यात सातत्याने घट होत असल्याचे दिसून येते. ही योजना उत्पादक कामांच्या पूर्ततेसाठी व शेती विकासाला गती देण्यास सहाय्यभूत ठरलेली आहे.

**मानवी विकास**

विकासाचा केंद्रबिंदू हा मानव असल्याने मानवी विकासासाठी केले गेलेले प्रयत्न पाहणे हे विकास प्रक्रियेतील महत्त्वाचे अंग असते. गेल्या चार दशकात राज्याच्या सामाजिक व मानवी विकासात लक्षणीय वाढ झालेली दिसून येते, विकासाच्या इतर निर्देशांकाच्या तुलनेत शिक्षण व आरोग्य क्षेत्रातील बदल हे सामाजिक विकास प्रतिबिंबीत करतात. शिक्षण हे परिवर्तनाचे साधन आहे, शिक्षणामुळे प्रत्येक बाबींकडे तर्कशुद्ध दृष्टीने व वास्तववादी भूमिकेतून पाहण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. त्यामुळे विकासाच्या अनेक संधी निर्माण होऊन विकास प्रक्रिया गतिमान होण्यास मदत होते. तर आरोग्य

**तक्ता क्रमांक 7**

**रोजगार हमी योजने अंतर्गत रोजगार निर्मिती (त्रैवार्षिक सरासरी)**

| वर्ष | खर्च(कोटी रु) (चालू किंमती) | खर्च कोटी रु. 1993-94 | रोजगार निर्मिती (कोटी मनुष्य दिवस) | मजुरीवरील खर्च % प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1972-74 | 5.83 | 25.96 | 1.92 | - |
| 1975-77 | 45.75 | 181.66 | 12.11 | 80 |
| 1978-80 | 101.81 | 321.15 | 18.01 | 79.1 |
| 1981-83 | 147.34 | 362.55 | 14.95 | 76.4 |
| 1984-87 | 249.23 | 512.18 | 18.5 | 64.7 |
| 1988-90 | 260.61 | 423.56 | 9.75 | 52.1 |
| 1991-93 | 337.19 | 401.07 | 11.91 | 60.3 |
| 1994-96 | 391.73 | 350.85 | 9.65 | 61.8 |
| 1997-99 | 392.14 | 286.83 | 9.07 | 71.03 |
| 1999-00 | 493.97 | 325.83 | 9.49 | 75.0 |

(स्रोत : - मानवी विकास अहवाल महाराष्ट्राची 2002)

विषयक सुविधांमध्ये झालेल्या वाढीमुळे जीवनस्तर उंचावण्यास मदत होते. प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षण संस्थांची संख्या व विद्यार्थी संख्या यात सतत वाढ होत असून सर्वच स्तरावरील शिक्षणाचा विस्तार वेगाने होत असल्याचे दिसून येते. विशेषत: उच्च शिक्षणाचा विस्तार अधिक वेगाने होतो आहे. आरोग्य विषयक सुविधांमध्येही संख्यात्मक वाढ लक्षणीय स्वरूपाची आहे. रुग्णालये, दवाखाने व दर लाख लोकांमागील खाटा या संख्येत वाढ झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील सध्याचे सरासरी आयुर्मान 61.2 वर्षे असून ते देशपातळी वरील सरासरी आयुर्मानापेक्षा जास्त आहे. या सर्वांचा अर्थ असा की, गेल्या 40 वर्षात राज्याने मानवी विकासाच्या बाबतीत महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडलेली आहे.

असे असले तरी 80च्या दशकाच्या सुरुवातीस उच्च शिक्षणामध्ये विशेषत: तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणामध्ये विना अनुदान पद्धती स्वीकारण्यात आली त्यामुळे अनेक समाजसुधारकांनी अंत्योदयासाठी व शेवटच्या माणसापर्यंत शिक्षण पोहचावे म्हणून आपले संपूर्ण

**तक्ता क्रमांक 8**

**मानवी विकास**

| शिक्षण | 1960-61 | 1970-71 | 1980-81 | 1990-91 | 2000-01 |
|---|---|---|---|---|---|
| प्राथमिक शाळा | 34594 | 45143 | 51045 | 57744 | 65727 |
| विद्यार्थी संख्या (लाख) | 41.8 | 62.3 | 83.9 | 104.2 | 120.13 |
| दर शिक्षकामागे विद्यार्थी | 37 | 34 | 38 | 39 | 39 |
| *माध्यमिक शाळा | 2468 | 5339 | 6119 | 9972 | 15284 |
| विद्यार्थी संख्या (लाख) | 8.58 | 19.4 | 33.1 | 57.94 | 92.42 |
| दर शिक्षकामागे विद्यार्थी | 25 | 25 | 29 | 32 | 37 |
| =उच्च शिक्षण संस्था | 211 | 547 | 739 | 1134 | 1599 |
| विद्यार्थी(लाख) | 1.1 | 3.3 | 5.9 | 11.35 | 9.39 |
| **आरोग्य** | – | | | | |
| रुग्णालये | – | 299 | 530 | 768 | 981 |
| दवाखाने | – | 1372 | 1776 | 1896 | 1629 |
| रुग्णालयातील खाटा (दर लाख माणसामागे) | – | 88 | 114 | 144 | 106 |

स्रोत - महाराष्ट्राची आर्थिक पाहणी - 2000-2001 व 2001-2002.

*1994-95 पासून माध्यमिक शिक्षणात कनिष्ठ महाविद्यालयांचा समावेश

=1994-95 पासून वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालये वगळली

जीवन व्यतीत केले त्या सर्व प्रयत्नांना त्यांचेच वारस म्हणून घेणारे पूर्णत: खीळ घालण्याचे काम करीत आहेत. अगदी सामान्य माणूसच नव्हे तर मध्यमवर्गीयांना सुद्धा शैक्षणिक संधीपासून दूर लोटण्याचे दुर्दैवी प्रयत्न होत आहेत. शिक्षण हा मानवी विकासाचा अत्यंत महत्त्वाचा निकष असल्याने शिक्षणावर एकूण स्थूल घरगुती उत्पादनाच्या 6 टक्के एवढा खर्च व्हायला हवा असे मानले जात असतांनाही प्रत्यक्षात मात्र शिक्षणावर आपण केवळ चार टक्केच खर्च करतो म्हणजेच शिक्षणावरील खर्चात वाढ करण्याची नितांत गरज आहे.

**सहकार**

महाराष्ट्र राज्य हे सहकाराच्या बाबतीत एक अग्रेसर राज्य म्हणून ओळखले जाते. राज्यात सहकारी चळवळीने ग्रामीण विकासाचा पाया घालण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे. विशेषत: साखर कारखानदारी मध्ये सुरूवातीच्याकाळात लक्षणीय प्रगती साध्य केली गेली. राज्याच्या अर्थकारणावर साखर कारखानदारीने सतत प्रभुत्व ठेवले. ग्रामीण भागात रोजगार वृद्धीसाठी सहकारी चळवळ खूपच साहाय्यभूत ठरली आहे. ही चळवळ ग्रामीण पतपुरवठा, गृहनिर्माण, बँका, दुग्ध व्यवसाय, सुतगिरण्या, ग्रामोद्योग इत्यादी क्षेत्रात विकसित होऊन या चळवळीने एकूण अर्थकारणावर व समाजकारणावर खूपच प्रभाव टाकला आहे.

परंतु अलिकडे सहकारी क्षेत्रात वाढत चाललेला भ्रष्टाचार, कार्यकर्त्यांची सहकाराबाबतीत वाढत असलेली उदासीनता, अकार्यक्षमता यासारख्या दोषांमुळे सहाकरी चळवळ कमकुवत होत आहे. तर दुसऱ्या बाजुला जाणीवपूर्वक सहकारी चळवळीला खीळ घालण्याचे प्रयत्न अलिकडच्या काळात होत आहेत विशेष म्हणजे सहकारी संस्था जागतिकीकरणाच्या व खाजगीकरणाच्या परिस्थितीत कशा टिकून राहतील याकडे फारसे लक्ष दिले जात नाही असे दिसून येते. परिणामी महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून ओळखले जाणारे सहकार क्षेत्र विशेष प्रयत्न केले नाहीत तर कोलमडण्याची भीती संभवते.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासून सुरुवातीच्या कालावधीत राज्याच्या उभारणीसाठी कृषीविकासावर भर दिला गेला. कृषी विकासाला साह्यभूत ठरणाऱ्या सिंचन, वीज, वाहतूक व दळणवळण इत्यादी सुविधांमध्ये वाढ करण्यावर देखील भर दिला गेला. याच कालावधीत सहकार चळवळ उभारण्याचे कामही सुरु झाले आणि यातून साखर कारखानदारी मोठ्या प्रमाणावर उदयास आली. कापूस जिनींग व प्रेसींग, सुतगिरण्या, तेलगिरण्या यासारख्या उपक्रमांनादेखील सहकाराच्या माध्यमातून विकसित करण्याचा प्रयत्न झाला.

विद्युत निर्मिती व ग्रामीण विद्युतीकरण, शिक्षण व आरोग्य, रोजगार निर्मिती व दारिद्र्य निर्मूलन यासारख्या जिव्हाळ्याच्या बाबींवर भर देण्यात आला. साठीच्या मध्यान्ही नंतर कृषी उत्पादन वाढीच्या नवीन उत्पादन तंत्राचा अवलंब करण्यात सुद्धा महाराष्ट्र अग्रेसर राहिला. याच दरम्यान विविध कृषी विद्यापीठांची स्थापना झाल्याचे दिसून येते. केंद्र शासन पुरस्कृत अनेक योजनांच्या माध्यमातून राज्यात औद्योगिक विकास साध्य करण्यासाठीही जाणीवपूर्वक प्रयत्न झाल्याचे मान्य करावे लागते. महाराष्ट्र राज्यातील एक तृतीयांश क्षेत्र हे अवर्षण प्रवण क्षेत्र असल्याने आणि रोजगार निर्मीतीसाठी म्हणून महाराष्ट्र शासनाने रोजगार हमी योजनेसारखी अत्यंत महत्त्वाची योजना समर्थपणे राबविली आहे. कापूस पीकविणाऱ्या शेतकऱ्यांचे हित जोपसण्यासाठी कापूस एकाधिकार योजनेसारखी योजना देखील राबविली आहे.

महाराष्ट्र राज्यातील दरडोई उत्पन्न भारतातील सरासरीपेक्षा अधिक असून एका बाजूस कृषी क्षेत्रापासूनचे उत्पन्न राष्ट्रीय पातळीवरील हिश्शांपेक्षा कमी तर द्वितीयक व तृतीयक क्षेत्राचा हिस्सा राष्ट्रीय पातळीपेक्षा सापेक्षरीत्या अधिक आहे. महाराष्ट्र औद्योगिक दृष्ट्या प्रगत असल्याचे खरे असले तरी कृषी विकासाबाबत मागे असल्याचे मान्य करावे लागते. कृषी उत्पादन वाढविण्यासाठी कृषीविकासावर अधिक भर देण्याची आवश्यकता आहे.

महाराष्ट्राच्या वित्तीय स्थितीत महसुली उत्पन्न व भांडवली जमा यांच्या सापेक्ष परिस्थितीत महसुली उत्पन्न बहुतांश वेळेस अधिक दिसून येते. अलीकडे करांच्या माध्यमातून विविध प्रकारच्या कर्जाच्या माध्यमातून उत्पन्न उभारणीचा प्रयत्न शासना मार्फत करण्यात येतो. सामाजिक सेवांवर व आर्थिक सेवांवर खर्च केला जात असतांना शिक्षण, क्रिडा, कला व संस्कृती, सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण तसेच कृषी व कृषी पूरक उपक्रम, ग्रामीण विकासासारख्या बाबींवर आवर्जून भर दिला जात असल्याचे आढळते.

महाराष्ट्र राज्यातील दारिद्र्य राष्ट्रीयपातळीपेक्षा सापेक्षरित्या कमी दिसून येते. महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेसारख्या योजनेच्या माध्यमाने रोजगार निर्मितीच्या संदर्भात आपली स्वतंत्र प्रतिमा तयार केली आहे. मानवी विकास संदर्भातील महाराष्ट्र राज्यातील प्रगती समाधानकारक असल्याचे दिसते. राज्यातील सरासरी आयुर्मान अधिक आहे. शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासारखे महत्त्वाचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने महाराष्ट्रात जाणीवपूर्वक प्रयत्न होतांना दिसून येतात. आरोग्य विषयक व्यापक स्वरूपातील जनजागृती करण्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे.

असे असतांनाही अलिकडील काळात शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर होत असलेले खाजगीकरण, नवीन आर्थिक धोरण, सार्वजनिक क्षेत्रांमध्ये होत असणारी मोठ्या प्रमाणावरील निर्गुंतवणूक, विविध क्षेत्रातील राज्याचा घटता सहभाग व त्यामुळे सामान्य माणसांच्या हिताकडे अपरिहार्यपणे होणारे दुर्लक्ष या बाबी प्रकर्षाने जाणवतात. तसेच झपाट्याने वाढत असणारे खाजगीकरण, परिणामी शासनाचा कमी होत जाणार सहभाग अशा स्थितीत तळागाळातील लोकांची उन्नती कशी साधली जाणार हा मूलभूत प्रश्न अनुत्तरीतच राहतो.

### संदर्भ

1. भास्कर भोळे व लक्ष्मण बेडकिहाळ (संपादित)'बदलता महाराष्ट्र' (एम. डी. पाटील गौरव ग्रंथ), डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा, 2003.

2. भालचंद्र मुणगेकर - 'स्वातंत्र्योत्तर भारताच्या आर्थिक विकासाचे राजकीय अर्थशास्त्र' अध्यक्षीय भाषण, म.अ.प. 24 वे वार्षिक अधिवेशन.

3. बी. एस. म्हस्के - 'महाराष्ट्र राज्याची दयनीय आर्थिक स्थिती' - अर्थसंवाद, एप्रिल - जून 2003.

4.अनिल करडेकर (संकलक)'महाराष्ट्राचा अर्थसंकल्पीय इतिहास - 1960 ते 2002' कोयना प्रकाशन नेरुळ - नवी मुंबई, 2002.

5. आर. एस. देशपांडे - 'टॅक्स रिफॉर्मस फ्रॉम ए स्टेटस् परस्पेक्टीव्ह' डॉ. बोरकर स्मृती व्याख्यान.

6. एस. महेंद्र देव व जोस मुईज - ' सोशल सेक्टर एक्सेपेंडीचर्स इन द 1990 ॲनालिसीस ऑफ सेंट्रल ॲंड स्टेट बजेटस्' इ.पी डब्ल्यू. मार्च 2, 2002.

●●●

# अर्थशास्त्राने हायजॅक केलेला 'विकास' !

● दिलीप कुलकर्णी, कुडावळे
*प्रसिद्ध विचारवंत, कुडावळे जिल्हा रत्नागिरी*

मराठी अर्थशास्त्र परिषद आणि आर.एस. मुंडले धरमपेठ कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने जमनालाल बजाज स्मृती उपक्रमांतर्गत आयोजित, सम्यक् विकास : आदर्श आणि वास्तव ! या विषयावरील चर्चा सत्रात दि. 3 फेब्रुवारी 2004 रोजी दिलेले बीज भाषण.

आपण वृत्तपत्रांमध्ये पळवापळवीच्या अनेक बातम्या वाचतो. 'लहान मुलाचे अपहरण केले' येथपासून ते 'विमानाचे अपहरण केले' येथपर्यंत सर्व प्रकारांचे 'हायजॉकिंग' आणि 'किडनॅपिंग' अधूनमधून जगभर चालू असते.

हे जसे भौतिक वस्तूंचे अपहरण, तसेच कधीकधी विचार, संकल्पना इत्यादींचेही अपहरण होते. ते जेव्हा उघडपणे होते, तेव्हा त्याला 'वाङ्मयचौर्य' असे म्हणतात. पण कधी कधी ते अपहरण इतके स्थूल नसते: अत्यंत सूक्ष्मपणे ती प्रक्रिया होते. एखाद्या शेतकऱ्याने थोडा थोडा बांध सरकवत शेजारची जमीन बळकवावी तसा प्रकार होतो.

'विकासा'च्या संकल्पनेबाबत असेच झाले आहे. मुळात अत्यंत व्यापक, बहुआयामी, बहु-विद्याशाखीय अशी असलेली ही संकल्पना आज 'अर्थशास्त्रा'ने आपल्या ताब्यात ठेवली आहे. 'बळजबरीने' असे मात्र म्हणता येणार नाही कारण, त्यावरचा आपला हक्क सांगायला अन्य कोणीच पुढे आलेले नाही ! अर्थशास्त्राने ती आपल्या कब्जात ठेवण्यास कोणाचीच हरकत नाही !

मी मात्र या अपहरणावर आक्षेप घेऊ इच्छितो. अर्थशास्त्राचा आणि 'विकासाचा' मुळीच संबंध नाही असे मी म्हणत नाही; पण ती संकल्पना आज जी 'केवळ अर्थशास्त्रीय' म्हणून गणली जाते, तिला माझा विरोध आहे. तसे मानल्यामुळे 'विकासाची' संकल्पना फारच सीमित, संकुचित, मर्यादित, किंवा अपूर्ण झाली आहे. अधिक स्पष्ट बोलायचे, तर ती 'घातक' ही बनली आहे. कसे ते जरा तपशिलात जाऊन पाहूया.

आज 'विकासाचा' विचार कोणकोण पुढे मांडतात ? 'योग' वाली काही मंडळी 'मानवी विकासा' बद्दल बोलतात. विद्यार्थ्यांच्या बाबतीत 'व्यक्तिमत्व विकासाचा' उल्लेख होतो. कामगार कर्मचारी ह्यांच्या संबंधात 'मानव-संसाधन-विकासा'ची (H.R.) गोष्ट बोलली जाते. पण ह्याचे प्रमाण फार अल्प आहे. ज्या 'विकासा'चा सातत्याने उद्घोष चालू असतो, तो विकास 'अर्थशास्त्रप्रणीत विकास' आहे. किंबहुना, वरीलपैकी 'योग वाल्यांचा' विकास सोडता, अन्य विकास हे अर्थशास्त्रप्रणीत

विकासाचेच भाग आहेत असेही ढोबळपणे म्हणता येईल.

आज 'विकासा'ची व्याख्या अर्थशास्त्र करते ती अशी आहे : 'विकास म्हणजे एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या परिमाणात मोजली जाणारी वाढ', आता ह्या व्याख्येतच अनेक गफलती आहेत. त्या व्याख्येच्या वैधतेविषयीच अनेक प्रश्न विचारता येऊ शकतात : 'वाढ' म्हणजे विकास हे व्याख्या करावी इतक्या निरपवादपणे सत्य आहे का ? कोणतीही 'वाढ'ही योग्यच असते हे गृहीतक योग्य आहे का ? 'एकूण राष्ट्रीय उत्पन्न' (जी. एन. पी. किंवा जी. डी. पी.) हे वाढ मोजण्याचे सर्वांत योग्य परिमाण आहे का ? सातत्याने वाढ होत राहणे हे संभव आहे का? जी.डी.पी. मध्ये वाढ होत असताना त्याचे अन्यान्य क्षेत्रांवर जे दुष्परिणाम होत असतील, वा घट होत असेल, त्याचे मोजमाप कोठे/ कसे करायचे ? ती वजावट कशातून करायची ? जी मोजता न येणारी वाढ आहे, तिचा 'विकासा' शी काही संबंध आहे का नाही ?

अशा अनेकानेक प्रश्नांची उत्तरे आपण शोधू लागतो, तेव्हा आपल्या असे लक्षात येते की, वरील व्याख्या ही अत्यंत झापडबंद, संकुचित अशी आहे. अन् जो जो अधिक खोलात जावे तसतसे असेही दिसू लागते की, ती अनैतिक, घातक, विनाशक अशीही आहे. कसे ते थोडक्यात पाहू.

ही व्याख्या असे सांगते की, जी.डी.पी. त वाढ करणारी कोणतीही गोष्ट ही 'विकास' घडवून आणते. ह्याचा अर्थ असा की, जी.डी.पी. मधील वाढ हे आपले एकमेव लक्ष्य असले पाहिजे. ज्या कोणत्या मार्गाने ती वाढ साध्य होईल, तो मार्ग वैध, उचित, न्याय्य असा मानला पाहिजे. हे किती चुकीचे, भ्रामक आहे हे काही उदाहरणांवरुन दिसून येईल. अमेरिकेतला एक 'पर्यायी-जीवन'वादी नेता राल्फ नेडर आपल्या 'अनसेफ ॲट ॲनी स्पीड' ह्या पुस्तकात मोटारींच्या अपघातांविषयी खूप आकडेवारी देतो. अन् मग तो असे सांगतो की, 'हताहत होणाऱ्यांची ही आकडेवारी थरकाप उडवणारी असली, तरी अपघातांमुळे जी. एन. पी.त भर पडते हे आपण विसरता कामा नये. जेव्हा केव्हा कुठे अमेरिकेत वाहन- अपघात होतो, तेव्हा अमेरिकेचा जी. एन. पी. टुणकन उडी मारतो.' ह्यामागचे तर्कशास्त्र असे की, अपघातांमुळे पोलीस, न्यायालये, वकील, रुग्णालये, विमा-उद्योग, मेकॅनिक, वाहन-निर्मितीउद्योग, अशा सर्वांना काम मिळते, नि त्यांचे उत्पन्न जी. एन. पी.त मिळवले जाऊन तो वर उडी मारतो. ह्यातून निघणारा उपसिद्धांत हा की,'जर विकास व्हायला हवा असेल, तर अधिक संख्येने अपघात घडायला हवेत' !

असेच दुसरे एक उदाहरण, अमेरिकेतलेच. काही दशकांपूर्वी अमेरिकेत सिगारेटींच्या पाकिटांवर आपल्यासारखाच 'वैधानिक इशारा' छापण्यास प्रारंभ झाला. 'धूम्रपान करणे आरोग्यास अपायकारक आहे त्याबरोबर अमेरिकेतील सिगारेट-उत्पादकांनी सर्वत्र जाहिराती छापल्या - दाखविल्या : 'धूम्रपान न करणे अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेस अपायकारक आहे'! ह्याचा अर्थ स्पष्ट आहे : धूम्रपान करण्यामुळे जी. डी. पी. त भर पडते, नि म्हणून 'विकास' होतो. देशाचा विकास होण्यासाठी लोकांनी अधिक प्रमाणावर धूम्रपान केले पाहिजे.

'अधिक अपघात म्हणजे अधिक विकास', 'अधिक धूम्रपान म्हणजे अधिक विकास' ही परिस्थिती विकृत किंवा अनैतिक ह्याशिवाय अन्य कशी म्हणता येईल ? पण एकदा का अर्थशास्त्रीय व्याख्या मान्य केली की, विकृती वा अनैतिकता मूग गिळून स्वीकारावी लागते.

जी.डी.पी. मधली प्रत्येकच वाढ अशी

विकृत असते असे नाही. धान्योत्पादनातील वाढ ही मूलतः चांगलीच असते. पण तिथे जर अमर्याद वाढीचा आग्रह धरला गेला, तर तशी वाढही घातक ठरु शकते. आजची अधिक धान्योत्पादनाची 'हरितक्रांतीची' पद्धत ही अशी घातक ठरली आहे. कारण, रासायनिक खतांच्या आणि पाण्याच्या अतिरेकाने जमिनी मोठ्या प्रमाणावर नापीक होत आहेत. आणि अत्यंत विषारी कीटकनाशके, तणनाशके ह्यांच्या वापरामुळे हवा, पाणी, जमीन एवढेच नव्हे तर सर्व जीवसृष्टी-मानवी शरीरेही-विषमय बनून गेली आहेत. संकरित बियाणांमुळे पिकांच्या वाणांमधील जैविक विविधता कमालीची घटली आहे. थोडक्यात, हरितक्रांतीने अक्षरशः हाहाकार माजवला आहे. संपूर्ण शेतीच धोक्यात आली आहे. उत्पादन वाढले खरे; पण ते जमिनींचा, पर्यावरणाचा विनाश करुन वाढले. साहजिकच, ही वाढ घातक आहे हे एक; नि  अशाश्वत आहे हे दुसरे.

केवळ शेतीतीलच नव्हे; तर बहुतेक सर्व क्षेत्रांतील आजची उत्पादन-वाढ ही वरील प्रकारे पर्यावरणाची हानी करुनच होत आहे असे आपल्याला दिसून येईल. अधिक तपशिलात न शिरता एक ढोबळ निरीक्षण म्हणून आपण असे म्हणू शकू की, ह्या सर्व वाढीमुळे पर्यावरणाची तीन प्रकारांची हानी होत आहे : (1) संसाधनांचा ऱ्हास : नवकिरण-क्षम आणि नवकिरण-अक्षम अशा दोन्ही प्रकारांच्या संसाधनांत सातत्याने घट होत आहे. ज्यांचे नवकिरण होत नाही, ती संसाधने तर सातत्याने घटतच असतात. उदाहरणार्थ खाणींतले धातू वा खनिज तेल. पण जी संसाधने सतत पुनरुत्पादित होत असतात त्यांच्याही वापराचा वेग-वाढीच्या हव्यासापोटी-त्यांच्या पुनरुत्पादनाच्या वेगापेक्षा अधिक राहून त्या संसाधनांचाही ऱ्हास होतो. उदाहरणार्थ, शुद्ध होण्याच्या नैसर्गिक वेगापेक्षा अधिक वेगाने पाणी दूषित होत राहते. जमिनीत मुरण्याच्या प्रमाणापेक्षा अधिक वेगाने उपसले जाते. झाडे वाढण्याच्या वेगापेक्षा अधिक वेगाने ती तोडली जातात. (2) प्रदूषण: उत्पादन, वाहतूक, सेवन इ. करताना अनेक प्रकारांचे प्रदूषण होते. (3) जैविक विविधतेत घट : नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास आणि सार्वत्रिक प्रदूषण ह्यामुळे निसर्गातील अनेक जीवजाती नष्ट पावत आहेत. त्यामुळे त्या त्या जीवजातीकडून पार पाडली जाणारी कामे होण्याची बाकी राहून एकूणात निसर्गव्यवस्था पंगू बनत आहे.

म्हणजेच, अर्थशास्त्राला जो (जी.डी.पी. मधील) विकास हवा आहे, ती वाढ साधताना ज्याच्या आधारे ही वाढ होणार त्या निसर्गाचीच अपरिमित हानी होत आहे; त्यामुळे भविष्यकाळातील अशी वाढच धोक्यात आली आहे. ह्यालाच हल्ली 'अशाश्वत' किंवा 'आधारणक्षम विकास' असे म्हटले जाते. ह्याचा अर्थ असा की, अर्थशास्त्रप्रणीत विकासाच्या संकल्पनेत एक जोरदार अन्तर्विरोध आहे. असा विकास (वाढ)जेवढा अधिक व्हावा, तेवढा तो अधिक अशाश्वत बनतो. तो जितक्या अधिक वेगाने करावा, तितक्या लवकर तो संपुष्टात येऊ शकतो.

असे होणे अत्यंत स्वाभाविक आणि अपरिहार्य आहे. कारण, ज्यांच्या आधारे भौतिक वाढ होणार ती निसर्गातील संसाधने मर्यादित आहेत. मग, मर्यादित संसाधनांच्या आधारे अमर्याद वाढ; किंवा सान्त संसाधनांच्या आधारे अनन्त वाढ कशी शक्य आहे ? पण अर्थशास्त्र हे वास्तव लक्षात घेत नाही, त्यांची रचना ज्या काळात झाली, त्या काळात संसाधने विपुल होती, त्यामुळे त्यांची 'अनंत उपलब्धता' गृहीत धरुन संकल्पना मांडल्या गेल्या. आता अवघ्या शे-दिडशे वर्षांत-त्या भ्रामक असल्याचे दिसून येत आहे.

अशीच आणखी एक भ्रामक संकल्पना म्हणजे 'रेखीय वाढीची' (लीनिअर ग्रोथ). विकास म्हणजे वाढ, आणि तीही पुन्हा रेखीय वाढ ! प्रत्येक गोष्टीतून दरडोई उत्पादन, दरडोई सेवन, किंवा दरडोई एकूण राष्ट्रीय उत्पन्न आपल्याला सतत वाढायला हवे आहे. 'रेखीय वाढीच्या'संकल्पनेने आपण पछाडलेलो आहोत. परंतु, वर पाहिल्याप्रमाणे, अशा रेखीय वाढीसाठीची संसाधने एकतर घटती, किंवा चक्रीय स्वरुपात उपलब्ध आहेत. म्हणजेच वाढ आणि तीसाठीची संसाधने ह्यांचे आलेख परस्परविरुद्ध आहेत. ते जुळणे शक्यच नाही. मग तरीही आपण सध्या रेखीय वाढ करु शकतो आहोत ती कशी ? ती शक्य होत आहे, उद्यासाठीची संसाधने आजच वापरल्याने. पुढच्या पिढीसाठीचे पाणी, जमीन, धातू, खनिज तेल, वनसंपदा, इत्यादी आजच वापरुन टाकून आपण आजची 'रेखीय वाढ' साजरी करीत आहोत. काही काळ ते शक्य होईलही; पण अनन्त काळ निश्चितच नाही. आजचा विकास हा 'शाश्वत', 'धारणाक्षम' नसल्याची हाकाटी अधिक जोराने ऐकू येत आहे ती त्यामुळेच.

'वाढी' साठीचे पछाडलेपण आपल्याला आणखी एका गोष्टीकडे दुर्लक्ष करायला भाग पाडते. ती म्हणजे 'वाढी'तील भेद. आपण असे समजून चालतो की, कोणतीही वाढ ही चांगलीच असते. वस्तुत: हा एक भ्रमच आहे. निसर्गात 'वाढ' आहे; पण ती कधीच रेखीय, अनन्त अशी नसते.ती सान्त, मर्यादित अशीच असते. एका अन्तर्निहित मर्यादेनंतर वाढ आपोआप थांबून घट सुरु होते. निसर्गात आहे, वाढ आणि घट ह्यांतील चक्रीयता. त्यांतील संतुलन. एकाने ह्याकडे फार चपखल शब्दांत आपले लक्ष वेधले आहे तो म्हणतो : More amazing than the natural phenomenon of growth, is the phenomenon of cessation of growth ! अर्थशास्त्रीय विचारांत वास्तवाचे हे भान कोठेही जाणवत नाही.

ह्याचा परिणाम असा होतो की, सर्वच वाढ वांछनीय मानली जाते. तीत चांगली वाढ आणि दोषपूर्ण वाढ असा भेद केला जात नाही. अपघात, व्यसने, हिंसाचार, दंगली, युद्धे ह्या सर्वांमुळे जी 'वाढ' होते ती जी.डी.पी. मध्ये भरच घालत असल्याने वांछनीयच मानली जाते. ह्या वाढीमुळे व्यक्ती, समाज, पर्यावरण ह्यांच्या आरोग्यावर जे दुष्परिणाम होतात त्यांकडे पूर्णत: डोळेझाक करुन 'वाढी'चा आग्रह धरला जातो. कोणतीही वाढ जेव्हा अनिर्बंधपणे होते, तेव्हा ती कर्करोगासारखी घातक बनते. पण अर्थशास्त्रीय विचारांत हा गुण-दोष-भेद केला जात नाही. त्यामुळेच ती अनारोग्यकारक, घातक अशी बनली आहे.

जी.डी.पी हे मोजमाप मोठे गंमतीशीर आहे,त्यात फक्त बेरीज करण्याची सोय आहे, वजाबाकीची नाही ! 'वाढ' होताना ज्याची बेरीज होऊ शकेल, ते जी. पी. डी. मध्ये मिळवले जाते. परंतु, त्याचेळी जी घट वा नुकसान होईल त्याची वजावट मात्र होत नाही ! मोटारींचे उत्पादन व खप वाढला की, जी.डी.पी. वाढतो. मोटारींसाठी पेट्रोल वापरले की, जी.डी.पी. आणखी वाढतो. पण वापरामुळे खाणींतले पेट्रोल (खनिज तेल) कमी होते. एका नवीकरण-अक्षम संसाधनातील ह्या पुन्हा भरुन न येणाऱ्या घटीची कोणतीही वजावट मात्र जी.डी.पी.तून होत नाही. पेट्रोल जाळून प्रदूषण झाले, तर त्यामुळे होणाऱ्या विविध हानींची वजावट करण्याची सोय नाही. पण ह्या प्रदूषणाचा त्रास कमी करण्यासाठी नासिका-त्राणांचे (मास्क) उत्पादन केले की, मात्र जीडीपीत भर पडणार ! वापरुन फेकून दिलेल्या अशा नासिकात्राणांचा कचरा कोणतीही वजावट करणार नाही. पण असा कचरा स्वच्छ करण्यासाठी जी सारी यंत्रणा काम करेल, तीवरचा

'खर्च' मात्र जी.डी.पी.त 'उत्पन्न' म्हणून मिळविला जातो !

असले 'खर्च' हे 'उत्पन्नात' मिळविण्याचा प्रकार अन्यही अनेक बाबतीत होतो. जी.डी.पी.त भर घालताना प्रदूषण होते. ते निवारण करण्याचा 'खर्च' हे मात्र 'उत्पन्न' धरले जाते. प्रचलित आर्थिक/सामाजिक रचनेमुळे व्यक्ती तणावग्रस्त, वैफल्यग्रस्त बनतात. त्यातून दंगली, गुन्हेगारी, हिंसाचार होतात. त्या शमवण्यावर (पोलीस/न्यायव्यवस्था)होणारा खर्च हा खरे तर जी.डी.पी. तून दंड म्हणून वसूल केला पाहिजे. पण होते उलटेच हा सारा खर्च 'राष्ट्रीय उत्पन्नात' भर घालतो !

ह्या साऱ्या बाबी पाहता जी.डी.पी. सारखे झापडबंद, भ्रामक, विकृत आणि हास्यास्पद मोजमाप अन्य कोणतेही नसेल असे वाटते. पण तरीही त्याच्या आधारेच 'विकास' मोजण्याच्या हेका आपण अद्यापि धरुन आहोत.

आजवर अनेकांनी जी.डी.पी./जी.एन्.पी. मधील हे दोष दाखवून दिले आहेत. त्यात अर्थतज्ज्ञही आहेत आणि अर्थशास्त्रावर टीका करणारे तज्ज्ञ ही आहेत. ई.एफ.शूमाखर हे अर्थतज्ज्ञ म्हणतात : 'माझ्या मते जी.एन.पी. च्या संकल्पनेला काहीही अर्थ नाही. एखाद्या बाबतीतील यशाचे मोजमाप म्हणून ही मोजपट्टी अर्थहीन आहे. कारण ती निव्वळ संख्यात्मक आहे. आपण आपल्या आयुष्यात गुणात्मक भेद करायला शिकणे महत्त्वाचे आहे. पण जी.एन.पी. च्या मोजमापात त्या गुणवत्तेकडेच नेमके दुर्लक्ष केले जाते.'

असे होण्यामागचे जे कारण शूमाखर सांगतात ते चिंतनीय आहे. ते म्हणतात की, अर्थतज्ज्ञांचा प्रयत्न हा अर्थशास्त्राला पदार्थविज्ञानाप्रमाणे अचूक, काटेकोर आणि गणिती बनवण्याचा आहे. त्यामुळे संख्यात्मकता, मोजमाप ह्याला आत्यंतिक महत्त्व दिले जाते. जे मोजता येत नाही ते; किंवा ज्यांत गुणात्मक भेद आहे ते सरळ दुर्लक्षिले जाते. हेझेल हेंडरसन ह्या भाकीततज्ज्ञ विदुषीने प्रचलित अर्थशास्त्र आणि त्याच्या पद्धती ह्यांवर कडाडून टीका केली आहे. एखादा उद्योग/उपक्रम 'परवडणारा' ठरावा, म्हणून अनेक सामाजिक वा पर्यावरणिक खर्च तो स्वतःच्या ताळेबंदाबाहेर ठेवतो. ते बाहच्यता(externalities) खर्च मानून समाजावर ढकलतो. समाज/सरकारे ते खर्च करतात, नि ते जी. एन. पी. त जमेच्या बाजूला दाखवले जातात. हेंडरसन ह्यांचे असे म्हणणे आहे की, जी.एन.पी. मधील वाढीचा बराच मोठा हिस्सा हा अशा सामाजिक खर्चांचाच आहे. प्रत्यक्ष उत्पादनातील वाढीपेक्षा ह्या खर्चांची वाढच अधिक आहे. ह्या खर्चांची वजावट केली, तर जी. एन. पी. सातत्याने घटताना दिसेल. पण ते खर्च जमेत धरल्याने तो वाढताना दिसतो. वास्तवातील अधःपतन हे गौरवाची बाब बनते.

जी.एन.पी.ची आकडेवारी ही 'सरासरी' असते; त्याखाली अनेक विकृती झाकल्या जातात. असे हेंडरसन म्हणतात : 'दरडोई उत्पन्न मोजण्याच्या प्रकारात वाढते दारिद्र्य, विषमता झाकली जाते नि सरासरी बेकारी सांगताना एखाद्या वांशिक गटातील वा विभागातील खूप मोठी बेकारी लपवली जाते' त्या अमेरिकेचे उदाहरण देतात. जी.एन.पी. नुसार तो अतिश्रीमंत देश आहे. पण तेथील एकपंचमांश मुले दारिद्र्यात जगतात; 3 कोटी लोकांना आरोग्य-विम्याचे संरक्षण नाही; आणि तुरुंगात असणाऱ्यांची टक्केवारी तेथे जगात सर्वात जास्त आहे म्हणूनच अर्थशास्त्र ही बिनबुडाच्या सिद्धांतानी भरलेली एक पोतडी आहे असे त्या म्हणतात आणि म. गांधींचे 'अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य तत्त्वांना वैज्ञानिक म्हणून

स्वीकारणे ह्यासारखी मानवी बुद्धीला लांछनास्पद बाब दुसरी नसेल ' हे मत उद्धृत करतात.

अनेक अर्थतज्ज्ञांनी जी.डी.पी. मधील ह्या त्रुटी मान्य करुन अनेक नवे निर्देशांक सुचवले आहेत. त्यात सामाजिक आणि पर्यावरणिक खर्च हे जमेच्या बाजूला न दाखवता खर्चाच्याच बाजूला दाखवून प्रत्यक्ष वजावट करण्याची सुधारणा आहे. शिवाय केवळ आर्थिक वाढ विचारात घेण्याऐवजी बालमृत्यूचे प्रमाण, सरासरी आयुर्मान, साक्षरतेचे प्रमाण, आरोग्य-सेवांची उपलब्धता, शिक्षणाच्या सोयी, रोजगारांची उपलब्धता अशा अनेक बाबींचा विचार त्यात होतो.

ह्या साऱ्या प्रस्तावित मोजपट्ट्या जी.डी.पी. पेक्षा अधिक व्यापक, वास्तव आहेत हे खरे, पण खरा विकास मोजण्यासाठी त्याही निरुपयोगी आहेत. कारण त्या देखील आर्थिक, भौतिक, मोजमापांतच अडकलेल्या आहेत. अनेक गुणात्मक अशा बाबींचा विचार - त्या परिमेय नसल्याने -ह्या मोजपट्ट्यांतही नाही. मूल्ये, नीती, ह्यांचा विचार त्यात नाही. शोषक, लुटारू, माणुसकीहीन, पर्यावरणसंहारक, अशा व्यक्ती, समाज वा राष्ट्रही ह्या मोजपट्ट्यांनुसार 'विकसित' ठरु शकते ! 'किती'चाच विचार त्यांतही होतो - 'कसे' चा नाही. सद्भावना, सदाचरण, नीतिमूल्य, आचार ह्यांचा त्यांत कोठेही विचार होत नाही. जीवनाची भौतिक बाजूच ते बघतात. 'उपभोक्त्या मानवा'चाच विचार तेही महत्त्वाचा मानतात. उच्च मानवी मूल्यांना, आध्यात्मिक मूल्यांना त्यांच्यातही स्थान नाही. त्याग, संयम, स्वैच्छिक साधेपणा, परस्पर-सहकार्य, सर्वभूती प्रेम, सहिष्णुता, विश्वबंधुता, निसर्गाच्या मर्यादांचा आदर - ह्या कशालाच त्यांच्या विकास संकल्पनेत स्थान नाही. मानवाच्या भौतिकेतर उन्नतीची कल्पनाच त्यांना नाही. असे होण्याचे महत्त्वाचे कारण हेच की, अर्थशास्त्रातील साऱ्या संकल्पना व सिद्धांत हे पश्चिमेकडून आलेले आहेत. तेथे जडवादी पायावर सर्व विचारांची आणि विज्ञानांची उभारणी झाल्यामुळे सर्व वैज्ञानिक विचार हा नीतिनिरपेक्ष, मूल्यनिरपेक्ष असा राहिला आहे. अर्थशास्त्राने 'वैज्ञानिक' बनण्याच्या प्रयत्नांत तेच धोरण स्वीकारले आहे.पण वस्तुत: अर्थशास्त्र हे पदार्थविज्ञान वा गणित ह्यांच्याप्रमाणे 'शुद्ध विज्ञान' नाही. ते मानवाशी, मानवी व्यवहारांशी संबद्ध असे शास्त्र आहे. व्यक्ती, समाज, पर्यावरण ह्यांच्याशी अतूटपणे जोडलेले आहे. त्यामुळे, खरे तर, ह्या साऱ्यांच्या एक सामायिक विकासाचा विचार त्याने केला पाहिजे. पण तसे झालेले नाही. 'मानवाचा विकास म्हणजे त्याच्या उपभोगांचे उच्चतमीकरण' ही जडवादी व्याख्या शिरोधार्य मानून तो दरडोई सेवन, नि म्हणून दरडोई उत्पादन येनकेन प्रकारेण वाढविण्यालाच 'विकास' मानते.

अर्थशास्त्राची ही मर्यादा लक्षात घेतली, तर आपल्या असे लक्षात येईल की, 'विकास' ही मूलत:च एक फार व्यापक संकल्पना आहे. अर्थशास्त्राच्या चौकटीत वा मर्यादात ती सामावली जाऊच शकत नाही. ती संकल्पना केवळ भौतिक नाहीच. तिला अन्य अनेक पैलू आहेत - ज्यांचा विचार अर्थशास्त्र करतच नाही. अन् म्हणूनच मी प्रारंभी म्हटले की, विकासाच्या संकल्पनेचे अर्थशास्त्राने हायजॅकिंग केले आहे.

आज आवश्यकता आहे ती ही संकल्पना अर्थशास्त्राच्या तावडीतून सोडवून आणण्याची. 'उपभोगाचे उच्चतमीकरण हेच मानवी जीवनाचे ध्येय आहे' असे जडवादाला खुशाल मानू दे. तत्त्वज्ञान असे सांगते की, हे ध्येय भौतिक नसून आध्यात्मिक आहे' स्वामी विवेकानंद म्हणतात : 'Goal of Life is to manifest the divinity within.' आपल्यातील देवत्वाचे प्रकटीकरण हे आपल्या जीवनाचे ध्येय आहे. 'मुक्ती', 'आत्मज्ञान' ही त्या स्थितीची नावे. भौतिक

जीवन जगायचे ते हे आध्यात्मिक ध्येय गाठण्यासाठी. त्यात भौतिक जीवनाची, भौतिक समृद्धीची उपेक्षा नाही. पण ते 'साधन' आहे, 'साध्य' नाही ह्याचे भान आहे. भौतिक समृद्धी हे 'साधन' बनले की, अनेक समस्यांचा आपोआप परिहार होतो, लय होतो. व्यक्ती आणि समाज , व्यक्ती आणि पर्यावरण यांच्यातील संघर्ष संपतो. परस्पर सहकार्य, त्यातून सर्वांची सुस्थिती आणि उन्नती अशी चांगली अवस्था येते. व्यक्तीचे उपभोग 'उच्चतम' नव्हे, तर 'इष्टतम' पातळीवर राहिल्याने पर्यावरणाचे शोषण न होता दोहन होते. उपभोग हे साध्य न राहिल्याने मानवी व्यक्तिमत्त्वाच्या भावनिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक पैलूंचा विकास होऊ लागतो. स्वार्थ, स्पर्धा, लुबाडणूक, फसवणूक हे सारे प्रमाणात राहिल्याने सामाजिक दृष्ट्याही ती स्थिती वांछनीय बनते.

ह्या स्थितीला 'विकास' म्हणायचे. तो मूलभूत असेल, सर्वांगीण असेल, एकात्म असेल, एकसामायिक असेल, संतुलित असेल, धारणाक्षम असेल.

असा विकास वास्तवात यायचा, तर 'अर्थशास्त्राच्या' तावडीतून त्याची सोडवणूक व्हावी लागेल, हे निश्चित.

● ● ●

## मराठी अर्थशास्त्र परिषद
## वार्षिक वर्गणीची मुदत संपली असल्यास

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे वार्षिक सदस्य आणि अर्थसंवाद चे वार्षिक वर्गणीदार यांना आम्ही आठवण करुन देऊ इच्छितो की, अर्थसंवादच्या जानेवारी-मार्च 2004 या अंका बरोबर ज्यांची वार्षिक वर्गणीची मुदत संपली आहे त्यांनी 1 एप्रिल 2004 ते 31 मार्च 2005 या वर्षासाठी आपल्या सदस्यत्वाचे आणि अर्थसंवादच्या वर्गणीदाराचे नूतनीकरण करुन घ्यावे ही विनंती. ही वर्गणी कार्यवाह-खजिनदार, सर्जेराव ठोंबरे, औरंगाबाद यांच्या पत्त्यावर पाठवावी.

**सर्जेराव ठोंबरे**
**कार्यवाह-खजिनदार**

# राजर्षी शाहूप्रेरित कामगार संघटनेची चळवळ : एक सैद्धांतिक आढावा

● श्रीनिवास. बी. जाधव
*अधिव्याख्याता, अर्थशास्त्र विभाग,*
*शिवराज कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स व डी. एस. कदम कॉलेज ऑफ सायन्स, गडहिंग्लज. जि. कोल्हापूर*

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक अधिवेशनातील चर्चासत्रात सादर केल्या जाणाऱ्या सर्वोत्कृष्ट निबंधासाठी 'ग.प्र. पिंपरकर पारितोषिक' आणि कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ति प्रतिष्ठान 'अमर्त्य सेन पारितोषिक' अशी दोन पारितोषिके देण्यात येतात. ठाणे जिल्ह्यातील पालघर येथे संपन्न झालेल्या, सत्ताविसाव्या अधिवेशनातील पारितोषिक प्राप्त निबंध.

## 1.कामगार संघटनेची चळवळ : सैद्धांतिक पार्श्वभूमी

मानवी इतिहासात पूर्वापार चालत आलेल्या समुदाय अधिष्ठित प्राथमिकस्वरुपी उत्पादनपद्धतीची जागा कालांतराने गुलाम-अधिष्ठित उत्पादनपद्धतीने आणि त्यानंतर सरंजामशाहीने घेतली. सरंजामशाही शिखरावर असतानाच व्यापारी भांडवलशाहीचा उदय झाला. सरंजामशाही समाजरचना असलेल्या मध्ययुगीन युरोपामध्ये वाढत्या शेतीउत्पादनामुळे प्रथम कृषीउद्योगांना चालना मिळाली आणि त्यातून औद्योगिक क्रांतीचा जन्म झाला. या क्रांतीने यथावकाश औद्योगिकरण आणि श्रमिक चळवळ यांना जन्म दिला. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापासून मात्र वाढत्या औद्योगिकरणाच्या प्रभावामुळे प्रस्थापित राजकीय, सामाजिक व आर्थिक समीकरणांची उलथापालथ झाली आणि श्रमिक चळवळीला कामगार संघटनेची चळवळ म्हणून ओळखले जाऊ लागले.

कामगार संघटनेच्या चळवळीचा उदय झाल्यापासून अनेक तत्त्वज्ञ आणि समाजशास्त्रज्ञांनी या संघटनांच्या अस्तित्वाचे सैद्धांतिक विश्लेषण केले आहे. त्यापैकी काही निवडक सिद्धांताचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे :

कार्ल मार्क्स व लेनिन यांनी मांडलेल्या क्रांतिसिद्धांतानुसार कामगार चळवळीचा इतिहास हा सधन उच्चवर्गीय मालक आणि निर्धन कामगार यांच्यातील वर्गकलहाचा इतिहास आहे. वाढत्या औद्योगिकरणामुळे निर्माण होणारा वाढता कामगार वर्ग कालांतराने श्रमाच्या मोबदल्याची पातळी उंचावण्यास आणि मालकवर्गाकडून होणाऱ्या शोषणाला विरोध करण्यासाठी संघटित होतो. कामगारांची संघटना क्रांतिद्वारे उच्च वर्गाचे जोखड झुगारुन देते आणि उत्पादन साधनावर सामाजिक मालकी आणि समाजामध्ये आर्थिक समानता आणते. कामगारांच्या मागण्यांची पूर्तता वैधानिक व प्रशासकीय सुधारणामार्फत करण्यामुळे या आर्थिक कलहाला राजकीय स्वरूप प्राप्त होते.[1]

मालकवर्गाकडून अधिकाधिक सवलती मिळविण्याची आणि उद्योगामध्ये लोकशाही स्थापन करण्याची कामगार संघटनेची ताकद यावर सिडनी

व बिॲट्रीस वेब यांचा औद्योगिक लोकशाही सिद्धांत विशेष भर देतो. श्रमाच्या मोबदल्याची पातळी उंचावणे आणि श्रमाचे तास कमी करणे हे कामगार संघटनांचे तात्कालिक लक्ष्य असते, तर राजकीय चळवळीद्वारे आर्थिक गुलामगिरीतून कामगारांची मुक्तता करणे हे त्यांचे दूरगामी लक्ष्य असते.[2]

जे. बी. एस्. हार्डमनच्या सत्तासिद्धांतानुसार कामगार संघटना या वास्तवात सत्ता संघटना आहेत. त्यामुळे त्या उद्योगक्षेत्रात आणि समाजात आपला प्रभाव वाढविण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. उद्योगाच्या उपक्रमांमध्ये समाधानकारक हिस्सा मिळविण्याच्या त्यांचा प्रयत्नामुळे त्यांचा मालकवर्गाबरोबर सत्ताकलह सतत सुरू असतो. जे. के. गालब्रेथने या संदर्भात मांडलेल्या सिद्धांतानुसार कार्यस्थळी मालकाच्या हाती एकवटलेल्या एकतंत्री सत्तेला विरोध करण्यासाठी कामगार संघटना उदयास येते आणि ती कालांतराने समाजामध्ये कामगार समुदायाची प्रतिसत्ता बनते.[3]

सॅम्युएल गॉम्पर्स यांनी मांडलेल्या व्यावसायिक प्रतिनिधी सिद्धांतानुसार कामगार हे कामाच्या ठिकाणी असलेली परिस्थिती व तेथील दैनंदिन संबंधांच्या नियंत्रणाबाबत, मालकासमोर कामगारांच्या हिताचे रक्षण करणारा व्यावसायिक प्रतिनिधी या दृष्टीने कामगार संघटनेकडे पाहतात.[4]

रॉबर्ट होझीचा कृतिशीलता सिद्धांत असे नमूद करतो की कार्यस्थळी निर्माण होणाऱ्या कामगारांच्या विविध गरजांची परिपूर्ती करण्यासाठी कामगार संघटनेची निर्मिती होते. मात्र या गरजांच्या स्वरूपाप्रमाणे संघटनेला वेगवेगळी रूपे धारण करावी लागतात.[5]

'कामगार चळवळ ही नेहमीच भांडवलशाहीच्या विरोधातील प्रतिक्रिया असते' या कल्पनेवर आधारलेला पर्यावरण सिद्धांत विकसित करताना जॉन कॉमन्स म्हणतात की कार्यस्थळी अस्तित्वात असलेले वातावरण कामगार संघटनेच्या स्वरुपावर निर्णायक प्रभाव टाकते.[6]

सेलिग पर्लमनच्या मानसशास्त्रीय सिद्धांतानुसार, कामगार संघटनेच्या उदयामागे कामगारांची मानसिक ठेवण जबाबदार असते. त्यांची नोकरीबाबतची मानसिक असुरक्षितता आणि निराशावादी दृष्टीकोन यांच्या फलस्वरुपी कामगार संघटनेचा उदय होतो.[7]

फ्रॅन्क टॅनेनबॉमचा तंत्रविज्ञान सिद्धांतानुसार, उत्पादनाच्या यांत्रिक साधनांच्या आविष्कारामुळे पारंपरिक कामगारांची त्यांच्या समाजापासून ताटातूट होते आणि कामगार कामाच्या ठिकाणी त्यांच्यापासून दुरावलेला समाज शोधू लागतात. त्यातून निर्माण होणाऱ्या कार्यात्मक गटालाच लौकीकदृष्ट्या कामगार संघटना म्हटले जाते.[8]

हेरॉल्ड लास्कीचा सामाजिक संबंध सिद्धांत कामगार संघटनेकडे राजकीय संघटन म्हणून पाहतो. हे संघटन कामाच्या ठिकाणी अस्तित्वात असलेल्या विविध सामाजिक संबंधाची फेरजुळवणी करण्यासाठी सतत प्रयत्नशील असते आणि त्यातूनच राष्ट्राचे कामगारविषयक धोरण विकसित होते.[9]

व्यापक औद्योगिकरण झालेल्या समाजातील वेगवेगळ्या संघटनविषयक सिद्धांताचे विश्लेषण करुन मार्क पर्लमनने कामगार संघटनाबाबत मांडलेल्या बहुविध घटक सिद्धांता अन्वये कामगार संघटनांचा उदय व विकास यासाठी जरी अनेक घटक जबाबदार असले, तरी विशिष्ट परिस्थितीमध्ये एखादा विशेष घटक किंवा घटकांचा समूह तुलनात्मकदृष्ट्या अधिक प्रभावी ठरतो. या संघटनेचे स्वरूप व कृतिशीलता अपेक्षित सामाजिक बदल घडवून आणण्याची निकड आणि बदलाची व्यापकता यांवर अवलंबून असते.[10]

महात्मा गांधींच्या विश्वस्त सिद्धांतानुसार भांडवलदार मालकवर्गाने कामगार संघटनेच्या माध्यमाने कामगारांच्या नैतिक व बौद्धिक उन्नतीसाठी कृतिरत असले पाहिजे. जर मालकवर्ग याबाबतीत कामगारांनी त्यांच्यावर ठेवलेल्या विश्वासास पात्र ठरला नाही तर क्रांतीचा उद्‌भव होण्याचा संभव असतो.

काळाच्या ओघात, वरीलपैकी काही सिद्धांत त्यांची लक्ष्ये साध्य करण्यात अपुरे पडल्याचे आढळते, तर काही सिद्धांताची अद्याप पूर्ण पारख झालेली नाही.

## 2. राजर्षी शाहू छत्रपती व कामगार संघटना

कोल्हापूर संस्थानातील पहिल्या कामगार कलहाची नोंद सन 1844 मध्ये सापडते. त्यावेळी संस्थानाच्या अधिपत्याखाली एकवीस किल्ले (गड) होते. अस्थिर समयी गडावरील सैनिक मुख्य संस्थान व परकीय आक्रमक यांच्यामध्ये तटबंदी म्हणून उभे राहात. गडकरी जरी संस्थानचे नोकर होते तरी गडाजवळील प्रदेशावर त्यांचीच हुकूमत चालत असे. जुलै 1844 मध्ये इंग्रजांनी नेमलेल्या संस्थानाच्या कारभाऱ्याने प्रशासकीय खर्च कमी करण्याच्या निमित्ताने गडावरील शिबंदी निरुपयोगी ठरवली. याची प्रतिक्रिया म्हणून गडकऱ्यांनी एकापाठोपाठ एक बंडे केली इंग्रजांनी कठोरपणे ही बंडे मोडून काढली आणि संस्थानाच्या कारभारात आणखी खोलवर शिरकाव केला. इंग्रजांचा या प्रकरणातील हेतू वगळल्यास हे स्पष्टपणे जाणवते की आर्थिक, सामाजिक व राजकीय परिमिती असलेले मालक नोकर संघर्षाचे कोल्हापूरच्या इतिहासातील हे पहिले उदाहरण आहे.[12]

सन 1857 मध्ये, संस्थानातील बंडखोरांनी ऑगस्ट महिन्यात दोन आठवड्यासाठी कोल्हापूर शहर इंग्रजी सत्तेपासून मुक्त केले होते. इंग्रजांना नजीकच्या बेळगाव शहरातून सैनिकी कुमक मागवायची होती. पण त्यांच्या नोकरीत असलेला स्थानिक तारमास्तर (टेलिग्राफिस्ट) देशभक्तीच्या कारणास्तव संपावर जाऊन पळून गेला. इंग्रजांनी कशीबशी परिस्थिती सावरली, त्या संपकरी तारमास्तरला पकडले आणि गोळ्या घालून ठार मारले.''

मालक-नोकर संघर्षाचा तिसरा प्रसंग सन 1905 मध्ये घडला. त्यावर्षी कोल्हापूर नगरपालिकेच्या सफाई कामगारांनी काही मागण्यांसाठी उत्स्फूर्त संप पुकारला. नगरपालिकेच्या दरबार नियुक्त प्रशासकांनी मुंबईहून सफाई कामगार आणवून तो संप मोडून काढला. ब्रिटिश अधिकाऱ्यांची तेव्हा संस्थान प्रशासनावर जबरदस्त पकड होती, त्यामुळे मोर्चे, निदर्शने, मिरवणूका अशा गोष्टींचा प्रश्नच नव्हता.''

या तीन घटनांमधून परिस्थितीचा दबाव आणि प्रस्थापितांविरुद्ध संघर्ष करण्याचा श्रमिकांचा सुप्त मानसिक कल यांचे दर्शन होते. परंतु या संघर्षामध्ये दीर्घकाळ लढा देण्यासाठी आवश्यक असलेले संघटन आणि पूर्वनियोजन यांचा अभाव आढळतो.

सन 1906 मध्ये राजर्षी शाहू महाराजांच्या पुढाकाराने श्री शाहू छत्रपती स्पिनिंग व विव्हिंग मिलसची स्थापना झाली. त्याच सुमारास कोल्हापूर हे उद्योगधंद्यांचे शहर म्हणून नावारुपास येऊ लागले आणि चर्मउद्योग, तेलगिरण्या, विद्युत उत्पादन, सिनेमाउद्योग, यांत्रिक अवजारांची दुरुस्ती असे अनेक छोटे मोठे उद्योग साकारले. ब्रिटिश हद्दीतील शहरी कामगारांमध्ये संघटित होण्याची जाणीव याच काळात रूजू लागली. मात्र कोल्हापूर संस्थानातील उद्योगांचे शेतीवरील अवलंबित्व आणि कामगारांची शेतकरी कुटुंबाची पार्श्वभूमी यामुळे या कामगारांना संघटित होण्याची निकड वाटत नव्हती.[15]

शाहू महाराजांना कष्टकरी वर्गाबद्दल अपार कणव व दीनदुबळ्यांबद्दल कळकळा वाटत असे. या तळागाळातल्या लोकांचे जीवनमान उंचाविण्यासाठी त्यांचे प्रयत्न सतत चालू असत. राजर्षींनी या लोकांच्या दीर्घकालीन हिताच्या दृष्टीने अनेक संस्था स्थापन केल्या. त्यांना राजाश्रय दिला आणि आर्थिक मदतीबरोबर वैचारिक मार्गदर्शनही केले.

कामगार संघटनेच्या संदर्भात शाहू महाराजांनी नोव्हेंबर 1918 मध्ये मुंबईत दिलेली दोन भाषणे विशेष उल्लेखनीय आहेत. महाराजांचे चरित्रकार दिवाण अण्णासाहेब लठ्ठे लिहितात, मुंबईतील 'लोकसंघटना' या संस्थेबद्दल शाहू महाराजांच्या मनात जिव्हाळा निर्माण झाला होता. दहा व चोवीस नोव्हेंबर 1918 रोजी भरलेल्या या संस्थेच्या दोन सभांचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आणि आपल्या भाषणांनी कामगार कल्याणाचे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या मनात मोठा आवेश निर्माण केला. चोवीस तारखेच्या सभेमध्ये त्यांनी कामगारांनी स्वतःच आपली उन्नती कशी करुन घ्यावी यासंबंधी स्पष्ट कल्पना मांडल्या .......

छत्रपतींच्या या दोन्ही भाषणातून कामगारांच्या प्रश्नांबद्दल त्यांची निकड जाणवते आणि ज्या कौशल्याने त्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले त्यातून त्यांचा कामगारांबद्दलचा कळवळा अधिकच स्पष्ट होतो, ''ऐक्य, परस्परप्रेम, विश्वास आणि चिकाटी ही आमची शस्त्रे असली पाहिजेत.'' त्या 'आमची' या शब्दाने वक्ता व श्रोता यातील द्वैत नाहीसे केले.

महाराज कामगारांना त्यांच्या सुप्त ताकदीची जाणीव करुन देताना म्हणतात,'' पाश्चात्त्य देशात भांडवलदार व मजूर पक्षांचे भांडण चालले आहे. मजूर पक्षाच्या हाती राज्यकारभार बहुतांशी जाणे असा परिणाम या युद्धाचा झाला आहे.'''आपण अडाणी व अशिक्षित आहा. आपणाला सुव्यवस्थित रीतीने काम करण्याची सवय लागणे जरुर आहे.' असे सांगून ते परिस्थिती कशी बदलता येईल याचे मार्गदर्शन करतात ''येथेही इंग्लंडप्रमाणे मजुरांचे संघ झाले पाहिजेत व सर्वांस आपले हक्क काय आहेत, हे कळले पाहिजे.''असे ते म्हणतात.

शाहू महाराजांच्या या विचारांनी अनेक कामगार कार्यकर्त्यांना स्फूर्ती दिली. प्रसिद्ध कामगार नेते श्री. दत्ता देशमुख यांचा मते छत्रपती शाहूंच्या या राजाज्ञे मुळे कोल्हापूर पुढील पन्नास वर्षात महाराष्ट्राच्या शहरी व ग्रामीण भागात सर्वदूर पसरलेल्या कामगार संघटनांची गंगोत्री बनले.[17]

राजर्षी शाहू महाराज यांच्या मृत्यूनंतरच्या पुढील पन्नास वर्षात त्यांच्या विचारांनी प्रभावित झालेल्या कामगार कार्यकर्त्यांची मोठी फळी कोल्हापुरात तयार झाली आणि तिने कामगार चळवळीला चालना दिली व कामगारांसाठी समाजात मानाचे स्थान निर्माण केले.

कोल्हापूरच्या कामगार संघटना चळवळीचा उदय आणि विकास यांचा इतिहास अनेक रोमांचक,वेगवान आणि अनेकदा अतर्क्य घटनांनी परिपूर्ण आहे. त्यामध्ये कोल्हापूर संस्थान प्रजा परिषद या राजकीय संघटनेने आणि शेतकरी-कामगार पक्ष या राजकीय पक्षाने अनेकदा निर्णायक भूमिका बजावल्या आहेत.

कोल्हापूर संस्थानातील पहिली कामगार संघटना ''कोल्हापूर बिडी वर्कर्स युनियन'' 11 डिसेंबर 1944 रोजी नोंदवली गेली. 1 एप्रिल 1949 रोजी कोल्हापूर संस्थान हे भारतीय संघराज्यात विलीन झाले. त्यावेळी नोंदणीकृत संघटनांची संख्या बारापर्यंत वाढली होती. यानंतर मात्र कामगार संघटना चळवळीने चांगलाच जोर धरला आणि 1960 मध्ये महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपर्यंत नोंदणीकृत संघटनांची

संख्या 51 झाली होती. त्यानंतरही सातत्याने संघटनांच्या संख्येत वाढ होऊन सन 1990च्या अखेरीस त्यांची संख्या 202 झाली. आर्थिक उदारीकरणाचे व जागतिकीकरणाचे वारे वाहू लागल्यावर मात्र संघटनांच्या संख्यात्मक वाढीचा वेग घटलेला आढळतो.[18]

### 3. कोल्हापूर कामगार संघटनांच्या उदयाचे सैद्धांतिक विश्लेषण

कार्ल मार्क्सचा क्रांती सिद्धांत केवळ अल्प प्रमाणात कोल्हापूरच्या कामगार चळवळीला लागू पडतो. निर्धन कामगारवर्ग त्यांच्या हिताच्या समानतेमुळे शोषणाविरुद्ध संघटित झाला आणि त्याने प्रजा परिषद या राजकीय संघटनेद्वारे प्रस्थापित सत्ता उलथविण्याचा प्रयत्न केला. पण या संघटित कामगारांना उत्पादन साधनांवर सामाजिक मालकी, नको होती, तर फक्त जबाबदार, प्रातिनिधीक (आणि काही अंशी कल्याणकारी) प्रशासन हवे होते. कामगारांच्या शेतकरी कुटुंबाच्या पार्श्वभूमीमुळे ते नोकरीच्या मोबदल्याकडे शेतीउत्पन्नास पूरक उत्पन्न म्हणून पहात असत. या सिद्धांताचे कोल्हापूरात अर्धवट सिद्धतेचे हे मुख्य कारण संभवते.

सिडनी व बिॲट्रीस वेब यांचा औद्योगिक लोकशाही सिद्धांत कोल्हापूरात काहीसा अधिक प्रमाणात सिद्ध झाला आहे. कामगार वर्ग संघटनांच्या छत्राखाली संघटित होत असतानाच त्याने शेतकरी-कामगार पक्ष या राजकीय पक्षाला देखील आश्रय दिला होता. परंतु या पक्षाच्या शहरी नेत्यांना औद्योगिक लोकशाही स्थापन करण्यापेक्षा राज्यसत्ता हस्तगत करण्याची अधिक निकड वाटत होती. त्यामुळे या सिद्धांतात अभिप्रेत असलेल्या आर्थिक गुलामीचे उच्चाटन आणि श्रमिक संघटनांच्या माध्यमाने सामाजिक पुनर्रचना ही इप्सिते साध्य होऊ शकली नाहीत.

फ्रॅन्क टॅनेनबॉमच्या तंत्रविज्ञान सिद्धांताला कोल्हापुरात स्थान मिळाले नाही. येथील सुरूवातीच्या काळातील औद्योगिकरण प्राथमिक स्वरूपी तंत्रज्ञानावर आधारित व कृषीशी निगडित होते. कृषी क्षेत्रातूनच या औद्योगिकरणाला आर्थिक व मनुष्यबळ पुरवठा होत होता. आजमितीसदेखील बहुसंख्य औद्योगिक कामगारांची व त्यांच्या संघटनेच्या नेत्यांची नाळ आजूबाजूच्या कृषीप्रधान ग्रामीण भागाशी दृढपणे जोडलेली आहे. त्यामुळे टॅनेनबॉमला अभिप्रेत असलेली 'उत्पादनाच्या यांत्रिक साधनाच्या आविष्कारामुळे कामगाराची त्याच्या समाजापासून होणारी ताटातूट' येथे घडून आली नाही.

जॉन कॉमन्सचा पर्यावरण सिद्धांत आणि मार्क पर्लमनचा बहुविध घटक सिद्धांत हे दोन्ही कोल्हापूरात पूर्णपणे सिद्ध झाले आहेत. येथील कामगार चळवळ खरोखरच भांडवलशाहीला विरोध व अनिर्बंध शोषणाची प्रतिक्रिया म्हणून जन्मास आली; शोषणपूरक प्रशासकीय वातावरण हा त्यामध्ये महत्त्वाचा घटक होता. मालकवर्गाचा जुलूम, अपुरे वेतन, कामाच्या ठिकाणची वाईट परिस्थिती, त्याचबरोबर देशातील स्वातंत्र्यसंग्राम आणि दुसरे महायुद्ध यांच्या काळातील अस्थिर वातावरण, शिक्षणाचा व तंत्रज्ञानाचा वाढता प्रसार, वाढते औद्योगिकरण आणि कामगारांमधील संघटनविषयक वाढती जाणीव हे पर्लमनला अभिप्रेत असलेले इतर घटक होत. या संघटनांना जबाबदार, प्रतिनिधिक संस्थाना प्रशासनामार्फत कामगारांना अनुकूल वैधानिक व प्रशासकीय सुधारणा होणे एवढाच माफक सामाजिक बदल, यथोचित समयी अपेक्षित होता आणि त्यासाठी त्यांनी मध्यम तीव्रतेची आंदोलने चालविली होती.

### 4. कोल्हापुरातील कामगार संघटनांच्या विकासाचे सैद्धांतिक विश्लेषण

हार्डमनचा सत्ता सिद्धांत आणि गालब्रेथने

सुचविलेला उपसिद्धांत हे कोल्हापुरातील कामगार संघटनांच्या विकास प्रक्रियेमध्ये सिद्ध झालेले आढळतात. कामगारांचे औपचारिक व अनौपचारिक संघ अस्तित्वात आल्यावर त्यांनी उद्योगाच्या उपक्रमांमध्ये समाधानकारक हिस्सा मिळविण्याचा प्रयत्न सुरु करताच त्यांचा मालकवर्गाबरोबर सत्ताकलह सुरु झाला. संघटनांनी प्रथमत: पगारवाढ, बोनस आणि कामगार कल्याण सवलती विषयक मागणी केली. कालांतराने त्यांनी संपाचे शस्त्र वापरुन संपूर्ण शहरास वेठीस धरले. अशा प्रकारे समाजात कामगार संघटनांची प्रतिशक्ती निर्माण झाली.

सॅम्युएल गॉम्पर्स यांचा व्यावसायिक प्रतिनिधी सिद्धांत देखील कोल्हापुरच्या कामगार संघटना चळवळीत सिद्ध झाल्याचे आढळते. संस्थानामध्ये अमलात आणलेला औद्योगिक विवाद कायदा (1942)आणि कामगार संघटना कायदा (1944) यांच्यानुसार कामगार संघटनांना कामाच्या ठिकाणची परिस्थिती व तेथील दैनंदिन संबंधाच्या नियंत्रणाबाबत शासनदरबारी व मालकवर्गासमोर कामगारांच्या हिताचे रक्षण करणारा व्यावसायिक प्रतिनिधी म्हणून मान्यता मिळाली. रॉबर्ट होझीचा कृतीशीलता सिद्धांत देखील या परिस्थितीत सिद्ध झाल्याचे आढळते.

सेलीग पर्लमनचा मानसशास्त्रीय सिद्धांत या चळवळीत पूर्णांशाने सिद्ध झाल्याचे दिसते. कामगार संघटनांचा उदय आणि विकास यामध्ये कामगार संरक्षक कायद्यांच्या अभावामुळे कामगारांची नोकरीबाबतची मानसिक असुरक्षितता आणि अस्थिर राजकीय व सामाजिक परिस्थतीमुळे तयार झालेला निराशावादी दृष्टीकोन यांनी मोठाच हातभार लावला.

हेरॉल्ड लास्कीचा सामाजिक संबंध सिद्धांत या चळवळीत अंशत: सिद्ध झाल्याचे आढळते. देशातील नोकरशाही राज्यव्यवस्थेचे प्रतिबिंब कामगार संघटनांच्या रचनेमध्ये पडले आहे. तसेच बहुतेक उद्योगामध्ये मालक व संघटना यांचे कामाच्या ठिकाणी असलेल्या संबंधाचे स्वरुप त्यांच्या बाहेरच्या समाजात असलेल्या संबंधावर अवलंबून असल्याचे दिसते.

अंतिमत:, खेदपूर्वक नमूद करावे लागते की महात्मा गांधींच्या कामगार कल्याणाभिमुख विश्वस्त सिद्धांताची सिद्धता झाल्याचे येथे आढळून येत नाही. कोल्हापुरच्या उद्योगविश्वात दयाळू वृत्तीचे अनेक मालक निश्चितच आहेत, परंतु विश्वस्ताच्या सेवाभावी वृत्तीने आपल्या कामगारांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी कार्यरत असलेला मालक मात्र येथे आढळून येत नाही.

## संदर्भ

1. मार्क्स, कार्ल : '' दि पॉव्हर्टी ऑफ फिलॉसॉफी'', उदधृत लोझोव्हस्की, ए.(1944) : ''मार्क्स अँड दि ट्रेड युनियन्स'', कलकत्ता : रॅडिकल बुक क्लब, पृ.24. पहा हे देखील : लेनिन, व्ही. आय. ''व्टोदेलात?'' (व्हाट इज टू बी डन?), उदधृत : बटलर, ऑर्थर डी. (1961)''लेबर इकॉनॉमिक्स् अँड इस्टिट्यूशन्स'', न्यूयॉर्क : दि मॅकमिलन कंपनी, पृ. 144.

2. वेब, सिडनी व बिॲट्रीस वेब (1950 आवृत्ती): ''दि हिस्टरी ऑफ ट्रेड युनियनिझम'', लंडन : लॉंगमन ग्रीन अँड कंपनी, पृ. 717-18.

3. पर्लमन, मार्क (1958) : ''लेबर युनियन थिअरीज इन अमेरिका'', इव्हॅन्स्टन, इलिनॉय : रो पीटर्सन अँड कंपनी पृ.212.

4. फोनर पी. एस. (1947) : ''ए हिस्टरी ऑफ दी लेबर मुव्हमेंट इन दि युनायटेड स्टेटस्'' न्यूयॉर्क : इंटरनॅशनल पब्लिशर्स पृ. 10-11.

5.होझी, रॉबर्ट एफ. (1920) : ''ट्रेड युनियनिझम इन दि युनायटेड स्टेटस्'' न्यूयॉर्क : ॲपलटन अँड

कंपनी, पृ.58.

6. कॉमन्स, जॉन आर., उदधृत : झा, एस्.सी. (1970 : 'दि इंडियन ट्रेड युनियन मुव्हमेंट)'', कलकत्ता : फर्मा के. एल. मुखोपाध्याय, पृ. 15.

7. पर्लमन, सेलिग (1949): '' ए थिअरी ऑफ दि लेबर मुव्हमेंट'', न्यूयॉर्क : ऑगस्टस् एम. केली, पृ. 10.

8. टॅनेनबॉम, फ्रॅन्क : ''लेबर मुव्हमेंट - इटस कॉन्झरवेटीव्ह फन्कशनल सोशल कॉन्सिक्वेन्सेस'', न्यूयॉर्क : आल्फ्रेड के नॉफ, पृ.29 पहा हेदेखील : फ्रॅन्क (1952) : '' ए फिलॉसॉफी ऑफ लेबर'', न्यू यॉर्क : आल्फ्रेड के नॉफ, पृ. 106.

9. लास्की, हेरॉल्ड जे. (1950) : ''ट्रेड युनियन्स इन दि न्यू सोसायटी'', लंडन : ॲलन अँड अनविन लिमिटेड, पृ. 39-40.

10. पर्लमन, मार्क (1958), उपरोक्त, पृ. 213.

11. गांधी, एम्. के. : उदधृत: पुणेकर, एस्. डी. (1963) '' गांधीयन ॲप्रोच टू लेबर प्रॉब्लेम्स'', 'दि इंडियन जर्नल ऑफ लेबर इकॉनॉमिक्स,' जानेवारी, पृ. 421.

12. पाटील, बाजीराव एस. (1997) : ''ए हिस्टरी ऑफ ट्रेड युनियन मुव्हमेंट इन कोल्हापूर'', कोल्हापूर: बी. एस.पाटील, पृ.42.

13. तत्रैव, पृ. 42-43.

14. धारुकर, वि.ल. (1981) : ''कोल्हापूर नगरपालिका ते महानगरपालिका : स्थानिक स्वराज्य संस्थेची वाटचाल'', : 'कोल्हापूर महानगरपालिका- नववा वर्धापन दिन स्मरणिका'(संपादक : सु.ध. चौगुले), कोल्हापूर : कोल्हापूर महानगरपालिका, पृ.9.

15. पाटील, बाजीराव एस. (1997): ''कोल्हापूरचे कामगार संघटना नेतृत्व : इतिहास, वर्तमान व भविष्य'', कोल्हापूर : बी. एस. पाटील, पृ.42.

16. लठ्ठे, ए. बी. (1924) : ''मेम्मॉयर्स ऑफ हिज हायनेस श्री शाहू छत्रपती महाराज ऑफ कोल्हापूर'' (भाग-2), मुंबई : टाईम्स ऑफ इंडिया प्रेस, पृ. 575.

17. देशमुख, दत्ता (1993) : 5/9/1993 रोजी कोल्हापूर येथे दिलेल्या भाषणातून.

18. उपनिबंधक (कामगार संघटना), पुणे विभाग, पुणे यांच्या कार्यालयातील अभिलेख.

●●●

## तुमचा पत्ता बदलला आहे काय ?

परिषदेच्या कार्यालयाकडे आपल्या ज्या पत्त्याची नोंद आहे त्यामध्ये काही बदल असल्यास ताबडतोब आपला नवीन पत्ता कार्यवाहांच्या कार्यालयाकडे कळवावा. परिषदेच्या सर्व सदस्यांनी याबद्दल जागरूक राहावे ही विनंती

**सर्जेराव ठोंबरे**
कार्यवाह-खजिनदार

# जागतिकीकरण : एक पुनरीक्षण

● शि.ना. माने, *सातारा.*
*भूतपूर्व अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद.*

कंपन्यांच्या 'स्वगृह आधाराचे' (home base) किंवा माहेर घराचे कार्य स्पष्ट करताना मायकेल इ. पोर्टर म्हणतात, ''आंतरराष्ट्रीय आघाडीच्या पहिल्या फळीवर असतात कंपन्या, राष्ट्रे नव्हे. जागतिक भूमिकेतून त्यांना (कंपन्यांना) मोठ्या प्रमाणात स्पर्धा करावीच लागते. तथापि राष्ट्राची जागा जागतिकीकरण घेत नाही.....तंत्रविद्येत व पद्धतींत जलद गतीने नवप्रवर्तन करण्याच्या कंपनीच्या क्षमतेला स्वगृह आधार आकार देतो..... ती एक अशी जागा आहे की जिच्यापासून अखेरीस स्पर्धात्मक फायदा निर्माण होतो, व जिच्यामुळे त्याचे पोषण केले जाते. जागतिक व्यूह माहेरघराच्या आधारावर निर्मित स्पर्धात्मक फायद्याची पुरवणी करतो (supplements) व त्याला घट्ट करतो; तो (स्पर्धात्मक फायदा) केक नसून त्यावरील आइसिंग आहे.''[1] दुसऱ्या शब्दात, कंपनीचे माहेरघर प्रमुख असून स्पर्धात्मक फायदा त्याचा दुय्यम म्हणून कार्य करतो. 1990 मध्ये पोर्टर यानी केनिकी ओह्मा याना दिलेले हे उत्तर आहे. त्याचे स्पष्टीकरण असे की ओह्मा यानी त्यांच्या ''द बॉर्डरलेस वर्ल्ड'' (1985) मध्ये केलेला देशापेक्षा स्पर्धा जास्त महत्त्वाची असते, हा युक्तिवाद पोर्टर यांना खोडून काढावयाचा होता.

पोर्टर यांची ही टीका ध्यानात घेऊन ओह्मा यानी त्यांच्या ''ग्लोकलायझेशन''(2003) मध्ये आपल्या दृष्टीकोनात बदल केला असावा. देशातील किंवा जागतिक पातळीवरील स्पर्धेविषयीच्या त्यांच्या बदललेल्या भूमिकेचे सार पुढीलप्रमाणे सांगता येईल: एका बाजूला स्थानिक अर्थव्यवस्था व त्या प्रदेशात उत्पादित शेतीमाल व दुसऱ्या बाजूला जागतिक विपणन यांच्यामध्ये दुवा निर्माण करण्यावर जोर देण्यात आला आहे. जपानचा शेतकरी तांदळाचे उत्पादन करतो. त्यावर 'कोशिहिकारी तांदूळ' असा छाप मारतो. छापनाममहिम्यामुळे त्याच्या तांदळाला सरासरी 30 टक्के जास्त भाव मिळतो. छाप व जागतिक बाजार यांच्यामुळे शेतकऱ्याला स्पर्धात्मक फायदा मिळतो. तांदळाच्या मूल्यात वाढ होते. अशाप्रकारे, केनिकी ओह्मा यानी स्थानिक तांदूळ व विदेशी बाजार यांच्या दुव्याच्या माध्यमातून 'ग्लोकलायझेशन' ही संज्ञा विकसित केली. त्या संज्ञेचे तात्पुरत्या स्वरूपातील मराठी पर्याय म्हणून

विश्वगामीस्थानिकीकरण, विश्ववेधीस्थानिकीकरण, विश्वक्षेपीस्थानिकीकरण, इत्यादी शब्द सूचवू इच्छितो. भारतातील सर्वसाधारण शेतकरी पेरणी, कापणी व मळणी करतो. धान्य पोत्यात भरून बैलगाडीत टाकतो. गाडी तालुक्याच्या वा जिल्ह्याच्या कृषि उत्पादन बाजार आवारात लावतो. आणि मिळेल त्या किंमतीला धान्य विकून मोकळा होतो. तो जर ऊस उत्पादक असेल, तर साखरेचे उत्पादन कारखान्यात होत नसून ते शेतात होते, या जटिल अर्थशास्त्रापासून तो आजही दूर राहातो. आज भारतात काही शेतीमालाचे अपवाद सोडल्यास ('युरोप' द्राक्षे, 'बासमती' तांदूळ इत्यादी) बऱ्याच शेतीमालांना प्रादेशिक/भौगोलिक विशिष्टता लाभ उपलब्ध होऊनही शेतकरी यांचे रुपांतरण स्पर्धात्मक फायद्यात करु शकत नाही. उदाहरणार्थ, 'सिहोर' गहू (ज्या छापाचा फायदा व्यापारी घेतो, शेतकरी नव्हे), बुद्धिहाळची (निपाणी) वांगी, नागपूरची संत्री, संकेश्वरची मिरची, सांगोल्याची डाळींबे, इत्यादी.

ओह्मप्रणित विश्वगामीस्थानिकीकरण संकल्पनेने तथाकथित जागतिकीकरणाच्या एका नवीन आयामावर प्रकाश टाकला आहे. त्याचे पुढील तीन परिणाम संभवतात. (1) जागतिक वस्तू (विदेशी बाजारात विकली जाणारी वस्तू) व स्थानिक वस्तू यांच्यातील विरोध किंवा अंतर हळुहळु कमी होउ शकते. (2) विशेषत: विकसनशील देशांच्या स्पर्धात्मक क्षमतांच्या संदर्भात जागतिकीकरणाविषयीच्या टोकाच्या किंवा अतिशयोक्त विरोधाचा (शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा, त्याची आत्महत्या, कुपोषण, वंचितता, इत्यादी) पुनर्विचार आवश्यक ठरतो. (3) तिसरा महत्त्वाचा परिणाम म्हणजे कालौघात (1985-2003) केनिकी ओह्मा त्यांच्या सुरुवातीच्या टोकाच्या भूमिकेपासून एक पाऊल मागे सरकले आहेत. आपण मागे उल्लेख केल्याप्रमाणे स्पर्धेच्या तुलनेत त्यानी देश किंवा प्रदेश याला दुय्यम मानले. आज एक पाऊल मागे घेऊन पोर्टर यांच्या आर्थिक भूगोलाच्या संकल्पनेशी त्यानी अंशत: जुळवून घेतले आहे. काय आहे पोर्टर यांची आर्थिक भूगोलाची संकल्पना ? तिने जागतिकीकरणाच्या संकल्पनेवर कोणता आघात केला ? या प्रश्नांकडे वळण्यापूर्वी जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा अन्वयार्थ पाहू.

येथे भारतासारख्या विकसनशील देशाच्या संदर्भात लागू पडणाऱ्या एका आटोपशीर व कामचलाऊ व्याख्येचा उल्लेख करु. ''जागतिक प्रमाणकांशी तोडीस तोड ठरणाऱ्या (अर्थव्यवस्थेच्या) अंगभूत क्षमतांचे संपादन करण्याची व ते टिकविण्याची प्रक्रिया''[2] असा एकही देश असू शकत नाही की ज्याच्याकडे किमान एका वस्तुच्या संबंधात त्या क्षमता अस्तित्वात नाहीत. आज गरज आहे ती त्या क्षमतांचे शक्तता (capabilities) व कार्यशीलता (functionings) यांच्यामध्ये रुपांतरण करण्याची. लोकतंत्रात ते अवघड काम प्रथम जबाबदार शासनाचे आहे. एका वर्षापूर्वी 'जागतिकीकरण व भारत' या विषयावरील व्याख्यानात नोबेल-विजेते अमर्त्य सेन म्हणाले त्याप्रमाणे जागतिकीकरणाविषयीच्या वाद-प्रतिवादात ती संकल्पना जास्तीत जास्त 'मलिन' करण्यात आली. जागतिकीकरणाला अनुकूल दृष्टीकोन म्हणतो की जागतिकीकरणाने प्रत्येक व्यक्तीच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाली. प्रतिकूल दृष्टीकोन म्हणतो की जागतिकीकरणाने प्रत्येक व्यक्ती जास्त गरीब झाली. परंतु जागतिकीकरणाच्या लाभांची विभागणी कशी करावयाची, याविषयी क्वचितच विश्लेषण केले जाते. जागतिकीकरणाचे काही विरोधक नोबेल-विजेते व माहितीविषयक अर्थशास्त्रात मौलिक योगदान देणाऱ्या जोसेफ स्टिगलिट्झसारख्या

अर्थशास्त्रज्ञाच्या ''ग्लोबलायझेशन अँड डिसकंटेंट्स''(2002) या पुस्तकातील विधानांचा चुकीचा व अपूर्ण संदर्भ देतात. उदाहरणार्थ, पैसेवाल्यांनी जागतिकीकरणाचे अपहरण केले आहे, अशा अर्थाचे स्टिगलिट्झ यांचे एक विधान आहे. जागतिकीकरणाचे विरोधक केवळ त्या विधानाला उचलून धरतात आणि त्याच्या नंतरच्या महत्त्वाच्या कारणमीमांसेचेच अपहरण करतात. ती कारणमीमांसा थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे: एखाद्या वस्तुच्या ग्राहकाला तिच्याविषयी जेवढी माहिती असते त्यापेक्षा तिच्या विक्रेत्याला ती माहिती जास्त असते. त्यामुळे असममितिक (asymmetric)बाजाराचे गैरवाजवी फायदे विक्रेत्याला मिळतात. एन्रॉनसारख्या कंपनीच्या लेखांकनातील लबाडी व बाजाराविषयीच्या खऱ्या माहितीची उघडीनागडी लपवाछपवी जागतिकीकरणाचा अतूट भाग असलेल्या बाजार यंत्रणेचे विरुपण करतात. अशा परिस्थितीत जागतिकीकरणाला जबाबदार कसे धरता येईल ?

अधिकच्या स्पष्टीकरणासाठी स्टिगलिट्झ यानी वापरलेल्या मोटरगाडीचे उदाहरण दिले. आपण म्हशीचे उदाहरण घेऊ. एका म्हशीच्या मालकाला त्याची दुभती म्हैस विकावयाची आहे, असे समजू. तिची खरेदी करणाऱ्या संभवनीय ग्राहकाने याच म्हशीची खरेदी करावी म्हणून तिचा मालक त्या ग्राहकाला तिची माहिती देतो.तिचे पुढीलप्रमाणे गुणवर्णन करतो : म्हैस गरीब आहे, सकाळी व सायंकाळी अनुक्रमे ती 3 व 4 लिटर दूध देते, इत्यादी. परंतु नवीन मालकाच्या घरी आल्यानंतर त्याला पुढीलप्रमाणे अनुभव आला : म्हैस खोडील आहे, ती लाथा झाडते, ती पान्हा चोरते, इत्यादी. जोपर्यंत खोट्या माहितीचे पारडे जास्त वजनदार असते,तोपर्यंत बाजार यंत्रणा (स्थानिक असो किंवा जागतिक) विनिमयाद्वारे कल्याणात नक्त वाढ करु शकत नाही. ती आश्वासक असत नाही. उलट नावडतीचे मीठ अळणी, अशी स्पर्धा व तंत्रविद्या यांच्यावर आधारित तथाकथित जागतिकीकरणाची स्थिती होते.

जागतिकीकरणाच्या या अन्वयार्थानंतर पोर्टर यांच्या पूर्वी उल्लेख केलेल्या आर्थिक भूगोलाच्या संकल्पनेचा संदर्भात आपण उपस्थित केलेल्या दोन प्रश्नांकडे परत वळू.

आह्मा यांच्याशी प्रतिवाद करताना पोर्टर यानी स्वगृह आधार याला स्पर्धात्मक फायद्याचे अधिष्ठान संबोधले. त्यानंतर आठ वर्षांनी ''क्लस्टर्स अँड न्यू इकनॉमिक्स ऑफ कॉंपीटिशन'' हा लेख लिहून बहुचर्चित जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर आपले पूर्वीचे मत जास्त दृढ करण्याची त्याना गरज वाटली. किंवा तशी संधी निर्माण झाली. फरक इतकाच की त्या संधीचा उपयोग करताना जागतिकीकरणाकडे त्यानी उपपत्ति व व्यवहार अशा दोन दृष्टीकोनातून पाहिले. जागतिकीकरणाच्या उपपत्तिनुसार तंत्रविद्या, उत्पादकता व स्पर्धा यांच्यावर उभे असलेल्या जागतिकीकरणात खुले जागतिक बाजार, जलद परिवहन व जास्त वेगवान दूरसंदेशवहन यांच्यामुळे कोणत्याही कंपनीला कोणत्याही वस्तू कोणत्याही ठिकाणापासून कोणत्याही वेळी मिळविणे शक्य होते. पोर्टर पुढे लगेच एक खळबळजनक विधान करतात, ते म्हणतात, ''जागतिकीकरणाच्या युगात आर्थिक भूगोल एक कूट विरोधाभास निर्माण करतो. तत्त्वत: स्थान हे स्पर्धायुक्त फायद्याचे उगमस्थान असू शकत नाही.....परंतु प्रत्यक्षात ते (स्थान) स्पर्धेच्या केंद्रस्थानी राहाते.''[3] दुसऱ्या शब्दात, एक सैद्धांतिक शक्यता म्हणून 100 टक्के जागतिकीकरण अंतिमत: स्पर्धेलाच नाकारते. प्रत्यक्षात विशिष्ट वस्तुच्या स्पर्धायुक्त फायद्याचे उगमस्थान म्हणून अस्तित्वात असलेला स्वगृह आधार शाश्वत राहातो. हार्वर्ड बिजनेस स्कूलच्या पदवीधराची रोजगारक्षमता आजही सर्वाधिक व अबाधित आहे. जागतिकीकरणावरील

ही एक महत्त्वाची मर्यादा आहे. आणि तिचे स्वरूप व्यावहारिक आहे.

ओह्मा व पोर्टर यांच्या स्पर्धात्मक फायद्याविषयीच्या दृष्टीकोनांचा गोषवारा पुढीलप्रमाणे सांगता येईल. 1985 मधील ओह्मा यांचे स्पर्धेविषयीचे मत ताठर होते. 2003 मध्ये ते स्पर्धेपासून एक पाऊल मागे सरले. आणि छापाच्या माध्यमातून स्थानिक अर्थव्यवस्था किंवा तेथील शेतीमालाचा दुवा त्यानी जागतिक बाजाराशी जोडला. परिणामी छापांकित (branded) वस्तुच्या स्पर्धात्मक फायद्यात वाढ होते. परंतु पोर्टर यानी 1998 मध्ये त्यांचा 1990 मधील कंपनीच्या माहेरघराविषयीचा/स्वगृह राष्ट्राविषयीचा निष्कर्ष जास्त दृढ केला. अशाप्रकारे, स्थान व स्वगृह राष्ट्र यांच्या संबंधात विसंगती निर्माण होते. ती विसंगती वास्तव किती / आणि कल्पित किती ?

या प्रश्नाने उत्तर शोधण्यास मदत करणारे काही सुगावे किंवा तपास चीनमधील यानशान व अमेरिकेतील सिलीकॉन व्हॅली या शहरांत घडून आलेल्या क्रांतिकारक बदलांत सापडतात. त्यांचा संक्षेपात उल्लेख करु. 1999 पर्यंत यानशान शहर एक मागासलेले व अविकसित स्थान होते.त्यानंतर त्याने तेलशुद्धीकरणाच्या क्षेत्रात आशिया खंडाच्या नकाशावर आपली स्वतंत्र मोहोर लावली. तेथील तेलशुद्धीकरण कंपनी न्यूयॉर्क व लंडन शेअर बाजारात सूचिबद्ध झाली. प्रारंभिक सार्वजनिक भाग विक्रीला प्रचंड प्रतिसाद मिळाला. त्यात बी.पी.ओ. अमोको व रॉयल डच/शेल या विदेशी कंपन्या तसेच मॉर्गन स्टॅन्ले सारखा गुंतवणूक बँकर यांचा पुढाकार लक्षणीय ठरला. विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे कंपनीतील पेट्रोलची किंमत बाजारचलित ठेवण्यास साम्यवादी नेतृत्वाने मान्यता दिली. कंपनीच्या अल्पसंख्य विदेशी भागधारकांना निर्णयप्रक्रियेत पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले. या सर्व संयुक्त घटकांचा परिणाम म्हणजे फलप्रामाण्यवादी आर्थिक धोरणातून साकारलेले आधुनिक यानशान.

दुसरे शहर (स्थान) आहे सिलीकॉन व्हॅली,ऋणिकी (electronics) उद्योगांचे केंद्र म्हणून जगाच्या नकाशावर प्रसिद्ध पावलेल्या या शहराचे मूळ नाव होते सांताक्लारा. स्वादिष्ट फळांचे उत्पादन करणारा एक प्रदेश यापलीकडे अमेरिकेच्या बाहेर तो विशेष कोणाला माहित नव्हता. सिलीकॉन व्हॅलीच्या विकासाचे श्रेय व्हॅलीकडे संक्रमण करण्याचा ध्यास घेणारे दूरदर्शी संस्थापक अभियंते, साहस भांडवल (venture capital) व उद्यमशील तसेच स्पर्धाशील देशी व विदेशी गुंतवणुकदार यांच्याकडे जाते. त्यांच्यामध्ये भारतीय प्रायोजना आज्ञावली अभियंत्यांचा (software engineers) सहभाग लक्षणीय समजला जातो. याचा अर्थ तेथे सर्व आलबेल आहे, असे नव्हे. नफ्याच्या कितीतरी पुढे स्पर्धा धावत असल्यामुळे जीवन तणावपीडित होत आहे. परंतु येथे तो चर्चेचा विषय नाही.

ओह्माप्रणित स्थान व पोर्टर प्रणित स्वगृह आधार/स्वगृह राष्ट्र यांच्या संबंधात पूर्वी आपण विसंगतीचा प्रश्न उपस्थित केला. त्या प्रश्नावर जास्त प्रकाश टाकण्याच्या हेतुने या दोन शहरांतील क्रांतिकारक बदलांचा आपण मागोवा घेतला. त्या बदलांच्या मागोव्याच्या आधाराने पुढील निष्कर्ष निघतो. पोर्टरप्रणित निव्वळ स्वगृह राष्ट्र किंवा ओह्माप्रणित निव्वळ स्थानिक विशिष्टता या दोन शहरांतील क्रांतिकारक बदलांचे पुरेसे किंवा पर्याप्त कारण नाही. स्वदेशी वाणापेक्षा संमिश्र किंवा संयुक्त घटक स्पर्धात्मक फायद्यांसंबंधी जास्त निर्णायक ठरतात. आजही स्पर्धात्मक फायद्याची संकल्पना शाबूत आहे. प्रश्न आहे पोर्टरप्रणित स्वराष्ट्र आधारावरील मर्यादांचा. स्पर्धेला नाकारणारे, 100

टक्के जागतिकीकरण प्रत्यक्षात अस्तित्वात असू शकत नाही. प्रत्यक्षात असते ते विशिष्ट स्थानापासून राष्ट्रापर्यंतच्या मार्गावर कार्य करणारे व विविध घटकपुंजांवर (clusters) आधारित विश्वगामीस्थानिकीकरण. आजपर्यंत तरी विश्वविशिष्टपुंज व स्थानविशिष्टपुंज यांचे संपूर्ण अभिसरण (convergence) असे त्याचे स्वरुप नाही.

**मर्यादा**

जागतिकीकरणाच्या पुनरीक्षणाची चर्चा त्याच्यावरील मर्यादांशिवाय अपूर्ण आहे. पुढील काही मर्यादांचा उल्लेख करु.

(1) विश्वगामीस्थानिकीकरण ही जागतिकीकरणावरील एक महत्त्वाची मर्यादा आहे. ही संज्ञा विकसित करण्याचे श्रेय केनिकी ओह्मा यांच्याकडे जाते.

(2)दुसरी व्यावहारिक मर्यादा आहे पोर्टर यांची स्वगृह आधार ही संकल्पना. मागे तिचा उल्लेख झाला आहे.

(3)जागतिकीकरण हे एक 'तथ्य' (fact) आहे, 'विकल्प'(option) नव्हे, असे एक विधान[4] केले जाते. ते अतिशयोक्त आहे. कारण त्यात तथाकथित जागतिकीकरणावरील मर्यादांचा पुरेसा विचार झाल्याचे आढळत नाही. एखादी कंपनी जागतिक कधी होते ? ती जागतिक होते (going global) याचा नेमका निकष कोणता ? या प्रश्नांसंबंधात अनुभवनिष्ठ अभ्यास झाल्याची पुरेशी माहिती उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत जागतिक स्वरूपाच्या कंपनीची सर्वमान्य प्राचले (parameters) निश्चित करण्याची गरज आहे. निव्वळ एक सुरुवात म्हणून कंपनीच्या मूळ देशाबाहेरील विक्रीच्या तिच्या एकूण विक्रीतील हिश्याचा विचार करता येईल. समजा, एक प्राचल म्हणून 50 टक्के इतक्या हिश्याची किमान मर्यादा निश्चित केली, तर 1995 मध्ये मॅक्डोनाल्ड ही अमेरिकेची एकमेव बहुराष्ट्रीय कंपनी ती मर्यादा पार करु शकली. ती जागतिक झाली. त्यावर्षी अमेरिकेच्या बाहेरील तिच्या 16000 उपहारगृहांतील विक्रीचा तिच्या एकूण विक्रीतील हिस्सा 54 टक्के होता.[5] आज (2003) अमेरिकेच्या पुढील काही बड्या बहुराष्ट्रीय कंपन्यांचे संबंधित उपलब्ध हिस्से पुढे दिले आहेत. वॉल-मार्ट (14 टक्के), जी.इ. (33 टक्के), प्रॉक्टर अँड गॅंबल (50 टक्क्याच्या जवळपास) आणि आय.बी.एम. (50 टक्क्याच्या आसपास).[6]

(4) सार्वभौम, स्वतंत्र राज्य ही जागतिकीकरणावरील महत्त्वाची मर्यादा आहे. एकतत्त्वज्ञानमीमांसा म्हणून 'वसुधैव कुटुंबकम' तसेच 'जागतिक खेडे' या संकल्पनांचा आज वारंवार उल्लेख केला जातो. परंतु तथाकथित जागतिक खेडे प्रत्यक्षात जागतिकीकृत जगाचा परिपूर्ण पर्याय होऊ शकत नाही. पाण्यातील मातीचा ढेकूळ जसा विरघळतो व नष्ट होतो तसे राज्य सहजपणे नष्ट होणार नाही. देशातील एखादी कंपनी जागतिक (global) होणे व एखादा सार्वभौम देश संपूर्णपणे जागतिकीकृत होणे (wholly globalised) यात मूलभूत फरक आहे. 'निर्प्रादेशिकीकृत'[7] (deterritorialised) राज्यात कोणाची वसती असेल ? तेथे कोणता कायदा चालेल ?

## संदर्भ टीपा


1. Porter, Michael E., The Competitive Advantage of Nations, The Macmillan Press, 1990, P.577.

2. Shivakumar, K., "A Route Map To Global Village, The Economic Times, September 29, 1999.

3. Porter, Michael E., "Clusters and New Economics of Competition", Harvard Business Review, November-December 1998, P. 194.

4. Parikh, Kirit S. and Shah Ajay, India Developement Report (edited by Kirit Parikh), Oxford University Press, 1999, P.27.

5. Business Encyclopaedia (Global Marketing), Knowledge Exchange, P.292.

6. Quelch, John and Rangan, Kasturi V.,"Profit Globally, Give Globally", Harvard Business Review, December, 2003, P.17.

7. This term is used by Aditya Nigam in his article."Imagining the Global Nation" that appeared in the EPW January 3-9, 2004.

टीप : अर्थसंवाद, जुलै-सप्टेंबर 2001 मध्ये '' जागतिकीकरण विचार, व्यवहार व विपर्यास'' हा माझा लेख प्रसिद्ध झाला. त्यानंतर जागतिकीकरणाविषयीच्या आणखी काही नवीन मुद्यांची चर्चा करण्याची आज गरज निर्माण झाली. केवळ म्हणून प्रस्तुत लेखाचा प्रपंच.

● ● ●

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## परिषदेचे सदस्य आणि हितचिंतक यांना आवाहन

'अर्थसंवाद' या नियतकालिकावरील व कार्यालयीन खर्च गेली काही वर्षे सातत्याने वाढत असल्यामुळे आणि परिषदेला मिळणाऱ्या अनुदानात कोणतीही वाढ नसल्यामुळे परिषदेला दरवर्षी अधिकाधिक तूट येत आहे. ही तूट भरून काढण्यासाठी वर्गणीचे दर सुधारणे, जाहिराती मिळविणे इत्यादी निर्णय परिषदेच्या कार्यकारी मंडळाने वेळोवळी घेतले आहेत. त्याचबरोबर मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या नावे एक स्वतंत्र निधी उभारावा असेही ठरले आहे. या कायम निधीसाठी सदस्यांकडून आणि परिषदेच्या हितचिंतकांकडून देणग्या/अनुदाने मिळवावीत असेही वार्षिक साधारण सभेत सातत्याने ठरविण्यात आले आहे. 'अर्थसंवाद' चे वाचक, परिषदेचे साधारण सदस्य आणि अन्य हितचिंतकही या निधीसाठी स्वयंस्फूर्तपणे, यथाशक्ती आपले आर्थिक साहाय्य देतील आणि परिषदेला आर्थिक स्थैर्य मिळवून देतील असा आम्हास विश्वास वाटतो.

या निधीसाठी पाठावावयाचे बँक ड्राफ्ट, मनिआर्डर इत्यादी 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने काढावेत आणि ते औरंगाबाद येथील कार्यालयीन पत्त्यांवर पाठवावेत.

देणगीदारांची नावे वेळोवेळी 'अर्थसंवाद' च्या अंकात दिली जातील.

**सर्जेराव ठोंबरे**
कार्यवाह-खजिनदार

टिप्पण

# वरकड मूल्याचा विनियोग आणि कामगार वर्ग

● **वसुधा जोशी**, *पुणे.*
*प्रपाठक, नेस वाडिया कॉलेज ऑफ कॉमर्स.*

2001 साली सिंगापूरमध्ये शासनाने एक अभिनव प्रयोग केला. आर्थिक परिस्थिती गंभीर असलेल्या, 21 वर्षांहून अधिक वयाच्या सर्व लोकांना शासनाने 1 (सिंगापूर) डॉलर दर्शनी मूल्याचे सरकारी भाग (शेअर्स) वाटले. देशाच्या भरभराटीत कमकुवत गटातील लोकांनाही सहभागी करून घेण्याच्या उद्देशाने नवीन सामाजिक कराराचा अंश म्हणून या धोरणाचा अवलंब करण्यात आला.

न्यू सिंगापूर शेअर्स म्हणून ओळखण्यात येणारे एकूण 1.86 बिलियन सिंगापूर डॉलर्स एवढ्या किमतीचे हे भाग जवळजवळ 21 लाख लोकांना वाटण्यात आले[1] पहिल्या वर्षात प्रत्येक भागाच्या निम्म्या हिश्याचेच रोख रकमेत रूपांतर करता येईल अशी अट घालण्यात आली होती. तरी 60% लोकांनी या योजनेचा फायदा घेऊन पैसे घेतले. 1 नोव्हेंबर 2002 पासून सगळे भाग शासनाला विकण्याची मुभा देण्यात आली. त्याबरोबर रोख पैसे घेण्यासाठी लोकांची गर्दी झाली आणि पहिल्या 2-3 आठवड्यात 50% भागांचे पैशात रूपांतर झाले. तात्पर्य बहुसंख्यांनी रोख रकमेला पसंती दिली.

तात्पुरता कमी कौशल्याचा हलक्या स्वरूपाचा रोजगार असणारे हे लोक-सिंगापूरच्या खर्चीक रहाणीमानामुळे हैराण झाले होते. सर्व वस्तूंच्या वाढत्या किंमतींमुळे कसेही करुन रोख पैसा उभा करण्याशिवाय त्यांना गत्यंतर नव्हते. त्यामुळे वित्तीय मालमत्ता गरिबांना देऊन लाभांशाच्या स्वरूपात त्यांना एक उत्पन्न-स्रोत उपलब्ध करुन द्यावा आणि काही प्रमाणात आर्थिक स्थैर्य त्यांना प्राप्त करुन द्यावे हा शासनाचा स्तुत्य हेतू किंमतवाढ आणि बेकारी यामुळे फलद्रुप झाला नाही.

भारतातही या धर्तीवर एक प्रयोग पूर्वी करण्यात आला होता. त्याची पार्श्वभूमी आणि तपशील वर उल्लेख केलेल्या उपक्रमापेक्षा वेगळा होता. सिंगापूरमध्ये कल्याणकारी दृष्टिकोनातून शासकीय खजिन्यातून गरिबांना धनाचे वाटप करण्यात आले. भारतामध्ये मुंबईच्या औद्योगिक कामगारांना त्यांचा बोनस-उद्योगांच्या नफ्यातला त्यांचा हिस्सा-द्यायचा होता. पण दोन्ही उपक्रमांची फलश्रुति मात्र सारखी होती. भारतातल्या या प्रयोगाची माहिती व्हावी या उद्देशाने हे टिपण लिहिले आहे.

श्री. गुलझारीलाल नंदा 1957 मध्ये देशाचे नियोजन व श्रममंत्री झाले. त्यांनी मुंबईच्या कामगारांच्या बोनसचा काही हिस्सा पोस्टल बाँडच्या स्वरुपात देण्याचा प्रस्ताव आणला. त्याला कामगार संघटनांनी कडाडून विरोध केला. साम्यवादी संघटनांनी वर्गकलहाला पाठिंबा देण्याच्या भूमिकेतून या सक्तीच्या बचतीला पाठिंबा देण्याचे व पर्यायाने प्राप्त परिस्थितीला बळकटी आणण्याचे साफ नाकारले. समाजवाद्यांनी त्यांची 'री' ओढली. परिणामी बोनस बाँड दिल्याच्या दुसऱ्याच दिवशी कामगारांनी पोस्टाच्या खिडकीसमोर कामाचा दिवस बुडवून रांगा लावल्या आणि थोडे नुकसान सोसून म्हणजे बाँड्सच्या दर्शनी मूल्याहून कमी असलेले पण रोख पैसे अहमहमिकेने परत घेतले. हा प्रयोग बारगळला तरी कालांतराने सरकारी कर्मचाऱ्यांची महागाई भत्त्याची वेतनवाढीची थकबाकी काही प्रमाणात सक्तीने भविष्यनिर्वाह निधीत जमा करण्याचा प्रघात रूढ झाला. (हा काळाचा सूड तर नव्हे ?)

श्री. नंदांची पोस्टल बाँड्सच्या प्रस्तावामागची भूमिका अशी होती : कामगार बोनसची रक्कम गरजेच्या आणि काही चैनीच्या वस्तू घेण्यासाठी लगेच खर्च करतात. याची आगाऊ कल्पना असलेले व्यापारी सणासुदीच्या काळात आधीच भाववाढ करुन ठेवतात. त्यामुळे चलनफुगवटासदृश्य परिस्थितीला आमंत्रण मिळते. बोनसचा पैसा व्यापाऱ्यांच्या खिशात जातो आणि उत्पादक भांडवलसाठ्यात मात्र काही वाढ होत नाही. देशात उत्पादक भांडवलाची कमतरता असल्यामुळे लोकांना बचत करण्याची सवय लावण्याची आवश्यकता असताना आणि उत्पादक भांडवलात फक्त शासकीय अर्थाने वाढ होत असतानाच ही विकृती निर्माण होते. अशा वेळी बाँड्सच्या स्वरूपात बोनस मिळाल्यावर कामगारांना आपोआप बचतीची सवय लागेल आणि त्याच वेळी उत्पादक भांडवलसाठ्यातही वाढ होईल.

अर्थव्यवस्थेचे हे विश्लेषण आणि सुचविण्यात आलेला उपाय देखील योग्यच होता. मात्र साम्यवादी विचारांच्या कामगार संघटनांनी भांडवलशाहीतील वाढती अरिष्टे, वर्गकलह, समाजवादी क्रांतीची अपरिहार्यता या मार्क्सवादातील राजकीय सिद्धान्ताचे (ज्यांचे फोलपण युरोपमध्ये सिद्ध झाले होते )- त्याचे ढोबळमानाने पालन केले आणि पोस्टल बाँड्सना विरोध केला.

पां. वा. गाडगीळांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठात 1981 साली लोकमान्य टिळक व्याख्यानमालेतील तिसरे पुष्प गुंफताना वरील प्रयोगाचा उल्लेख केला आणि त्याअनुषंगाने साम्यवादी पक्षांवर सडकून टीका केली.[2] गाडगीळांना नंदांची योजना मान्य होती आणि त्यांनी तिचा प्रचारही केला होता. साम्यवाद्यांनी तिला पाठिंबा द्यावा आणि त्या निमित्ताने होणाऱ्या भांडवलसंचयाचा विनिमय कसा करावा हे ठरविण्याच्या निर्णयात कामगारांना प्रतिनिधित्व मिळावे ही मागणी करावी अशी सूचना त्यांनी केली. ही सूचना अर्थातच डाव्या कामगार संघटनांना मान्य झाली नाही.

प्राप्त परिस्थितीला बळकटी आणणाऱ्या कोणत्याही योजनेची 'रिव्हिजनिस्ट' म्हणून संभावना करणे, संपूर्ण भांडवलशाही व्यवस्था नाकारणे वगैरे गोष्टींची तेव्हा साम्यवाद्यांमध्ये फॅशन होती. तिचा गाडगीळांनी उपहास केला आहे. तेव्हा प्रचलित असलेल्या भांडवलशाही व समाजवादी या दोन समांतर, परस्परांच्या प्रतिस्पर्धी व्यवस्था आहेत या मांडणीलाही गाडगीळांचा विरोध होता. केन्सने दाखवून दिलेल्या मार्गाने वाटचाल करताना सरकारी खर्चाने बेकारी निवारणाचा आणि आर्थिक स्थैर्याचा कार्यक्रम राबवायचा हे जेव्हापासून भांडवलशाही व्यवस्थेने मान्य केले तेव्हापासून या अर्थव्यवस्थेत

आमूलाग्र बदल झाला आणि यात समाजवादाची सरमिसळ झाली. व्यवस्था नाकारण्याच्या गप्पांची ती इतिश्री होती.

गाडगीळ स्वत: मार्क्सवादी होते आणि मार्क्सचे राजकीय विचार चुकीचे ठरले पण त्याचे अर्थशास्त्र बरोबर आहे या विधानापासून ते त्यांच्या मांडणीची सुरुवात करतात. वर्गकलहजन्य क्रांतीत कामगारवर्गाला अजिबात रस नाही हे युरोप-अमेरिकेत दिसून आल्यावर सर्व मार्क्सवादी राजकीय सिद्धान्तन फोल ठरले. या उलट आपल्या अर्थशास्त्रीय मीमांसेत बेकारी, उपभोगातील न्यूनत्व आणि अरिष्टे या भांडवलशाहीच्या वैगुण्यांना मार्क्सने व्यवस्थित जाणले. याच वाटेने पुढे जाऊन केन्सने बेकारी दूर करण्यासाठी सरकारने चलनपुरवठा केला पाहिजे वा बँकांकडून कर्ज काढले पाहिजे हा उपाय शोधला आणि भांडवलशाहीला सुदृढ केले. रशियातला आर्थिक नियोजनाचा प्रयोग बघून (1925 साली केन्स रशियाला गेला होता)केन्सवर खूप प्रभाव पडला असावा असे गाडगीळांना वाटते. केन्सला मार्क्सचा, स्टॅलिनचा तिटकारा होता. पण सरकारी आर्थिक नियंत्रणाचे मर्म त्याने ओळखले आणि ब्रिटिशांच्या अर्थव्यवहार परंपरेत खूप प्रयत्न करुन त्याने आपला उपाय चपखल बसवला आणि त्यामुळेच त्याला सार्वत्रिक मान्यता मिळाली. समाजवादी व्यवस्थेच्या मर्माचे भांडवलशाहीवर कलम करुन सनदशीर संसदीय मार्गाने केन्सने मार्क्सवादी क्रांतीच घडवून आणली ! केन्सने दाखवून दिलेल्या मार्गाने पश्चिम युरोप व अमेरिकेत भांडवलशाहीचे जे वैभव वाढले ते मार्क्सचे अपयश नसून यश होते असे गाडगीळांना वाटते.

भारताने मिश्र अर्थव्यवस्था म्हणजेच केन्सचा मार्क्सवाद पचवलेली भांडवली व्यवस्था स्वीकारली. त्यात शासनाने भरीव आर्थिक कार्यक्रम हाती घेऊन सार्वजनिक उद्योगांची स्थापना केली. कामगारहिताचे अनेक कायदे केले. भांडवलदारांनाही सवलतीच्या दरात कर्जाऊ पैसा, कच्चा माल, यंत्रसामग्री दिली आणि बाजाराची हमी दिली. थोडक्यात म्हणजे कामगारांना बेकारीपासून तर भांडवलदारांना अनिश्चिततेच्या धोक्यापासून वाचविण्याची भूमिका घेतली. देशात समाजवादी क्रांती झाली असती तरी शासनाने कदाचित याहून वेगळी भूमिका घेतली नसती. त्यामुळेच या व्यवस्थेला नाकारण्याच्या भानगडीत न पडता त्यातील भांडवलसंचयाला मदत करणे हे कामगारांचे कर्तव्यच होते.

वरीलप्रमाणे विचार न करता अर्थशास्त्राऐवजी राजकीय सिद्धान्तनाला प्राधान्य देऊन साम्यवाद्यांनी जुजबी व पोथीनिष्ठ विश्लेषण केले आणि चुकीचा मार्ग स्वीकारला. भांडवलसंचयाबद्दल, त्याच्या विनिमयाबद्दल त्यांनी विश्लेषण केलेच नाही. त्यामुळे संघटित कामगारांकडून फक्त वेतनवाढीचे लढे उभारले गेले. त्यातही प्रभावक्षेत्राचे आकुंचन होत-होत 1975 ते 1990 या काळात फक्त एकेका कारखान्यातील कामगारांपुरत्या वाटाघाटी सुरु झाल्या. भांडवलाच्या विनिमयाबाबतच्या निर्णयप्रक्रियेतून हद्दपार होऊन कामगार फक्त ग्राहक बनले. सध्याच्या काळात तर सतत असंघटित कामगारांकडे बोट दाखवून संघटित कामगारांनी लढे उभारुन संपादन केलेल्या हक्कांवरही जागतिक भांडवल घाला घालत आहे.

गाडगीळांनी तेव्हा सुचविलेली उपाययोजना अशी होती : कामगारांनी मिळकत वाढीतून बचत करुन भांडवलसंचयाला हातभार लावणे, त्यानंतर उत्पादन व रोजगारी यांचे नियंत्रण करणे, जीवनावश्यक वस्तूंच्या वाटपाची व्यवस्था मजबूत करणे, शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करुन कर्जफेड नियमितपणे करण्याची शिस्त त्यांना लावणे इत्यादी.

या मार्गाचा अवलंब म्हणजेच भारतातील मार्क्सवाद ठरला असता.

हे सुद्धा बहुतेक स्वप्नरंजन ठरले असते ! इतिहास वाचत असताना जर-तर चे प्रश्न निरर्थक असतात. पण त्यांचा अनेक वेळा मोह पडतो. गाडगीळांची पुस्तिका वाचताना वरील मार्गाने विषमता थोडी कमी झाली असती असे म्हणण्याचा मोह होतोच.

### संदर्भ


1. 'One in two cashing in New S'pore Shares' The Strait Times, सिंगापूर, दि. 10 नोव्हेंबर 2002

2. गाडगीळ, पां. वा. 'मार्क्स, केन्स व मार्क्सवादाचे भवितव्य', टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, जानेवारी 1982 (जुलै 1981 मधील गाडगीळांचे भाषण या पुस्तिकेच्या स्वरूपात प्रसिद्ध झाले आहे.)


● ● ●

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## वर्गणीतील बदल

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक सदस्यत्वाच्या तसेच 'अर्थसंवाद' च्या वार्षिक वर्गणीमध्ये 1 एप्रिल 2004 पासून पुढील प्रमाणे वाढ करण्यात आली आहे.

**(अ) परिषदेचे सदस्य**

(1) साधारण सदस्य : रु. 250/- (वार्षिक)

(2) साधारण सदस्य : शैक्षणिक संस्था : रु. 250/- (वार्षिक)

**(आ) 'अर्थसंवाद' वर्गणीदार**

ग्रंथालये : रु. 250/- (वार्षिक)

आजीव सदस्य (वर्गणी रु. 1200) यामध्ये बदल केलेला नाही. परिषदेचे वार्षिक सदस्य आणि 'अर्थसंवाद' चे वर्गणीदार यांनी नव्या वर्षाची वर्गणी रु. 250 (रु. 150 नव्हे) शक्य तेवढ्या लवकर कार्यवाह खजिनदारांकडे पाठवावी.

**सर्जेराव ठोंबरे**
कार्यवाह-खजिनदार

ग्रंथ परीक्षण

# 'महाराष्ट्राची अर्थव्यवस्था- बदलती संरचना व नवे प्रवाह'

The Economy of Maharashtra
Changing Structure & Emerging Issues
Published by : Dr. Ambedkar Institute of Social & Economic Change, Mumbai.
Editor - Dr. Bhalchandra Mungekar.
Price Rs. 1,250/-

● अ. रा. पडोशी, *गोवा.*
*भूतपूर्व अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद,*

मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु आणि मान्यवर अर्थशास्त्रज्ञ असलेल्या भालचंद्र मुणगेकर यांनी संपादित केलेला प्रस्तुत ग्रंथ महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेसंबंधी समग्रदर्शी असा ग्रंथ आहे. प्रस्तुत ग्रंथामध्ये मान्यवर अर्थशास्त्रज्ञांनी लिहिलेले एकूण वीस शोधनिबंध असून त्यायोगे महाराष्ट्राच्या एकूण अर्थव्यवस्थेचा सविस्तर, सांगोपांग अभ्यास आणि विश्लेषण झालेले आहे. प्रस्तुत शोधनिबंधांमध्ये महाराष्ट्रातील शेती, उद्योगधंदे, लोकसंख्या, मानवी विकास, प्रादेशिक समतोल, बँका, दळणवळण, दारिद्र्यनिवारण, रोजगार निर्मिती, मागासवर्गीयांची स्थिती, इ. विभागामध्ये गेल्या काही वर्षामध्ये घडून आलेल्या आर्थिक विकासाचा उहापोह केला आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचे एक सम्यक् चित्र वाचकांपुढे उभे राहाते.

महाराष्ट्र राज्याच्या एकूण, आर्थिक विकासाचे समग्र विवेचन करण्याचा प्रथम प्रयत्न 1973 मध्ये पुणे येथील समाज प्रबोधन संस्थेने प्रसिद्ध केलेल्या ''महाराष्ट्राची अर्थव्यवस्था'' या ग्रंथामध्ये झाला होता. त्यानंतर तीस वर्षांनी त्याच दिशेने केलेला प्रयत्न म्हणजे भालचंद्र मुणगेकर यांनी संपादित केलेला प्रस्तुत ग्रंथ होय.

स्वतंत्र महाराष्ट्र राज्य स्थापन होऊन पन्नास वर्षे होणे म्हणजे फार कालावधी लोटला असे म्हणता येणार नाही. या काळात देशाच्या आणि राज्याच्या आर्थिक धोरणांमध्ये अनेक बदल झाले आहेत. राजकीय, सामाजिक परिस्थिती बदलली आहे. या बदलत्या परिस्थितीमध्ये राज्यामध्ये घडून आलेल्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचा सर्व बाजूनी अभ्यास करुन त्याचे निष्कर्ष वाचकापुढे मांडणे आवश्यक झाले होते. प्रस्तुत ग्रंथातील निबंधाचे मान्यवर लेखक आणि ग्रंथाचे संपादक मुणगेकर यांनी हे महत्त्वाचे काम केले आहे हे अत्यंत योग्य होय.

महाराष्ट्राच्या शेतीविकासासंबंधी (1) सावंत,सत्यसाई आणि (2) एस. महेंद्र देव, मुणगेकर असे दोन लेख प्रस्तुत ग्रंथामध्ये समाविष्ट केले आहेत. राज्याच्या शेतीविकासाचा सविस्तर अभ्यास सावंत,सत्यसाई यांच्या निबंधामध्ये आहे. साठ टक्के कामगार शेतीवर अवलंबून असल्यामुळे महाराष्ट्र हे शेतीप्रधान राज्य आहे. त्याचप्रमाणे राज्याच्या सकल

घरगुती उत्पन्नामधील शेतीचा वाटा घटता असला तरी शेत मजुरांच्या प्रमाणात घट झाली नाही. या महत्त्वाच्या प्रवृत्तीकडे लेखकद्वयांनी वाचकांचे लक्ष वेधले आहे. राज्यातील शेतीक्षेत्राच्या घटत्या उत्पादकतेचा उल्लेख करुन सिंचन सुविधांचा असमाधानकारकपणा, नवीन बी-बियाणे विकसित करणाऱ्या तंत्रज्ञानाचा अभाव, नगदी पिकांना पाणीपुरवठ्यामध्ये झुकते माप इत्यादी कारणाना लेखकद्वयानी घटत्या उत्पादकतेसाठी जबाबदार धरले आहे. प्रस्तुत लेख सर्व दृष्टीनी वाचनीय आणि उद्‌बोधक आहे. तथापि 1992-93 नंतरच्या शेतीमधील स्थित्यंतराचा अभ्यास लेखामध्ये अंतर्भूत केला असता तर लेखाची उपयुक्तता अधिक वाढली असती असे वाटल्याशिवाय राहात नाही. नवीन आर्थिक धोरणामुळे महाराष्ट्राच्या शेतीक्षेत्रापुढे उभ्या राहिलेल्या विविध समस्यांचे विश्लेषण झाले असते तर अधिक योग्य झाले असते.

महेंद्र देव आणि मुणगेकर यांनी आपल्या निबंधामध्ये महाराष्ट्राच्या शेती विकासासाठी एक ''नीलप्रत'' च (Blue Print) सादर केली आहे. राज्याच्या आर्थिक विकासामध्ये शेती क्षेत्राची भूमिका, सिंचनाच्या सोयी, शेतीच्या निविष्टी (Input) वरील सरकारी अनुदाने, शेतमालाच्या निर्यातीचे महत्त्व त्याची शक्याशक्यता, कमाल भू धारणे (सीलींग) चा प्रश्न, शेती संबंधीचे शिक्षण, विस्तारकार्यक्रम, चिरस्थायी (sustainable) शेतीविकास साधण्यासाठी काय काय करावे लागेल, शेतीवरील दुर्बल घटकांना संरक्षण देणे कसे आवश्यक आहे इ. अनेक घटकांचा लेखकद्वयाने सविस्तर उहापोह केला आहे. लेखकद्वयाने शिफारस केलेल्या गोष्टी प्रत्यक्षांमध्ये घडून आल्यास महाराष्ट्राचा शेतीक्षेत्रविकास झपाट्याने घडून येण्यास वेळ लागणार नाही. तथापि प्रस्तुत लेखामध्ये वर्णनात्मक आणि शिफारसवजा भाग जास्त आणि विश्लेषणात्मक भाग कमी आहे हे जाणवते.

महाराष्ट्रातील उद्योगधंद्यांच्या विकासाचे विश्लेषण करणारा लक्ष्मण बुरंगे यांचा सविस्तर लेख प्रस्तुत ग्रंथामध्ये समाविष्ट आहे या लेखामध्ये लेखकाने महाराष्ट्रातील उद्योगधंद्याच्या 1994-95 पर्यंतच्या विकासाचे विश्लेषण केले आहे. यासाठी लेखकाने शासकीय आकडेवारीचा उपयोग केला आहे. आपल्या लेखामध्ये लेखकाने (1) महाराष्ट्राच्या उद्योगधंद्यासंबंधी विकासामधील अखिल भारतीय स्थानामध्ये हळू हळू पण निश्चित अशी पिछेहाट होत आहे. (2) इतर राज्यांची उद्योगविकासामधील कामगिरी महाराष्ट्रापेक्षा सरस आहे. (3) महाराष्ट्रातील उद्योगधंद्यांची रोजगार निर्मिती संबंधीची कामगिरी अतिशय असमाधानकारक आहे.(4) उद्योगधंदे महाराष्ट्रातून बाहेर जात आहेत (5) स्पर्धात्मक निर्देशांक (competitive Index) मध्ये महाराष्ट्राचा क्रमांक 15 पैकी सातवा आहे. इत्यादी महत्त्वपूर्ण, धक्कादायक आणि अस्वस्थ करणारे निष्कर्ष काढले आहेत. अर्थात त्या निष्कर्षांना योग्य अशी संशोधनपद्धति आणि अधिकृत आकडेवारी यांचा पाया असल्यामुळे हे निष्कर्ष मान्य करणे भाग आहे. तथापि लेखकाने आपल्या निबंधामध्ये 1994-95 पर्यंतच्याच विकासाचा अभ्यास केला आहे. त्यानंतर नवीन आर्थिक धोरणांमध्ये महाराष्ट्राच्या उद्योगधंद्यामधील बदल, विकासाचा प्रश्न, नवीन धोरणामुळे निर्माण झालेल्या समस्या, त्यावरील उपाय इ. घटकांचा समावेश केला असता तर लेखाची उपयुक्तता अनेक पटीनी वाढली असती असे म्हटल्यास अयोग्य होणार नाही. तसेच उद्योगधंद्यांसंबंधी एकूण जी असमाधानकारक परिस्थिती आहे ती सुधारण्यासाठी लेखकाने निश्चित स्वरूपाची सविस्तर उपाययोजना सुचविली असती तर अधिक योग्य झाले असते.

आपल्या लेखामध्ये हातेकर आणि वेटे या

लेखकांनी सुद्धा महाराष्ट्रातील उद्योगधंद्यांच्या विकासासंबंधीचा असमाधानकारकपणा उघड केला आहे. लेखकद्वयाने ''एकूण घटक उत्पादकता'' (Total Factor Productivity) या संकल्पनेचा उपयोग केला असून 1990च्या दशकामध्ये ''एकूण घटक उत्पादकते'' मध्ये सातत्याने वाढ होत जाणे आवश्यक आहे असे सुचविले आहे.

मुणगेकर यांनी आपल्या लेखामध्ये महाराष्ट्राच्या एकूण आर्थिक विकासाचे विश्लेषण करण्यासाठी ''निव्वळ घरगुती उत्पादन'' या (Net state Domestic Product) संकल्पनेचा उपयोग केला आहे. लेखामधील संपूर्ण विश्लेषण सांख्यिकीय (statistical) असून राज्याच्या अर्थव्यवस्थेमधील प्राथमिक दुय्यम आणि तृतीय या विभागांचा तुलनात्मक विकास, त्यांचा घरगुती उत्पादनामध्ये बदलणारा वाटा यांचे सम्यक चित्रण आहे. उद्योगधंद्यांच्या असमाधानकारक विकासामुळे महाराष्ट्र राज्याला आपले अखिल भारतीय स्थान टिकवून ठेवणे कठीण होत आहे यावर मुणगेकर यांनी नेमके बोट ठेवले आहे.

'प्रादेशिक समतोल आणि विकासातील विषमता' या विषयावर प्रस्तुत ग्रंथामध्ये एकूण तीन लेख आहेत.

सुधा देशपांडे यांच्या लेखामध्ये महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाची लोकसंख्येच्या प्रश्नाशी सांगड घालण्याचा प्रयत्न आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचा लोकसंख्येच्या आरोग्यसेवा, शिक्षणसुविधा यावर अपेक्षित परिणाम झालेला नाही. जो काही विकास झाला त्याची फळे लोकसंख्येच्या सर्व वर्गांना समप्रमाणामध्ये मिळाली नसल्यामुळे आर्थिक विषमतेमध्ये वाढ झाली आहे असे देशपांडे यांनी नमूद केले आहे. देशपांडे यांनी आपल्या लेखामध्ये मानवी विकासाच्या प्रश्नाचा सखोल अभ्यास केला असून या बाबतीमध्ये महाराष्ट्र आणि केरळ यांची तुलना केली आहे. देशपांडे यांचा निष्कर्ष असा आहे की शिक्षणाच्या सोयी, आरोग्य सेवा या मानवी विकासाच्या महत्त्वाच्या बाबीमध्ये केरळच्या मानाने महाराष्ट्राची कामगिरी असमाधानकारक आहे. महाराष्ट्राने औद्योगिक विकासाला महत्त्व देताना मानवी विकासाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले असे देशपांडे यांनी मत व्यक्त केले आहे. आर्थिक विकास होऊन सुद्धा बालमृत्यूचे प्रमाण (केरळप्रमाणे) कमी करण्यामध्ये महाराष्ट्राला अपयश आले आहे असेही देशपांडे यांचे निरीक्षण आहे. मानवी विकास घडवून आणण्यासाठी आर्थिक विकासाबरोबरच आरोग्यसेवा आणि शिक्षणसुविधा-विशेषत: स्त्री शिक्षण यांची नितांत आवश्यकता आहे असे मत देशपांडे यांनी मांडले.

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न सीता प्रभू आणि पी.सी. सरकार या लेखकद्वयाने हाताळला आहे. त्यांच्या लेखाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रादेशिक समतोलाचा विचार करीत असतांना त्यांनी 'जिल्हा' हा मूलभूत घटक धरला आहे. 1984 मध्ये सरकारने नेमलेल्या 'दांडेकर समितीने' 'जिल्हा' हा मूलभूत घटक धरला नसल्यामुळे महाराष्ट्रातील विकासामधील विषमतेचे पुरेसे प्रकटीकरण झाले नसावे असे लेखकद्वयाचे मत दिसते. महाराष्ट्रातील जिल्ह्यांचा विचार केल्यास विकसित जिल्हे मोठ्या संख्येने पश्चिम महाराष्ट्रामध्ये आहेत. त्यामुळे आर्थिक विषमता अधोरेखित केली जाते असे लेखकद्वयाचे निरीक्षण आहे. प्रादेशिक विषमतोल हा महाराष्ट्राच्या आर्थिक विकासामधील एक अतिशय ज्वलंत असा सामाजिक आणि आर्थिक विषय असून त्यावर ताबडतोब उपाययोजना होणे आवश्यक आहे असे लेखकद्वय मत व्यक्त करतात.

महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमतेवर

र.पु.कुरुलकर यांचाही लेख प्रस्तुत ग्रंथामध्ये आहे. महाराष्ट्राचा आर्थिक विकास गेल्या कित्येक वर्षामध्ये अतिशय विषमतायुक्त असून आर्थिक विकास समतापूर्ण व्हावा या हेतूने महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेआधी 1953 मध्ये करण्यात आलेल्या ''नागपूर कराराची'' गेल्या 35-40 वर्षामध्ये अमलबजावणी झाली नसल्याबद्दल कुरुलकर यांनी खेद व्यक्त केला आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या विकासावर होणारा अतिरिक्त खर्च हा प्रादेशिक विषमता वाढविणारा एक प्रमुख घटक आहे असे कुरुलकर यांचे मत आहे. राज्यामधील वाढती प्रादेशिक विषमता नष्ट करण्यासाठी यापुढे 'जिल्हा' हा मूलभूत घटक धरुन विकासाचे कार्यक्रम आखावेत असे कुरुलकर सुचवितात.

महाराष्ट्रातील सरकारची वित्तीय परिस्थिती, बँकींग, दळणवळण पर्यटन, या विभागावर एकूण चार लेख आहेत.

अजित कर्णिक यांच्या लेखामध्ये महाराष्ट्र राज्याच्या एकूण वित्तीय परिस्थितीचा आणि विशेषकरुन सर्व प्रकारच्या 'तूटींचा' सखोल अभ्यास आहे. राज्य सरकारच्या अर्थसंकल्पांमध्ये सर्व प्रकारच्या तुटींचे प्रमाण वाढते असून सरकारचा विकासकामावरील खर्च कमी होत आहे असे कर्णिक यांनी निरीक्षण केले आहे. नवीन आर्थिक धोरण सुरु झाल्यानंतर सुद्धा राज्याच्या वित्तीय परिस्थितीमध्ये फारशी सुधारणा घडून आलेली नाही, भांडवली विभागाकडील पैसे सरकार महसुली तूट भरुन काढण्यासाठी वापरत असून ही अनिष्ट गोष्ट होय, महसुली तुटीचे प्रमाण सतत वाढते आहे, विकासासाठी आवश्यक असलेल्या भांडवली खर्चाचे प्रमाण कमी कमी होत आहे, आणि एकूणच वित्तीय आघाडीवर परिस्थिती चिंताजनक आहे असा कर्णिक यांचा निष्कर्ष आहे. कर्णिक यांच्या लेखामध्ये महाराष्ट्राच्या वित्तीय परिस्थितीचा सांगोपांग अभ्यास आहे.

भोळे आणि शबान यांनी महाराष्ट्रातील बँक व्यवसायाचा समग्र अभ्यास करणारा विस्तृत लेख लिहिला आहे. महाराष्ट्रामध्ये बँकाँच्या कार्यालयांच्या संख्येमध्ये होत असलेली वाढ, बँकांच्या ठेवी आणि कर्जामध्ये होत असलेली वाढ ही अखिल भारतीय पातळीवर होत असलेल्या वाढीपेक्षा कमी आहे आणि बँक व्यवसायामधील महाराष्ट्राचा वाटा कमी होत आहे असा काहीसा धक्कादायक परंतु महत्त्वपूर्ण निष्कर्ष भोळे आणि शबान यांनी काढला आहे. तसेच राज्यामध्ये बँकामार्फत ग्रामीण भागाकडून नागरी भागाकडे पैशाचा ओघ जात असून त्यामुळे ग्रामीण भागांच्या विकासामध्ये अडथळे येत आहेत आणि राज्यामध्ये बँकव्यवसायाचा विकास विषमस्वरूपाचा झाला आहे असाही लेखकद्वयाचा निष्कर्ष आहे.

श्रीरामन् यांच्या लेखामध्ये महाराष्ट्रातील वाहतूक व्यवस्था आणि दळणवळण व्यवस्थेचा अभ्यास आहे. आर्थिक बाबीमध्ये महाराष्ट्र राज्याची पिछेहाट होत असून इतर राज्ये पुढे जाण्याचा जोमाने प्रयत्न करीत आहेत असा अनेक अभ्यासकांचा निष्कर्ष आहे. परंतु या पिछेहाटीस महाराष्ट्र राज्यातील पायाभूत सोयींचा अपुरेपणा/असमाधानकारकपणा आणि विशेषत: दळणवळण सोयींचा अपुरेपणा प्रामुख्याने कारणीभूत आहे असे श्रीरामन् यांचे मत आहे. महाराष्ट्र राज्याच्या 'राज्य मार्ग परिवहन' (एस.टी.) व्यवस्थेचा अभ्यास सुद्धा श्रीरामन यांच्या लेखामध्ये आहे.

त्रिवेदी आणि चक्रवर्ती यांनी आपल्या लेखामध्ये महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्राच्या विकासाचा अभ्यास केला आहे. प्रस्तुत लेखामध्ये पर्यटनाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्याची गोवा, केरळ आणि राजस्थान या राज्याशी तुलना केली असून महाराष्ट्राची

कामगिरी समाधानकारक आहे तरी सुधारणा करण्यास वाव आहे असा लेखिकाद्वयाचा निष्कर्ष आहे.

महाराष्ट्र राज्याचे सामाजिक क्षेत्र, मानवीविकास, मागासवर्गीय आणि दलित यांची परिस्थिती, आर्थिक/सामाजिक न्याय दारिद्र निवारण, अन्नसुरक्षा इत्यादि विषयावर सहा लेख प्रस्तुत ग्रंथामध्ये आहेत.

के.सीता प्रभू आणि संगीता कामदार यांनी आपल्या लेखामध्ये असे मत व्यक्त केले आहे की महाराष्ट्रामध्ये आर्थिक वृद्धी होऊन सुद्धा पुरेसा, मानवी विकास साधण्यामध्ये राज्याला अपयश आले आहे. त्यामुळे आर्थिक वृद्धि झाली पण मानवी विकास कोठे आहे ? असा प्रश्न पडतो. मानवी विकासासाठी प्रथम आवश्यक गोष्ट म्हणजे दारिद्र्यनिवारण ! ती साधण्यामध्ये राज्याला फारसे यश मिळाले नाही. गरिबी लक्षणीय प्रमाणामध्ये कमी झाली नाही, केरळ राज्याशी तुलना करता आरोग्यसेवा आणि शिक्षण- विशेषत: स्त्रीशिक्षण- या बाबतीत महाराष्ट्र मागे पडला आहे, राज्याच्या आर्थिक विकासामध्ये प्रादेशिक विषमता वाढत असून मराठवाडा आणि विदर्भ हे विभाग आर्थिकदृष्ट्या पश्चिम महाराष्ट्रापेक्षा मागासलेलेच आहेत. राज्याचा सामाजिक क्षेत्रावर होणारा खर्च कुंठित झाला आहे त्यामुळे इ.स. 2000 पर्यंत "सर्वांना शिक्षण व सर्वांना आरोग्यसेवा " ही घोषणा प्रत्यक्षात येणे अशक्य दिसते असे लेखिकांनी निरीक्षण केले असून राज्याने सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत असे आग्रहपूर्वक सुचविले आहे. परंतु लेखाचा एकूण सूर निराशावादी वाटतो.

सूर्यनारायण यांच्या लेखामध्ये महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण दारिद्र्य निवारणाचे विश्लेषण आहे. दरडोई उत्पन्नामध्ये महाराष्ट्र राज्य जरी तिसऱ्या क्रमांकावर असले आणि मोठ्या प्रमाणामध्ये औद्योगिकीकरण झाले असले तरी 1958 ते 1991 या काळांत ग्रामीण दारिद्र्य निवारणामध्ये राज्याची कामगिरी अत्यंत असमाधानकारक आहे आणि त्यामुळे राज्याच्या विकासासंबंधीच्या धोरणाबाबत प्रश्नचिन्ह उभे रहाते असा लेखकांचा निष्कर्ष आहे. राज्यामधील ग्रामीण दारिद्र्याचे प्रमाण अखिल भारतीय ग्रामीण दारिद्र्याच्या प्रमाणापेक्षा जास्त, विकासाच्या फायद्यांचे तळागाळापर्यंत झिरपण जवळजवळ नाहीच, लोकांना अन्नाची उपलब्धता अत्यंत असमाधानकारक आणि एकूण ग्रामीण दारिद्र्य निवारणामध्ये आणि जनतेचे जीवनमान सुधारणे यामधील एकंदर प्रभावहीन कामगिरी असे सूर्यनारायण यांनी महाराष्ट्राच्या या क्षेत्रातील कामगिरीचे वर्णन केले आहे. तथापि लेखकांनी आपला अभ्यास 1991 सालापर्यंतच मर्यादित ठेवला आहे. 1991 नंतर नवीन आर्थिक धोरणामुळे दारिद्र्यनिवारण आणि आर्थिक न्याय या क्षेत्रामध्ये कोणत्या समस्या उत्पन्न झाल्या त्यावर कोणते उपाय करणे शक्य आहे याचा अभ्यास प्रस्तुत लेखामध्ये समाविष्ट केला असता तर प्रस्तुत लेख अधिक उद्बोधक आणि मार्गदर्शक झाला असता.

एस. महेंद्र देव यांच्या लेखामध्ये 'सार्वजनिक धान्य वाटप' (रेशनिंग) व्यवस्थेचा सांगोपांग अभ्यास आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण जनतेला पुरेसे अन्नधान्य उपलब्ध करुन देण्यामध्ये सार्वजनिक धान्य वाटप यंत्रणा फसली असल्याचे 'देव' यांनी नमूद केले आहे. आपल्या दारिद्र्यामुळे ग्रामीण जनतेला या यंत्रणेचा पुरेसा फायदा घेता येत नाही असे लेखक म्हणतात. या यंत्रणेबद्दल इतर अभ्यासकानी जे आक्षेप घेतले/दोष दाखविले तेच आक्षेप/दोष महेंद्र देव यांनी दाखविले आहेत. ते म्हणजे - या यंत्रणेमुळे शहरी भागाला झुकते माप, गरीब नसलेल्यांना फायदा मिळणे, या यंत्रणेमधील अन्नधान्याच्या किंमती आणि बाजारातील किंमत यामध्ये फारसा फरक नसल्यामुळे धान्याचा पुरेसा उठाव नसणे, यंत्रणेमध्ये

घुसलेला भ्रष्टाचार, खऱ्या गरिबांना फायदा न मिळणे इ. या यंत्रणेचे योग्य आकलन होण्यासाठी हा लेख उपयुक्त आहेच परंतु नवीन आर्थिक धोरणाच्या संदर्भामध्ये या योजनेचे स्थान, भवितव्य इ. बाबींचा अभ्यास झाला असता तर लेख अधिक उपयुक्त झाला असता.

एस. थोरात यांनी आपल्या लेखामध्ये महाराष्ट्रातील अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्या आर्थिक परिस्थितीचे आणि त्यांना मिळालेल्या आर्थिक न्यायाचे विश्लेषण केले आहे. या संदर्भामध्ये पुरेशी आकडेवारी मिळत नाही असे थोरात लिहितात. तथापि उपलब्ध आकडेवारीचा अभ्यास केला असता थोरात यांचे मत असे की ''थोडासा विकास'' होऊन सुद्धा, जमीन धारणा, रोजगार संधी, इ. महत्त्वाच्या बाबतीत हे मागासवर्गीय आणि इतर (पुढारलेले) वर्ग यामध्ये खूपच विषमता अजून देखील शिल्लक आहे. अनुसूचित जाती जमातीमध्ये भूमिहीनत्वाचे प्रमाण अजूनही खूप मोठे आहे. त्यामुळे या वंचिताना न्याय मिळवून देण्यासाठी जोमाने प्रयत्न झाले पाहिजेत असे थोरात यांचे मत आहे. तथापि यासाठी काही विशेष सूचना केल्या असत्या तर लेखाची उपयुक्तता वाढली असती असे म्हणावे लागते. त्याचप्रमाणे सध्याच्या स्पर्धा आणि खाजगीकरणाच्या काळात आर्थिक/सामाजिक न्याय देण्यामध्ये शासन कितपत प्रभावी ठरेल याचा विचार हवा होता.

विभूति पटेल यांनी आपल्या लेखामध्ये महाराष्ट्रातील आर्थिक विकासाचा महिलांवर होणाऱ्या/झालेल्या परिणामांचा अभ्यास केला आहे. महिलांच्या सबलीकरणाच्या कार्यक्रमामध्ये महाराष्ट्र शासन सक्रिय आहे आणि यामुळे सबलीकरणाच्या कार्यक्रमामध्ये राज्याला उल्लेखनीय यश मिळाले आहे असे समाधान लेखिकेने व्यक्त केले आहे.

एस. महेंद्र देव यांनी आपल्या लेखामध्ये महाराष्ट्राच्या 'रोजगार हमी योजनेचे' सखोल विश्लेषण केले आहे. रोजगार हमी योजनेबद्दल देव यांनी असे मत व्यक्त केले आहे की ही योजना आर्थिक विकासाला पर्याय म्हणून वापरु नये, तसेच या योजनेतून समाजासाठी टिकाऊ मत्ता निर्माण व्हावी उदा. इमारती, रस्ते, तलाव इ.

महाराष्ट्रातील सहकारी क्षेत्र आणि कामगार संघटना यावर दोन लेख आहेत.

डी.पी. आपटे यांनी महाराष्ट्रातील सहकारी चळवळीच्या यशापयशाची चर्चा केली आहे. 1960 ते 1995 या काळामध्ये सहकारी सोसायट्यांची संख्या, सभासदसंख्या यामध्ये वेगाने वाढ झाली. साखर आणि दूध उत्पादन या क्षेत्रामध्ये सहकाराने स्पृहणीय यश मिळविले असे आपटे यांनी मत व्यक्त केले आहे.

डॉली सनी यांनी कामगार संघटनांचा अभ्यास केला आहे. नवीन आर्थिक धोरण आणि खाजगीकरण यांचा दबाव कामगार संघटनावर पडत असून संघटनाना त्यातून मार्ग काढावा लागेल आणि त्यासाठी संघटना राजकारण निरपेक्ष ठेवणे, असंघटित क्षेत्रामध्ये संघटना बांधणे इ. कार्यक्रम करावे लागतील असा लेखिकेने इशारा दिला आहे.

प्रस्तुत ग्रंथ वाचल्यानंतर, गेल्या सुमारे 45 वर्षांमधील महाराष्ट्र राज्याचा एक विस्तृत असा आर्थिक इतिहास वाचकांच्या समोर उभा राहतो. गेल्या कित्येक वर्षांमध्ये विकासाच्या दृष्टीने सर्वतोपरी प्रयत्न करुन सुद्धा महाराष्ट्राचे विकासाचे एकूण चित्र फारसे समाधानकारक नाही. शेतीक्षेत्र, औद्योगिक विकास, रोजगार निर्मिती, दारिद्र्य निवारण इत्यादी अतिशय महत्त्वाच्या आर्थिक क्षेत्रामध्ये महाराष्ट्र राज्याला म्हणावे तसे यश मिळाले नाही हे स्पष्ट होते. विशेषतः प्रादेशिक समतोल, मानवी विकास आणि

दारिद्र्य निवारण या क्षेत्रामधील राज्याचे अपयश चिंताजनक आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे या अपयशासंबंधी सर्व मान्यवर अर्थशास्त्रज्ञांचे एकमत दिसते. झालेला विकास कोणीच नाकारीत नाही. परंत विकासाच्या फळाचे वाटप मात्र न्यायोचित झाले नाही असा सर्व लेखकांचा सूर दिसतो. संशोधकानी सांगोपांग अभ्यास करुन व्यक्त केलेल्या मतांचा आणि सूचनांचा गंभीरपणे विचार केला जावा अशी अपेक्षा अनाठायी ठरणार नाही.

प्रस्तुत ग्रंथ अभ्यासकांना आणि संशोधक/लेखकांना संदर्भ ग्रंथ म्हणून अतिशय उपयोगी आहे यात शंका नाही. या ग्रंथामध्ये अंतर्भूत असलेली माहिती, त्या माहितीचे मान्यवर अर्थशास्त्रज्ञानी केलेले विश्लेषण, आर्थिक प्रश्नाचा सांगोपांग अभ्यास करतांना त्यांनी वापरलेली संशोधन पद्धती, लेखाच्या शेवटी दिलेले संदर्भ या सर्व गोष्टी लेखकांना आपापले शोधनिबंध अथवा शोधप्रबंध लिहितेवेळी मार्गदर्शक ठरतील. अर्थशास्त्रीय संशोधनामध्ये संशोधन पद्धतीस असलेले अनन्यसाधारण महत्त्व लक्षांत घेता, प्रस्तुत ग्रंथामुळे विविध संशोधनपद्धती एकाच पुस्तकामध्ये संशोधकांना उपलब्ध झाल्या आहेत हे विशेष होय. उदयोन्मुख संशोधकांना याचा निश्चित फायदा मिळू शकेल.

या ग्रंथामध्ये समाविष्ट असलेल्या बहुतेक लेखांमध्ये सादर केलेली आकडेवारी/माहिती इ. साधारण चार पाच वर्षापूर्वीची आहे. स्वत: संपादकानी याचा उल्लेख केला आहेच. माहिती थोडी जुनी असली तरी त्यामुळे निष्कर्षामध्ये फरक पडत नाही हे खरे आहे. तथापि सध्याच्या गतिमान आणि माहिती क्रांति च्या युगामध्ये माहिती शक्यतो अद्ययावत असणे इष्ट आहे. त्यादृष्टीने नवीन आर्थिक धोरणामुळे अर्थव्यवस्थेमध्ये झालेले बदल, समस्या,त्यावरील उपाय इ. गोष्टींचा उहापोह इ. अद्ययावत माहिती दिली असती तर ग्रंथाची एकूण उपयुक्तता अधिकच वाढली असती असे म्हटल्यास चुकीचे होणार नाही.

ग्रंथामध्ये समाविष्ट केलेले जे लेख यापूर्वी इतरत्र प्रसिद्ध झाले असतील तर त्या नियतकालिकांचे नांव आणि प्रसिद्धीची तारीख इ. माहिती द्यावयास हवी होती असे वाटते. ग्रंथाच्या उपयुक्ततेमध्ये अधिकच भर पडली असती.

या काही त्रुटी/उणीवा असल्या तरी ग्रंथ अतिशय वाचनीय असून विद्यार्थी/प्राध्यापक/अभ्यासक/संशोधक या सर्वांनी आवर्जून वाचावा असा हा संग्राह्य ग्रंथ आहे. प्रत्येक महाविद्यालय, विद्यापीठ आणि इतर संस्थांच्या वाचनालयामध्ये हा ग्रंथ अवश्य संग्रही असावा. बऱ्याच वर्षांनी अशा प्रकारचा ग्रंथ अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना उपलब्ध करुन दिल्याबद्दल भालचंद्र मुणगेकर अभिनंदनास पात्र आहेत.

● ● ●

सत्ताविसावे वार्षिक अधिवेशन
सूत्रसंचालकांचे अहवाल
चर्चासत्र पहिले.

# माहितीचे अर्थशास्त्र

● **समीक्षक - अंजली कुळकर्णी, नागपूर.**
*प्राध्यापक व विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, नागपूर विद्यापीठ.*

● **सूत्रसंचालक - विनायक देशपांडे, नागपूर.**
*प्रपाठक, अर्थशास्त्र विभाग नागपूर विद्यापीठ, नागपूर*

## उपोद्घात

1996 मध्ये मीअरलेस व विलीयम विकरी या दोन अर्थशास्त्रज्ञांना असममिती माहिती (Assymetric information) च्या संदर्भात 'प्रोत्साहनात्मक आर्थिक सिद्धांता विषयक' त्यांच्या मूलभूत योगदानाबद्दल नोबेल पारितोषिक देण्यात आले. तर 2001 चे पारितोषिक सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ जॉर्ज ॲकरलॉफ, मायकेल स्पेन्स व जोसेफ स्टींगलिट्झ या तिघांना असममिती माहितीच्या संदर्भात बाजाराच्या विश्लेषणासाठी देण्यात आले. ॲकरलॉफने 1971 साली लिहिलेल्या लेखात वास्तविक जागतिक बाजारांचे भारतासारख्या विकसनशील देशाच्या संदर्भात विवेचन केले असून त्यात 'प्रतिकूल पसंती प्रारुपांचे' (Adverse Selection Model) प्रयोजन करुन बाजारातील कार्यप्रणालीचे सविस्तर वर्णन केले. स्पेन्सर यांनी श्रमबाजारातील माहितीसंपन्न श्रमिक, असममिती माहितीमुळे निर्माण झालेले अनुचित परिणाम आपल्या उत्पादकतेच्या इशाऱ्यांद्वारे कसे कमी करतात ते दाखविले आहे. 1976 मध्ये रॉशिल्ड व स्टीगलिट्झ यांनी विमा बाजाराच्या संदर्भात विमा कंपनी वेगवेगळ्या जोखीमांची तपासणी करुन विमा विषयक नव्या योजना कशी तयार करते व त्यावरुन तिला सामाजिक लाभ कसा प्राप्त करता येतो ह्याचे वर्णन आपल्या माहिती अर्थशास्त्रातील योगदानाच्या रूपाने केले आहे. असममिती माहितीच्या क्षेत्रात ह्या तीन अर्थशास्त्रज्ञांनी नव्या संकल्पना विकसित केल्या. 1980 पर्यंत माहिती अर्थशास्त्राचा विकास खूपच मर्यादित राहिला असून प्रमुख अभिकर्ता सिद्धांताच्या चौकटीतच त्याचा विकास झाला. खाजगी माहिती संचाची संकल्पना, संदेश फलन, माहिती प्रक्रियेची यंत्रणा या सर्व संकल्पना त्यातून विकसित झाल्या. वरील सिद्धांताचे प्रयोजन आरोग्य विमा उद्योगाच्या संदर्भात झाले. त्यात विमा कंपनी ही प्रमुख व ग्राहक हे अभिकर्ते गृहीत धरले असून ॲकरलॉफने या संदर्भात प्रतिकूल पसंतीची समस्या कशी असते हे सांगितले आहे.

प्रतिकूल पसंतीच्या समस्येमुळे व स्पर्धेतून निर्माण होणाऱ्या तणावामुळे बाजार अर्थव्यवस्थेमधील पेढ्या ह्या वास्तविक तसेच

संभाव्य क्रेते, विक्रेते व नोकरदार यांची माहिती सातत्याने प्राप्त करीत असतात. विमा बाजारात अपघाताच्या वेगवेगळ्या प्रकारासाठी विमाधारक वेगवेगळ्या रकमेचे हप्ते देतात. वास्तवातील बाजारपेठांच्या कार्यपद्धतीवर अर्थशास्त्रज्ञांच्या या त्रयीने जे भाष्य केले आहे, ते नाविन्यपूर्ण तर आहेच परंतु त्याचे परिणाम अर्थशास्त्राच्या परिघाबाहेर पोहचणारे आहेत. बाजारपेठांच्या कार्यपद्धतीबाबत रुढ अर्थशास्त्रात हे भाष्य प्रचलित गृहीतांपेक्षा वेगळे आहे. या तीन अर्थशास्त्रज्ञांच्या विवेचनाची ढोबळ दिशा वास्तवातील बाजारपेठा या रूढ अर्थशास्त्रातील बाजारपेठांपेक्षा कशा रीतीने वेगळ्या आहेत किंवा त्यांची कार्यपद्धती कशी वेगळी आहे ह्याचा अभ्यास करुन, त्याचा शासनाच्या धोरणाशी संबंधित व संलग्नित बाबींवर कसा परिणाम होतो याची माहिती उपलब्ध करुन देणे ही आहे.

माहिती अर्थशास्त्रात, रूढ अर्थशास्त्रातील गृहीतांना वास्तवातील परिस्थितीच्या आधारावर तपासून पाहता त्यात मूलभूत स्वरुपाचे बदल करणे आवश्यक आहे असे वाटल्याने त्या दृष्टीकोनात बदल करण्यात आले. परंपरागत अर्थशास्त्रात, पूर्णस्पर्धेच्या प्रतिमानात, माहितीची उपलब्धता उत्पादनातील सर्व घटकांना, अभिकर्त्यांना तसेच ग्राहकांना आहे असे गृहीत धरले असल्याने माहितीच्या असमरूपतेमुळे निर्माण होणाऱ्या असंतुलनाचा, बाजारातील विरुपणांचा, नैतिक जोखीमेतून निर्माण होणाऱ्या समस्यांचा, तसेच धोरणात्मक बाबींचा त्यात फारसा विचार केलेला आढळत नाही. माहिती अपर्याप्त असेल व बाजारपेठा अपूर्ण असतील तर वैयक्तिक निर्णयाचे सार्वत्रिक परिणाम विचारात घेणे अपरिहार्य ठरते. त्या दृष्टिकोनातून नैतिक जोखीमीची समस्या, त्याचा उद्‌गम, व्याप्ती, त्यातून निर्माण होणारे धोरणात्मक बदल, ह्या सर्वाचा माहिती अर्थशास्त्रात विचार करण्यात आला आहे. माहिती अर्थशास्त्राच्या आधारे बाजारपेठेतील ज्या समस्यांचा निर्देश होतो त्या जुन्या समस्यांपेक्षा जास्त व्यापक आहेत.

**निबंधाचा गोषवारा**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या (2003) अधिवेशनात 'माहितीच अर्थशास्त्रे', या विषयावरील चर्चासत्रासाठी एकूण चार शोधनिबंध सादर करण्यात आले. ढोबळमानाने त्याचे वर्गीकरण खालील तीन उपविषयात केले आहे.

1. बाजार अर्थव्यवस्था व माहितीची मागणी या संदर्भात एक शोधनिबंध प्राप्त झाला.

2. श्रम बाजार व माहितीचे अर्थशास्त्र यात दोन शोध निबंध प्राप्त झाले.

3. वित्तीय बाजार व असममिती माहिती व नैतिक जोखमीची समस्या या संदर्भात एक शोध निबंध प्राप्त झाला.

विजय ककडे व रविंद्र गिरी या लेखकांनी 'माहिती मागणी- एक अभ्यास' या लेखात, माहितीच्या व्यक्तिगत तसेच सामाजिक स्तरावरील बाजारपेठेचे स्वरूप, दरनिर्धारण, दरधोरण, सेवांची गुणवत्ता याबाबत सविस्तर चर्चा केली. शोधनिबंधाच्या प्रस्तावनेत त्यांनी माहिती अर्थशास्त्राची व्याप्ती व भूमिका सांगितली असून त्यात माहितीचे महत्त्व, त्याची किंमत, त्यातून सामाजिक कल्याणावर होणारा परिणाम, या सर्वांचा अभ्यास केला जातो असे म्हटले आहे. माहितीचे अर्थशास्त्र हे आता विकासाच्या अर्थशास्त्राइतके किंवा अर्थशास्त्राच्या इतर शाखांइतकेच महत्त्वाचे आहे असे सांगून माहिती व तिची उपलब्धता ही विकसित देशांच्या तुलनेत विकसनशील देशांना अधिक परिणामकारक ठरणारी असते. परंतु त्याच्या उपलब्धतेत अनेक अडचणी येतात व मिळालेली

माहिती ही अपुरी असते तसेच माहितीच्या उपलब्धतेमुळे मिळणारे लाभ हे लोकांच्या जागरूकतेवर अवलंबून असतात. साक्षरता, सामाजिक परिपोष व आर्थिक हितसंबंध यांचाही प्रभाव पडत असतो असे त्यांनी आपल्या लेखात नमूद केले आहे. माहितीच्या उपलब्धतेत सकारात्मक तसेच नकारात्मक असे दुहेरी हितसंबंध गुंतलेले असतात. प्रदूषण व हानीकारक घटकाबाबत त्यांच्या मते नकारात्मक हितसंबंध गुंतलेले असतात. लेखकांनी आर्थिक प्रगतीबरोबर होणाऱ्या एकसंघ बाजारपेठेचे श्रेय, माहिती तंत्रज्ञानाच्या विकासास दिले आहे.

लेखकांनी माहिती तंत्रज्ञानाची प्रगती ही वेगवान, कमी खर्चाची व त्यामुळे सर्वांना उपलब्ध होणारी असल्यामुळे लोकांना आपले निर्णय अधिक कार्यक्षमपणे घेता येतील असे सांगितले आहे. माहितीची उपलब्धता व तिचा खर्च ही पुरवठ्याची बाजू जशी महत्त्वाची आहे तशी माहितीची मागणी व तिचा वापर हाही घटक तितकाच महत्त्वाचा आहे असे त्यांच्या विवेचनात दिसते.

लेखकांनी माहितीच्या उपलब्धतेचे व्यक्तिगत व सामाजिक स्तरावर विवेचन केले असून त्यात व्यक्तिगत स्तरावर दूरदर्शन, आकाशवाणी ही दृकश्राव्य, तसेच संपर्कसाधनांमध्ये इंटरनेट, मोबाईल ही साधने महत्त्वाची आहेत असे सांगून दूरदर्शन माध्यमातून मनोरंजनाबरोबर शेती, उद्योग, व्यापार या संबंधी महत्त्वपूर्ण माहिती दिली जाते व सामाजिक लाभाचे देखिल महत्तमीकरण करता येते असे सांगितले आहे.

माहितीस्रोतांच्या संबंधी संस्थात्मक बदलांचा ऊहापोह देखिल लेखकांनी केला असून पूर्वीही या क्षेत्रात शासनाचा व्यापक सहभाग होता, परंतु अलिकडच्या काळात झालेल्या धोरणात्मक बदलांचा परिणाम म्हणून खाजगी क्षेत्र व खाजगी वाहिन्या ह्यांचा प्रभाव वाढला आहे, व ही साधने नफा मिळविण्याचा एक महत्त्वाचा मार्ग आहेत. हे लक्षात आल्यानंतर माहिती साधनांवर प्रभुत्व मिळविण्यासाठी बहुराष्ट्रीय कंपन्यांमधे चढाओढ सुरू होऊन तांत्रिक प्रगतीचा वापर स्वत:च्या फायद्यासाठी करण्याची प्रवृत्ती कशी वाढत चालली आहे हे या लेखात सांगितले आहे.

वाहिन्या सशुल्क करणे, त्यांच्या वापरासाठी सेट टॉप बॉक्स व्यवस्था व कॅस रचना विकसित करणे इ. सोयी करण्यात आल्या; पण हे धोरण नफाखोरीचे राहीले. ग्राहक केन्द्रीत धोरणाचा त्यात अभाव दिसतो काही मोजक्या कंपनीचे हितसंबंध जोपासणारे हे धोरण असून जाहिरातींच्या माध्यमातून भरमसाठ उत्पन्न मिळवून दुसऱ्या बाजूने भरमसाठ दराने शुल्क घेण्याचे हे धोरण समाजहिताच्या दृष्टिने घातक आहे. जाहिरातीच्या जोरावर उत्पन्न न मिळविता गुणात्मकता व सेवेतील विविधता यांच्या आधारावर उत्पन्न वाढीचे प्रयत्न दूरदर्शन वाहिन्या करु शकतात.

मोबाईल सेवा हे दळणवळणाचे किंवा माहिती संदेशवहनाचे नवे लोकप्रिय साधन झाले असून तांत्रिक प्रगतीचा परिणाम व वाढत्या स्पर्धेचा परिणाम म्हणून ही सेवा वाजवी किंमतीत उपलब्ध होऊ लागली आहे. तथापि याही क्षेत्रात फसवणूक, अपुरी माहिती देणे, ग्राहकास पूर्णपणे विश्वासात न घेणे असे गैरप्रकार दिसतात. या साधनाने स्थलकाल निरपेक्ष संपर्क यंत्रणा उपलब्ध करुन दिली असल्याने माहितीची उपलब्धता वाढली आहे.

माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात साखळी परिणाम महत्त्वाचा असून सेवेचा लाभ घेणाऱ्यांची संख्या वाढत गेल्याने या क्षेत्रातील सरासरी खर्च घसरत जातो. त्यामुळे अनेक सेवा एकत्रितपणे देण्याचा प्रयत्न केला जातो असे लेखकांनी म्हटले आहे.

माहिती तंत्रज्ञानाच्या विकासाची

उपलब्धता सामाजिक स्तरावर प्राप्त करून देण्याच्या दृष्टिने माहिती प्राप्त करणे हा महत्त्वाचा हक्क ठरतो. माहितीचा अधिकार विषयक कायदा विविध देशात संमत करण्यात आला आहे. माहितीच्या अधिकारामुळे समग्रपातळीवर घेतले जाणारे निर्णय अधिक कार्यक्षम व लोक सहभाग वाढविणारे असल्याने अधिक कल्याणकारक ठरतील. माहितीचा अधिकार व ग्रामसभेचा अधिकार यातून सार्वजनिक व शासकीय स्तरावरील माहिती लोकांना सहजरित्या उपलब्ध होईल तसेच माहितीच्या अधिकारामुळे शासन व प्रशासन अधिक जबाबदार व पारदर्शक होईल असे लेखकांनी म्हटले आहे. परंतु माहिती अधिकार ही संकल्पना जरी व्यवहारात येत असली तरी त्यातील काही उणिवा दूर करणे आवश्यक आहे. माहिती देणे टाळणाऱ्या अधिकाऱ्यावर दंडात्मक कारवाई करण्याची तरतूद नाही. तसेच या कायद्यामध्ये माहितीस विलंब झाल्यामुळे होणाऱ्या नुकसानीस संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची तरतूद नाही.

लेखकांनी माहितीची मागणी, पुरवठा व त्यामध्ये समाविष्ट असणारी संस्थात्मक व्यवस्था या सर्वांचा सखोल अभ्यास करण्याची आवश्यकता प्रतिपादली आहे ही माहिती कमी किंमतीत कमी वेळात, उपलब्ध होण्याच्या दृष्टीने धोरणात्मक बदलकरणे व सार्वजनिक हित किंवा कल्याण साधण्याची आवश्यक आहे असे आपल्या लेखाच्या समारोपात सांगितले आहे.

दुसऱ्या उपविषयात दोन लेख आले असून त्यापैकी मंजुषा मुसमाडे यांनी 'संज्ञानयुगातील श्रमबाजार' या लेखात नव्या संज्ञान युगात बाजाराचे झपाट्याने बदलत जाणारे स्वरूप, त्याचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम अर्थव्यवस्थेला एक निश्चित दिशा देण्याच्या दृष्टिने त्याचे योगदान इ. पैलूंवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. माहिती प्रचुर-माहिती साक्षर-संज्ञान कामगार वर्गाने एका नव्या गुणवत्ता प्रधान व्यावसायिक शिस्त असणाऱ्या कार्यसंस्कृतीला जन्म दिला आहे. माहितीजालाच्या माध्यमातून अद्ययावत ज्ञान मिळविणे व त्याला अनुरूप काम शोधणे हे माहिती कामगाराचे वैशिष्ट्य राहील.

लेखिकेने आधुनिक श्रमबाजारातील स्त्रियांच्या स्थानाचे वर्णन करतांना हा श्रमबाजार लिंगभेदविरहीत राहील त्यात कुठेही स्त्रीवादी विचार सरणीचा प्रभाव राहणार नाही. असे सांगून बदललेल्या श्रमबाजारात 'माहिती क्रांतीचे' महत्त्व स्पष्ट केले आहे.

भारतासारख्या विकसनशील, प्रचंड मनुष्यबळ असणाऱ्या देशाला नवश्रमबाजारात, एक मोठी संधी चालून येत आहे. या दृष्टिने संपर्क माध्यमांचा योग्य उपयोग करून घेऊन जागतिक बाजारात एक स्वतंत्र स्थान निर्माण करून घेण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टिने भारतातील श्रमशक्तीच्या अनुकूल बाबींचा म्हणजे मोठ्या संख्येतील माहिती साक्षर युवा पिढी, इंग्रजीतील नैपुण्य तुलनेने स्वस्त, श्रम संपर्क माध्यमांचा पुरेसा वाढलेला प्रसार, ह्याचा फायदा घेऊन आपण आपला श्रम बाजार आधुनिक करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तसेच भारतीय श्रमबाजारात संरचनात्मक बदल होणे देखिल आवश्यक आहे. असे लेखिकेने सांगितले आहे.

कामगार कायद्याचे सदोष व विस्कळीत स्वरूप बदलून ते अधिक संघटित व नेमके करणे आवश्यक आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या व प्रगत देश भारतीय श्रमाला केवळ उत्पादन, व्यवस्थापन एवढेच नव्हे तर विक्री क्षेत्रातही स्वीकारत आहेत. त्यादृष्टीने कायदे करणे जरूर आहे. बौद्धिक संपत्ती रक्षणाचे पेटंटपुरक संबंधीचे कायदे अत्याधुनिक करावे लागतील. संगणक क्षेत्रात सायबरलॉज चे एक स्वतंत्र

दालनच तयार होत आहे. त्याचा देखिल फायदा घ्यावा लागेल.

कामगार संघटनांच्या स्वरूपातही बदल होणे आवश्यक राहील असे लेखिकेचे म्हणणे आहे. अतिरिक्त कामगार संघटनांचे विलीगीकरण करून त्यातील दोष दूर करणे व त्यांची वेतनवाढीसाठी जुनी नकारात्मक दूरदृष्टिची भूमिका सोडून कामगारांच्या प्रगती, कौशल्यवाढीसाठी प्रयत्न करणे व कामगाराच्या माध्यमातून भारताला माहिती महासत्ता बनविण्याची सुवर्ण संधी सोडू नये असे लेखिकेला वाटते.

श्रमबाजाराच्या संदर्भात दुसरा शोधनिबंध सोनाली मोरे ह्यांनी सादर केला असून त्यात त्यांनी आर्थिक उदारीकरणामुळे श्रमबाजारावर होणाऱ्या परिणामांचा मागोवा घेतला आहे. लेखिकेने जागतिकीकरणामुळे अर्थव्यवस्थेवर झालेल्या अनुकुल अथवा विपरित परिणामाची सविस्तर चर्चा त्यात केली आहे.

आर्थिक उदारीकरणाच्या प्रक्रियेचे कालावधीनुसार दोन टप्प्यात त्यांनी वर्गीकरण केले आहे. उदा. आर्थिक स्थिरीकरणाचा टप्पा (1991-93) व रचनात्मक बदलाचा टप्पा (1993 ते आजतागायत) त्या कालावधीत कामगारांच्या रोजगारात तसेच उत्पन्नात झालेल्या बदलांची सविस्तर माहिती दिलेली आहे. कामगारांचा आर्थिक बदलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक असून आर्थिक सुधारणा गरीबांना अहितकारक आहेत कामगार संघटनाचे स्वरूप व कार्य आर्थिक उदारीकरणामुळे बदलली आहेत असे लेखिकेने निष्कर्षात सांगितले आहे. जागतिकीकरणाने माणुस ही सर्वात मोठी संपत्ती आहे हे विसरायला लावले असून कामगार समस्या ही समाज समस्या बनली आहे असे म्हटले आहे.

तिसऱ्या उपविषयात आंतराष्ट्रीय वित्तीय संस्था व माहितीचे अर्थशास्त्र या संदर्भात राधिका लोबो यांचा एकमेव लेख (ज्याचा स्वैर अनुवाद रविंद्र जोशी यांनी केला आहे) असून त्यात असममिती माहितीची समस्या ही आंतरराष्ट्रीय स्तरावरील भांडवलांच्या प्रवाहातील एक प्रमुख समस्या आहे, असे लेखिकेचे म्हणणे आहे. त्यात प्रामुख्याने त्यांनी दोन समस्यांचे विवेचन केले आहे. धनकोला ऋणकोच्या पतविषयक माहितीचा अभाव असणे किंवा अपुरी माहिती उपलब्ध असल्याने ऋणकोची चुकीची निवड व ऋणकोंना दिलेल्या कर्जाचा दुरुपयोग या समस्येचे वर्णन नैतिक जोखीमेची समस्या या शब्दात करुन आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने दिलेल्या कर्जामुळे ही समस्या कशी निर्माण होते हे सांगितले आहे.

या लेखात आर्थिक संकटात सापडलेल्या मेक्सिको आणि विशेषत: आशियातील अर्थव्यवस्थांना संकटातून बाहेर काढण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने अंतिम ऋणदाता या भूमिकेतून जी मदत केली त्यामुळे आंतरराष्ट्रीय नाणेनिधी नैतिक जोखीमेच्या समस्येस कारणीभूत ठरली असे लेखिकेला वाटते.

दक्षिण पूर्व आशियात उद्भवलेल्या आर्थिक संकटास असममिती माहिती कशी जबाबदार आहे ह्याचे सविस्तर वर्णन लेखिकेने या लेखात केले आहे. त्यात आर्थिक कमकुवता निर्देशांक व संकट निर्देशांक अशा दोन निर्देशांकाच्या सहाय्याने असममिती माहितीचा, दक्षिणपूर्व आशियाई देशातील अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांची चर्चा केली आहे. संकटपूर्व काळात अगोदर कमकुवत झालेल्या ह्या अर्थव्यवस्था, परिस्थितीचा आघात सहन करू न शकल्याने जास्त कमकुवत झाल्या आहेत असे लेखिकेचे म्हणणे आहे.

तसेच लेखिकेने वित्तीय बाजारातील असममिती माहितीमुळे विपरित निवड व नैतिक जोखीम निर्माण होते व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने संकटात सापडलेल्या देशासाठी घेतलेली धाव ही ती समस्या दूर न करता ऋणकोला संकटातून सोडविण्याऐवजी संकटात अडकविते असे म्हटले आहे.

भाग 2

चर्चेचा गोषवारा

अनिश्चिततेचे अर्थशास्त्र आणि माहितीचे अर्थशास्त्र या दोहोंमध्ये मूलभूत फरक आढळतो. या दोन्ही विषयांच्या अभ्यासात अपूर्ण माहिती आणि त्यात असणारी अनिश्चितता याबाबतचा अभ्यास करण्यात येतो. हर्षफेलर आणि रीले यांच्या मते अनिश्चिततेच्या स्थितीत निर्णय घेण्याची प्रक्रिया ही घटनेच्या अनिश्चिततेशी संबंधित आहे. बाजारातील सर्वच सहभागी व्यक्तींसाठी अनिश्चितता ही समान असते. माहितीच्या अर्थशास्त्रात मात्र व्यूहरचनेची आखणी अभिप्रेत आहे. घटनेच्या अनिश्चिततेत अशा प्रकारची व्यूहरचना नसते.

बाजाराची एक बाजू, दुसऱ्या बाजूच्या कृती बद्दल अनभिज्ञ असते तेंव्हा नैतिक जोखीमीची समस्या उद्‌भवते. यालाच प्रच्छन्न कृत्य समस्या (Hidden Action Problem) देखील म्हणतात.

**प्रतिकूल निवड समस्या आणि नैतिक जोखीम समस्या**

ग्रामीण बँक विविध विकास योजनांसाठी कर्ज वाटप करताना ग्राम पंचायतीची मदत घेतात. बँका ग्राम पंचायतवर अवलंबून असतात, याचे कारण त्या गावामध्ये कर्ज बुडविणाऱ्या आणि कर्जाची परतफेड नियमित करु शकणाऱ्या व्यक्तींबाबतची माहिती ग्रामपंचायतीस असण्याची शक्यता अधिक असते. ग्रामपंचायत कर्ज परतफेडीच्या प्रक्रियेवर अधिक योग्य प्रकारे देखभाल करु शकतात. कर्जदारांच्या निवडीची समस्या ही प्रतिकूल निवड समस्या असून कर्जाची परतफेड ही नैतिक जोखीमीची समस्या आहे. ग्राम पंचायतीमुळे ग्रामीण बँकेची प्रतिकूल निवड समस्या काही प्रमाणात दूर होउ शकते. कर्ज घेणाऱ्यांच्या व्यवहारांची माहिती ग्राम पंचायतीला असल्याने काही प्रमाणात नैतिक जोखीमीची समस्या देखील सोडविण्यास मदत होते.

**संकेत** (Signalling)

स्पेन्स यांच्या मते संकेत म्हणजे असे व्यवहार ज्यामुळे माहिती पोचविण्यास मदत होते. नोकरीस ठेवणाऱ्या मालकाला, उमेदवाराच्या पूर्वीच्याकामाच्या अनुभवाच्या आधारे किंवा शैक्षणिक पात्रतेच्या आधारे उमेदवाराची पात्रता ओळखता येते. प्रदूषण करणारे मोठे उद्योजक नियमांचे पालन आपण करीत आहोत हे दर्शविण्यासाठी आय.एस.ओ. प्रमाणपत्र प्राप्त करतात किंवा धूरामुळे प्रदूषण होउ नये म्हणून यंत्रणा उभारतात. अशा प्रकारचे संकेत देऊन आपण नियमांचे पालन योग्यरित्या करीत आहोत हे दर्शविण्याचा ते प्रयत्न करतात. माहितीच्या अर्थशास्त्रात अशा प्रकारच्या संकेतांचे अनन्य साधारण महत्त्व आहे.

या चर्चा सत्रात सुरुवातीला रवीन्द्र गिरी, मंजुषा मुसमाडे आणि रवीन्द्र जोशी यांनी निबंधाचे सादरीकरण केले. यानंतर चर्चेला योग्य दिशा प्राप्त व्हावी म्हणून मेधा देशपांडे आणि निरज हातेकर यांना आमंत्रित करण्यात आले. 1970च्या दरम्यान माहितीच्या अर्थशास्त्राबाबतची जाणीव अर्थतज्ज्ञांना झाली. कल्याणाच्या अर्थशास्त्रातील मूलभूत नियम असे मानतो की, बाजारपेठेद्वारे कार्यक्षमता साध्य होउ शकेल. माहिती अर्थशास्त्रातील घडामोडींमुळे

याबाबतच्या सैद्धांतिक भूमिकेला धक्का बसला. असममिती माहितीच्या परिस्थितीत आर्थिक अभिकर्त्यांना विविध व्यूहरचनेमधून निवड करावी लागत असल्याने द्युत सिद्धांतानुसार असममिती माहिती असलेल्या समस्यांचे प्रतिमानीकरण करता येऊशकेल. बेनच्या सीमित किंमत निर्धारण प्रतिमानात पूर्ण माहितीच्या ऐवजी अपूर्ण माहितीच्या गृहीताचा अंतर्भाव केल्यास सीमित किंमत निर्धारण इष्टतम व्यूहरचनेत कशी परिवर्तीत होईल याबाबतचे विश्लेषण मिलग्रॉम आणि रॉबर्ट यांच्या अभ्यासात आढळते. असममिती माहितीची समस्या ही व्यावहारिक समस्या असल्याने आर्थिक समस्यांचे विश्लेषण असममिती माहिती गृहीत धरुन केल्यास अधिक उपयुक्त ठरु शकेल असे मत वक्त्यांनी मांडले. या चर्चासत्रात मेधा देशपांडे आणि निरज हातेकर यांच्या व्यतिरिक्त वि.वि. घाणेकर, अ.रा.पडोशी, दि.व्यं. जहागिरदार, रवीन्द्र दोशी, सर्जेराव ठोंबरे, श्री.आ. देशपांडे, सुषमा देशमुख, अवधूत नाडकर्णी आणि बोकील यांनी चर्चेत भाग घेतला.

संपूर्ण माहितीच्या अभावी योग्य व्यवहार घडून येत नसल्याने व्यवहार करणाऱ्यांपैकी एका अभिकर्त्याला नुकसान सहन करावे लागते. बाजार यंत्रणा अयशस्वी कशी होते हे समजून घेण्याच्या दृष्टीने माहितीचे अर्थशास्त्र उपयुक्त ठरु शकेल. काही वर्षापूर्वी बाजार अयशस्वी होतो, ही घटनाच कल्पनातीत होती. बाजाराधिष्ठीत व्यवस्था कोसळल्यास शासनाने कशा रीतीने सज्ज असावे याबाबतची कल्पना माहितीच्या अर्थशास्त्राच्या आधारे येउ शकेल असा साधारणपणे चर्चेचा सूर होता.

• • •

## देणगीदारांसाठी

उत्पन्न कर सवलतीचे प्रमाणपत्र (80G )मराठी अर्थशास्त्र परिषदेस प्राप्त झाले असून त्याची मुदत 31 मार्च 2005 पर्यंत आहे. देणगीदारांनी याचा लाभ घ्यावा.

**सर्जेराव ठोंबरे**
कार्यवाह-खजिनदार

चर्चासत्र दुसरे

# खाजगीकरण व निर्गुंतवणुकीकरण

● **समीक्षक - वसंत जुगळे, कोल्हापूर.**
*प्राध्यापक व विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.*

● **सूत्र संचालक - रवीन्द्र दोशी, कोल्हापूर.**
*भूतपूर्व प्राध्यापक व विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.*

## भाग 1

उदारीकरण, खाजगीकरण आणि वैश्विकीकरण ह्या रचनात्मक समायोजन कार्यक्रमांच्या प्रमुख अर्थप्रक्रिया आहेत.या अर्थप्रक्रियांचा क्रम कसा निर्धारित करावा याविषयी बरीच चर्चा झालेली (देवेंद्र दास, 1995) आहे. निर्गुतवणुकीकरण ही खाजगीकरणाचीच एक अर्थप्रक्रिया आहे. विशेषत: सार्वजनिक उपक्रमांचे खाजगीकरण करण्याची महत्त्वपूर्ण अर्थ प्रक्रिया म्हणजे निर्गुंतवणूकीकरण होय. ही प्रक्रिया कार्यान्वित करण्यामागची अनेक उद्दिष्टचे सांगितली जातात. ती कितपत योग्य अथवा अयोग्य आहेत यासंबंधी विवेचन अपेक्षित आहे.

या विषयावर एकंदर सोळा शोध निबंध सादर झालेले आहेत. यापैकी बहुतेक शोध निबंधामध्ये निर्गुंतवणुकीची उद्दिष्टचे, परिणाम आणि उपाययोजनांची चर्चा केलेली आहे. खाजगीकरणाच्या परिणामांची सर्वसाधारण चर्चा देखील काही शोधनिबंधामध्ये आहे.

निर्गुंतवणूकीचा विचार विविध अंगानी झालेला आहे. निर्गुंतवणुकीचा इतिहास, उद्दिष्टचे, निकष, धोरण आणि परिणामांची चर्चा सर्वच शोध निबंधामध्ये झालेली आहे. बहुतेकांनी दुष्परिणामांची चर्चा केली आहे. दोन शोध निबंधामध्ये खाजगीकरणाचे (काही मर्यादेपर्यंत) समर्थन केले आहे. दुष्परिणामांची चर्चा मात्र विविध निबंधात झाली आहे. त्यामध्ये औद्योगिक संबंध, कामगार, रोजगार, ग्रामीण अर्थव्यवस्था, शिक्षण, सामाजिक संतुलन यांची चर्चा केलेली आहे.

निर्गुंतवणूक करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची चर्चा बहुतेक सर्वच शोधनिबंधामध्ये केलेली आहे. काही शोधनिबंधामध्ये पर्यायी धोरणांची चर्चा केलेली आहे.

शोधनिबंधांचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे.-

खाजगीकरण आणि निर्गुंतवणुकीकरणाची संकल्पनात्मक चर्चा करून भारतीय अर्थव्यवस्थेतील अनुभव कथन करणारा शोधनिबंध ए. के. पाटील आणि एस. बी. यादव यांनी सादर केलेला आहे. निर्गुंतवणुकीचे उद्दिष्ट साध्य करणे अशक्य असून,

या बाबतीत कामगारांच्या हिताकडे दुर्लक्ष करु नये असे त्यांचे मत आहे. याच आशयाचा दुसरा शोधनिबंध एस्. आर. टकले आणि ए.बी.कुंटे यांचा आहे. भारतातील निर्गुंतवणुकीवर अधिक भर देऊन त्यांच्या परिणामाची चर्चा त्यांनी केलेली आहे. एस. बी. सानप आणि आर. बी. धांडे यांनी खाजगीकरणाच्या परिणामांची चर्चा केली आहे.

निर्गुंतवणुकीच्या परिणामांची चर्चा करणारे बरेच शोध निबंध आहेत. गरिब आणि श्रीमंती यातील दरी वाढून, अर्थव्यवस्थेचे पाश्चिमात्यीकरण होत असल्याची चिंता जी. डी. खरात यांनी वर्णिलेली आहे. यातून मुक्ती मिळविण्यासाठी काही उपाय त्यांनी सुचविलेले आहेत.

निर्गुंतवणुकीच्या वास्तववादी धोरणांची चर्चा आर. एस्. साळुंके आणि टी.व्ही. मुंडे यांनी केली आहे. कामगारांच्या हिताकडे दुर्लक्ष करणेही चुकीचे असून या बाबतीत पारदर्शकता मोलाची आहे असे लेखकांना वाटते.

उ.दे. वाकोडकर यांनी अनेक सरकारी उपक्रमांचे निर्गुंतवणुकीकरण कसे झाले, कवडीमोलाने हे उपक्रम खाजगी क्षेत्राकडे कसे सोपविले गेले याची चर्चा केली आहे.

भारतातील निर्गुंतवणुकीच्या वावटळीचे वर्णन तु.लि. बारबोले यांनी केले आहे. अनेक देशांचे अनुभव देखील फारसे अनुकूल नसल्याची माहिती बारबोले यांनी दिली आहे. आर. एम्. शिरसाठ यांनी निर्गुंतवणुकीची दिशा एकांगी विचारांनी प्रेरित झाल्याचे सांगून त्याच्या वास्तवतेची दशा वर्णिलेली आहे. आर. के. जाधव यांनी सार्वजनिक क्षेत्रातील निर्गुंतवणुकीकरणाचे धोरण हे देशाला संकटात टाकणारे आहे असे मत एस. जे. पाटील यांनी व्यक्त केले आहे.

निर्गुंतवणुकीच्या धोरणाची पार्श्वभूमी, इतिहास, उद्दिष्टचे, अपेक्षापूर्ती आणि उपाययोजनांची चर्चा दि.बी. भामरे यांनी केली आहे. हे धोरण चुकीचे नसून ती राबविण्याची पद्धती चुकीची असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

श.रा. गाडगीळ यांनी निर्गुंतवणुकीची व्युहरचना सांगून शासकीय यंत्रणेची आणि आकृतीबंधाची चर्चा केली आहे. ह्या धोरणाच्या अंमलबजावणीपेक्षा सार्वजनिक क्षेत्राची कार्यक्षमता वाढवावी तसेच सार्वजनिक क्षेत्राची अडचण होणार नाही हे शासन व्यवस्थेने पाहावे असे सूचित केले आहे.

शासननियंत्रित खाजगीकरणाच्या व्यवस्थेची चर्चा विकास खंदारे यांनी केली आहे. सार्वजनिक क्षेत्राच्या योगदानाचे आणि अपयशाचे वर्णन करुन त्याच्या निर्गुंतवणुकीच्या प्रक्रियेतील अदूरदर्शीपणाचे वास्तव सांगितले आहे.

सरकारने जनहिताचा विचार करून निर्गुंतवणुकीचे धोरण अंमलात आणले तर ते यशस्वी होईल असे रा. य. माहोरे यांना वाटते. खाजगीकरण आणि निर्गुंतवणुकीकरणामुळे औद्योगिक संबंध बिघडत असल्याचे म.बा. मुळीक यांना वाटते. खाजगीकरणाच्या प्रक्रियेत कामगारांचे हित लक्षात घ्यावे असे त्यांना वाटते.

आजच्या खाजगीकरणामध्ये देशीपणा राखून काही मर्यादेपर्यंत खाजगीकरण हितप्रद ठरेल असे मुक्ता जहागीरदार यांचे मत आहे.

शोधनिबंधातील विविधता लक्षात घेता खाजगीकरण आणि निर्गुंतवणुकीकरणामध्ये देशी डावपेच असावेत, पाश्चिमात्यांचे अनुकरण नको, औद्योगिक संबंध बिघडू नयेत, बेकारी वाढू नये, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कवडीमोलाला विकू नयेत अशा काही पर्यायांचा जरूर शोध घ्यावा. त्यामध्ये जनहित केंद्रिभूत असावे. सार्वजनिक क्षेत्राची कार्यक्षमता वाढवावी अशा अनेक महत्त्वपूर्ण सूचना

शोध निबंधामध्ये केलेल्या आहेत.

भाग 2

चर्चेचा गोषवारा

प्रत्यक्ष चर्चासत्राच्या वेळी 13 निबंध सादर झाले आणि त्यानंतर 10 व्यक्तींनी चर्चेत भाग घेतला.

चर्चेमध्ये या विषयाशी संबंधित महत्त्वाच्या मुद्यांवर भर दिला जावा यासाठी पुढील मुद्दे सूचसंचालकानी सभेपुढे आणले :

1. खाजगीकरण व निर्गुंतवणुकीकरण या उपाययोजनांची आवश्यकता.

2. यासंबंधातील सरकारचे धोरण, विविध राजकीय पक्षांचे दृष्टिकोन आणि सरकार पक्ष व विरोधी पक्ष यामधील एकवाक्यता.

3. खाजगीकृत उद्योग, श्रमिक आणि रोजगाराची परिस्थिती.

4. निर्गुंतवणुकीच्या प्रचलित पद्धतींना पर्याय.

5. खाजगीकरण किती मर्यादेपर्यंत करावयाचे ?

6 खाजगी व सरकारी क्षेत्रे :तौलनिक कार्यदक्षता ?

7. निर्गुंतवणूक व राजकोषीय तूट : यासंदर्भात कितीसे यश लाभले आहे ?

8. सरकारी क्षेत्र किती मर्यादेपर्यंत आणि कोणत्या उपक्रमांत शिल्लक ठेवावयाचे ?

9. सरकारी उपक्रमांमधील कर्मचाऱ्यांची निवृत्ती स्वेच्छा की सक्तीची ?

चर्चेमध्ये काही महत्त्वाच्या बाबी पुढे आणल्या गेल्या. खाजगीकरण आणि निर्गुंतवणुकीकरण ही धोरणे भारताच्या संसदेमध्ये सखोल चर्चा करून ठरविलेली नाहीत. असे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत जे आतापर्यंत चालले आणि जसे चालले त्यातून भरीव काही निर्माण होणार नाही. जिथे आवश्यक आहे तिथे खाजगीकरण होत नाही. वीज उत्पादन, व वाटप हे क्षेत्र याचे उत्तम उदाहरण आहे. याउलट, खाजगीकरण झाल्यानंतर त्यातून कोणत्या आपत्ती उद्‌भवतील याचे नमुनेदार उदाहरण म्हणजे शिक्षण क्षेत्र होय. जनतेला आर्थिक धोरणाच्या बाबतीत विश्वासात न घेता धोरणे राबविली जात आहेत. सर्वच आर्थिक क्षेत्रात अस्थायीपणा आढळतो.

निर्गुंतवणुकीमुळे कुणाचे हित साधले जाणार आहे ? हा प्रश्न परखडपणे पुढे आला. भारतातील उद्योगांकडे मोठे भांडवल गुंतवून सरकारी उद्योगांचे भांडवल आपले करण्याची क्षमता नाही. त्यामुळे या उपक्रमाचा फायदा बहुराष्ट्रीय कंपन्याच उठविणार हे स्पष्ट असल्याचे सांगण्यात आले. त्यानीच भारतीय कंपन्या ताब्यात घेण्याचा सपाटा चालविला आहे असे आढळते. हे असेच चालू राहिले तर भारत देश पुन्हा एकदा कोणाची तरी वसाहत बनण्याचा धोका आहे असा विचार ठामपणे मांडण्यात आला.

सरकारचा महसूल वाढविणे हा मुख्य उद्देश असल्यामुळे सरकार नफ्यात चालणाऱ्या संस्थांच्याच बाबतीत खाजगीकरण आणि निर्गुंतवणुकीकरण यांचा अनुनय करते आहे. सरकारी क्षेत्रातील तोटयात चालणारे उपक्रम आपल्याकडे घेऊन ते नफ्यात चालवून दाखविण्याची जोखीम पत्करावयाला खाजगी क्षेत्र उत्सुक नाही.

रोजगाराच्या संदर्भात एक कळीचा मुद्दा पुढे आला. सरकारी उपक्रमांमधून अनिवार्य बाब म्हणून रोजगार देताना मागासलेल्या जातीजमातींसाठी आरक्षणाचा नियम पाळला जातो. खाजगी क्षेत्रात आरक्षणाला मूठमाती दिली जाते. या परिस्थितीत, अधिकतर खाजगीकरणामुळे मागासलेल्या जातीजमातींना रोजगाराच्या संधी सहजपणाने उपलब्ध होणार नाहीत. ही समस्या कशी काय सोडविली

जाणार आहे असा अंतर्मुख करावयास लावणारा प्रश्न पुढे आला. यासाठी सर्व स्तरांवरील लोकप्रतिनिधींनी जागरुकता दाखवून जरुर त्या कायदेशीर तरतुदी करुन घेण्यावर भर दिला पाहिजे असे सुचविले गेले.

निर्गुंतवणुकीच्या कारणाने जी सरकारी क्षेत्रातील जिंदगी खाजगी क्षेत्रात जाईल त्या जिंदगीचे ते क्षेत्र काय करणार याबद्दल काहीच समजत नाही. खाजगीकरणानंतर अर्थव्यवस्थेमधील केवळ नागरी क्षेत्रात अधिक पैसा खेळत राहून ग्रामीण भागाला त्याचा फारसा लाभ मिळणार नाही. खाजगीकरणाची प्रक्रिया अयोग्य असल्यामुळे तिची उद्दिष्टे पूर्णपणे साध्य करता येणार नाहीत. खाजगीकरणात व्यापक जनहिताचा विचार झालेला नाही. अशा प्रकारच्या विचारांचे प्रतिपादन चर्चेतून केले गेले. सभेचा एकंदर सूर अधिकतर टीकाकाराचाच होता हे विविध मुद्यांच्या मांडणीतून स्पष्ट झाले.

• • •


# मराठी अर्थशास्त्र परिषद

## प्रकाशन पाचवे व सहावे

### मूल्य व वितरण (भाग 1 आणि 2) लेखक : ग. प्र. पिंपरकर

बी.ए. आणि एम.ए. च्या अभ्यासक्रमासाठी उपयुक्त ग्रंथ या ग्रंथाचे भाग 1 आणि 2 स्वतंत्रपणे आता विद्यार्थी व अध्यापकांना पुनर्मुद्रित स्वरूपात उपलब्ध झाले आहेत. प्रत्येक भागाची किंमत रु. 200/- आहे. पाच वा अधिक प्रती घेणाऱ्यांना विशेष सूट मिळेल. पुस्तकांचा प्रतींसाठी वितरकांकडे/कार्यवाहांकडे मागणी करावी.

**वितरक : अनमोल प्रकाशन, अप्पा बळवंत चौक, पुणे 411 002**

**कार्यवाह-खजिनदार**

चर्चासत्र तिसरे

# राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक व सामाजिक विचार

● एम. एन. शिंदे
*प्रपाठक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,*
*क. भा. पा. कॉलेज उरुण-इस्लामपूर, जि. सांगली*

### भाग 1

**रा**जर्षी शाहूंच्या प्रत्यक्ष कर्तबगारीचा कालावधी 2 एप्रिल 1894 ते 6 मे 1922 म्हणजे उणीपुरी 28 वर्षे इतका आहे. या कालावधीचे त्यांनी सोने केले. महाराष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक क्षेत्रात प्रचंड परंतु अनमोल कार्य करुन ते राजर्षी या अढळ पदाला पोचले.

शाहू महाराजांचे व्यक्तिमत्व सुजाण, सुसंस्कृत, विद्याविभूषित, जाणते, संयमी, धाडसी, दिलदार, कनवाळू, उच्च विचारसरणीचे, लोकाभिमुख व गोरगरिबांचा त्राता असे होते. त्यांच्या व्यक्तिमत्वात भारतीय व पाश्चिमात्य शिक्षण व संस्कारांचा सुरेख संगम होता. परदेश भेटीत त्यांनी पाश्चिमात्य जीवन, समाज, शेती, उद्योग, तंत्रज्ञान इत्यादी गोष्टींचा अभ्यास केला. युरोप खंडातील 18व्या व 19व्या शतकातील सामाजिक, आर्थिक व राजकीय बदलांचा प्रभाव त्यांच्यावर पडला होता. त्यामुळे भारतात परतल्यानंतर भारतीय समाजातील सामाजिक व आर्थिक स्थिती बदलण्याचा ध्यास त्यांनी घेतला. तत्कालीन भारतीय समाज धार्मिक व सामाजिक रुढी परंपरा यामध्ये अडकलेला होता. शिक्षणाचा अभाव, जातींची उतरंड, धर्ममार्तंडाचा प्रभाव वगैरेंमुळे संख्येने मोठा असणारा बहुजन समाज आर्थिक व सामाजिक दृष्ट्या मागासलेला होता. या समाजाची उन्नती करावयाची असेल तर वरील प्रकारच्या बंधनातून बहुजन समाजाची मुक्तता केली पाहिजे असे राजर्षींनी ठरविले त्यासाठी त्यांनी जे कार्य केले, जे विचार मांडले, त्यामधून जे तत्त्वज्ञान स्पष्ट होते त्याची तुलना आज पर्यंत जे सामाजिक, आर्थिक व राजकीय विचारवंत होऊन गेले, त्यांच्या विचारांशी केली असता, त्यामधे मोठ्या प्रमाणात साम्य दिसून येते. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी वेळोवेळी जी भाषणे केली, विचार मांडले, हुकूमनामे, जाहीरनामे, राजाज्ञा काढल्या त्यामधून त्यांची आर्थिक व सामाजिक विचारसरणी स्पष्ट होते.

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे कार्य व विचारांचे वर्गीकरण प्रमुख दोन गटात केले जाते

1. आर्थिक विचार

2. सामाजिक विचार व कार्य

आर्थिक विचारात शेती, कारखानदारी, उद्योग व व्यापार, दुष्काळ निवारण, रोजगार निर्मिती, मूलभूत सोयींचा विकास सहकारी चळवळ, कामगार चळवळ, वेठ बिगारी उच्चाटन इत्यादींचा समावेश होतो. तर सामाजिक कार्यात अस्पृश्यता निर्मूलन, राखीव धोरण, भटक्या जाती व जमातीसाठी उभारलेल्या वसाहती, त्यामधून त्यांचा सामाजिक व आर्थिक दर्जा वाढविण्यासाठी केलेले प्रयत्न, शिक्षण विषयक कार्य व विचार, स्त्री शिक्षण, प्रशिक्षणविषयक सोयी, वसतीगृहांची स्थापना, प्राथमिक व मोफत शिक्षण वगैरेंचा समावेश होतो.

शाहू महाराज अर्थशास्त्रज्ञ नव्हते, परंतु त्यांचे आर्थिक विचार अर्थशास्त्रज्ञांइतके मोलाचे आहेत. त्यांचे आर्थिक विचार अर्थशास्त्रातील नामवंत विचारवंतांच्या विचारांशी साम्य दर्शवितात.

## शाहू महाराजांचे शेती विषयक विचार

शेती बाबत छत्रपती शाहू महाराज एका भाषणात म्हणतात. '' कृषीकर्म इतके पवित्र आहे की........ज्याच्या योगाने भूमिमध्ये एक दाणा टाकून हजारो दाणे मिळतात व ज्या कृषीकर्मावर सारी मनुष्य जात उपजीविका करते.....मनुष्यजातीला सुख मिळते.....त्यावर समाजाची सुव्यवस्था व उन्नती अवलंबून आहे.....'' दुसऱ्या एका भाषणात शाहू महाराज म्हणतात ''खेड्यातील शेतकऱ्यांचे त्यांच्या शेतीवर पोट भरत नाही...म्हणून खेड्यातील शेतकीचा व्यवसाय आधुनिक व अधिक प्राप्तीचा झाला पाहिजे.....'' हे त्यांचे विचार फ्रान्स मधील निसर्गवादी विचारवंतांशी मिळते जुळते आहेत. निसर्गवादी विचारवंत, तूर्गो, क्वेने यांनी मांडलेली ''वाढाव्याची कल्पना'' शाहू महाराजांच्या शेती विषयक विचारांशी साम्य दर्शविते. निसर्गवाद्यांनी शेतीला उत्पादक मानून 'वाढावा' शेतीतच निर्माण होतो, म्हणून राष्ट्राच्या उन्नतीसाठी शेती विकासाला प्राधान्य द्यावे असे म्हटले होते. शाहू महाराजांनी शेती व्यवसायाबाबत जे धोरण आखले व राबविले त्या धोरणात आजच्या हरित क्रांतीची बीजे सापडतात, म्हणून भारतातील हरित क्रांतीचे ते जनक ठरतात. शेती पाणी पुरवठ्याबाबत आजच्या काळात अस्तित्वात असणारी महाराष्ट्र सरकारची कोल्हापूर पद्धतीचे बंधारे ही योजनाही शाहू महाराजांनी आधुनिक महाराष्ट्राला दिलेली देणगी . राजर्षींनी श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. श्रम प्रतिष्ठेबाबत ते आपल्या भाषणात म्हणतात, ''कृषिकर्म इतके पवित्र आहे की वैदिक काळात वर्षातून एकदा चक्रवर्ती राजा व त्यांचा मंत्रीही नांगर हाकीत असत.......ज्या कृषीकर्मावर सारी मनुष्यजात उपजीविका करते ते कृषीकर्म हलके अथवा वाईट असे मी मुळीच मानत नाही....कृषीकर्म करताना क्षात्र धर्माला बाध येतो.......हे कर्म करणारे नीच आहेत, शूद्र आहेत, हे म्हणणे मला मुळीच पटत नाही.'' त्यांच्या मते श्रम करणे हलक्या दर्जाचे अथवा नीच नव्हे तर प्रतिष्ठेचे आहे. पूर्वी चक्रवर्ती राजे व त्यांचे मंत्री हे काम करीत होते हे पटवून देण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या भाषणातून केला त्यांनी श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली श्रमातून शेतीत एका बियाणापासून हजारो बियाणे निर्माण होतात असे म्हटले म्हणजे श्रमातून संपत्ती निर्माण होते हा विचार त्यांनी दिला. निसर्गवाद्यानी शेतीतील वस्तूनांच संपत्ती मानले होते. ॲडमस्मिथ, रिकार्डो, कार्ल मार्क्स यांनी देखील श्रमातून संपत्ती निर्माण होते हे आपल्या श्रम-मूल्य सिद्धांतात सांगितले आहे.

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी दुष्काळ निवारणार्थ जी कार्ये हाती घेतली ती लोक सहभागातून पूर्ण केली व गांधीजींची श्रम सहकाराची कल्पना राबविली, जिचा अंगीकार आजच्या काळात महाराष्ट्र सरकार ग्रामीण योजनांच्या पूर्ततेसाठी करते. 1917

च्या माणगाव परिषदेमध्ये त्यांनी महार वतनांच्या विलीनीकरणाबाबत जे विचार मांडले, त्यामधून स्वातंत्र्योत्तर काळात शेतजमिनीची उत्पादकता वाढविण्यासाठी ''शेतीजमिनीच्या एकत्रीकरणाचा कायदा''(Consolidation of Land Act) आला असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

### शाहू महाराजांचे औद्योगिक धोरण व उद्योगधंदे याबाबतचे विचार

विद्या व उद्योगामुळे समाजाची प्रगती होते हे त्यांनी जाणले होते. टिळकांचे स्नेही म.ब. नामजोशी यांच्या पुणे येथील मेटल मॅन्युफॅक्चरींग कंपनीच्या उद्घाटनप्रसंगी शाहू महाराज यांनी, ''देशाच्या औद्योगिक विकासासाठी योग्य ते धोरण आखण्याचे आपले धोरण आहे'' असे त्यांनी मत व्यक्त केले. त्यांनी 1912-13 साली रायबाग येथे शाहू वीव्हर्स असोसीएशन ही संस्था स्थापन करुन विणकर व कामगारांना संरक्षण दिले. या संस्थेमार्फत उत्पादित होणाऱ्या साड्या, धोतर, खण, चादरी या वस्तूंची कोल्हापूर दरबारने खरेदी करण्याचे ठरवून या संस्थेला माल विक्रीची हमी दिली, जेणेकरुन उद्योगाला प्राथमिक अवस्थेत संरक्षण मिळून त्यांचा विकास होईल हे त्यांचे विचार जर्मनीमधील राष्ट्रवादी विचारवंत फ्रेडरीक लिस्टने मांडलेल्या संरक्षण विषयक धोरणाशी साम्य दर्शवितात.

उद्योगाबाबत शाहू महाराजांनी विकेंद्रीत नियोजनाची कल्पना मांडली ते आपल्या भाषणात म्हणतात ''..........उद्योगांचे केंद्रीकरण झाल्यास खेड्यातून येणाऱ्या लोंढ्यामुळे शहरात गर्दी होऊन आर्थिक व सामाजिक दुष्परिणाम उद्भवतात ते टाळण्यासाठी विकेंद्रीकरणाची गरज आहे.'' लोकांना ग्रामीण भागातच रोजगार उपलब्ध व्हावा, कामगारांच्या स्थलांतरणाची प्रक्रिया थांबावी व शहरीकरणाचे दुष्परिणाम टाळावेत म्हणून त्यांनी औद्योगीक विकेंद्रीकरणावर भर दिला त्यासाठी त्यांनी ग्रामीण उद्योग, लघु व कुटीरोद्योग व सहकारी क्षेत्रातील उद्योगावर भर दिला. त्यांनी सार्वजनिक क्षेत्र, खाजगी क्षेत्र व सहकारी क्षेत्रात उद्योग सुरु केले त्यांच्या विकेंद्रीत औद्योगीक नीतिनुसार शाहूपुरी, राधानगरी, जयसिंगपूर, गडहिंग्लज या नवीन बाजारपेठा निर्माण करुन संस्थानाचा समतोल आर्थिक विकास घडवून आणण्याचे प्रयत्न केले. शाहू महाराजांची विकेंद्रीकरणाची नीति विभागीय नियोजनातील 'पेरॉक्स व वेग्मन' यांच्या ''आर्थिक वाढीचा बिंदू व आर्थिक वाढीचा केंद्र''या सिद्धांताशी तसेच 'व्हॉन थुनेनच्या' औद्योगिक स्थानिकीकरण सिद्धांताशी साम्य दर्शविते.

### शाहू महाराजांचे व्यापार विषयक विचार

व्यापार व उद्योगामुळे समाजाची प्रगती होते असे त्यांचे मत होते एका भाषणात व्यापाराबाबत ते म्हणतात ''.......20 व्या शतकात राष्ट्राची उन्नती व्यापार व इतर संबंधित चळवळ यावर अवलंबून आहे.....'' व्यापाराबाबतचे त्यांचे विचार युरोपखंडातील व्यापारवादी विचारवंत 'थॉमस् मन', विल्यम पेट्टी यांच्या विचारांशी साम्य दर्शवितात, राष्ट्राला आर्थिकदृष्ट्या संपन्न होण्यासाठी व्यापाराला चालना द्यावी असे व्यापारवाद्यानी म्हटले.

### शाहू महाराजांचे दारिद्र्य निर्मूलन व रोजगार विषयक विचार

शाहू महाराजांनी दारिद्र्य निर्मूलन व रोजगारबाबत मोलाचे योगदान दिले त्यासाठी त्यांनी सामाजिक व आर्थिक क्षेत्रात बदल घडवून आणले दारिद्र्य निर्मूलनासाठी त्यांनी अर्थशास्त्रातील व्यावसायिक गतिशीलतेच्या व पुरस्कार केला, त्यांना उर्ध्व व्यावसायिक गतिशीलता अभिप्रेत होती (Vertical occupational Mobility) त्यांची खालील भाषणे पहा.

माणगाव परिषदेत त्यांनी असे मत व्यक्त केले की, ''मी सर्व बलुतेदारास व महार वगैरे वतनदारास अशी विनंती केली की, अशी लहान लहान वतने व बलुती यांच्यामागे लागू नका, ती सोडून द्या.....तुम्ही माणशी दहा एकर जमीन वाटचाला येईल असे तुकडे.....करा व ते उत्पन्न तुमच्यातील जे वडील असतील त्यांच्याकडे ....चालवा.....बाकीच्या लोकांस गावात अगर बाहेरगावी कोणताही धंदा करण्यास मोकळीक होईल....''

11 मार्च 1920 चा हुकूमनामा बहुजन समाजाची आर्थिक उन्नती व्हावी म्हणून मागासलेल्या जातीतील लोकांना वकिलीची सनद दिलेल्यांची नावे स्पष्ट करतो. तसेच 16 जाने. 1919 रोजी प्रस्तुत केलेला हुकूमनामा सरकारच्या विविध खात्यात अस्पृश्य जातीच्या लोकांना नोकऱ्या-नेमणूका दिल्याचे स्पष्ट करतो. शाहू महाराजांचे हे कार्य उर्ध्व सामाजिक गतिशीलतेबरोबरच संधीची समानता हे आधुनिक समाजवादाचे तत्त्व स्पष्ट करतो.

### शाहू महाराज व सामाजिक विचार

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या सामाजिक विचारात अस्पृश्यता निर्मूलन, राखीव जागा धोरण, समान संधी याबरोबरच शिक्षणासंबंधी मौल्यवान विचार मांडले व ते प्रत्यक्ष कृतीत आणले. मंडल आयोगाने मागासलेल्या जाती व जमातींसाठी 50% जागांचे धोरण जाहीर केले. त्या पूर्वी 75 वर्षे अगोदर महाराजांनी हे धोरण राबविले होते. शिक्षणाबाबत 1917 च्या खामगाव परिषदेत ते म्हणतात, ''शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही..... म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिन्दुस्थानाला आवश्यकता आहे''. त्यांचे प्राथमिक शिक्षण, स्त्री शिक्षण, तलाठी शिक्षण शाळा, पाटील शाळा, विविध कार्यशाळा, वसतीगृहांची चळवळ इत्यादींमधून त्यांचा शिक्षण विषयक दृष्टीकोन स्पष्ट होतो. आपल्या एकूण महसुली उत्पन्नापैकी 6% उत्पन्न ते शिक्षणावर खर्च करीत असत. यावरुन त्यांचा पुरोगामी दृष्टीकोन स्पष्ट होतो. शाहू महाराजांचे शिक्षण विषयक कार्य पाहता त्यांचे राज्य प्लेटो व ॲरिस्टॉटल यांच्या विचारातील 'आदर्श राज्य' ठरते व प्लेटो आणि ॲरिस्टॉटलच्या कल्पनेतील ''आदर्श राजा'' किंवा ''तत्त्वज्ञ राजा'' शाहू महाराजांच्या रूपाने दिसून येतो.

बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी राजर्षी शाहू महाराजांनी हस्तक्षेप नीतिचा स्वीकार केला, जिचा पुरस्कार 20व्या शतकात केन्स्, अे.पी. लर्नर या आधुनिक अर्थशास्त्रज्ञांनी केला होता. शाहू महाराजांनी हस्तक्षेप नीति व सामुदायिक गरजांची पूर्तता यावर आधारलेला आधुनिक सार्वजनिक अर्थव्यवहाराचा सिद्धांत स्वीकारला म्हणून शाहू महाराजांचे सरकार जॉन स्टुअर्ट मिलच्या विचारातील ''प्रातिनिधीक सरकार'' ठरते. मिलच्या प्रातिनिधीक सरकारची सर्व वैशिष्ट्ये शाहू महाराजांच्या शासन प्रणालीमध्ये सापडतात. आजच्या काळातील नोबेल पारितोषिक विजेते जगातील नामवंत अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन यांनी अविकसित देशांच्या कल्याणासाठी जे उपाय सुचविले आहेत ते शाहू महाराजांनी करवीर संस्थानात आठ दशके अगोदरच राबविले आहेत. यावरुन असे म्हणता येते की शाहू महाराज काळाच्या खूप पुढे होते. शाहू महाराजांचे विविध आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील विचार व कार्य म्हणजे मानवी साधन संपत्तीच्या विकासासाठी केलेले कार्य होय. त्यालाच अर्थशास्त्राच्या परिभाषेत मानवी साधन संपत्तीचा विकास असे म्हणतात.

### भाग 2 शोध निबंधाचा परामर्श

पालघर जि. ठाणे येथील मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या 27व्या अधिवेशनात ''शाहू महाराजांचे

आर्थिक व सामाजिक विचार'' या विषयावर एकूण 37 शोध निबंध सादर झाले, ही अत्यंत उत्साहवर्धक व अभिमानास्पद बाब आहे. यावरुन दिसून येते की महाराष्ट्रीय जनतेवर राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांची प्रगाढ छाप आहे व त्यांचा महाराष्ट्रीय मनावरील प्रभाव दिसून येतो.

## 1. राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक व सामाजिक विचार

या विषयावर जे.एस्. इंगळे कोरेगाव (सातारा) व एम्. एन्. शिंदे (इस्लामपूर-सांगली) यांचा शोध निबंध अत्यंत नेटका, समर्पक राजर्षींच्या आर्थिक व सामाजिक विचारांची चिकित्सक मीमांसा करणारा आहे. ह्या शोध निबंधात वैशिष्ट्य म्हणजे राजर्षी शाहू महाराज आणि जगातील आर्थिक व सामाजिक क्षेत्रात मान्यता पावलेल्या विचारवंतांच्या विचारांची तुलना करुन त्यामधील साम्य दाखविले आहे. केंद्र व राज्य सरकारच्या स्वातंत्र्योत्तर काळातील आर्थिक व सामाजिक धोरणावरील राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांची छाप दर्शविते. सद्य:स्थितीत देखील राजर्षींची धोरणे कशी लागू पडतात ते दाखवून देतो. अनिल सूर्यवंशी व पायघन (बार्शी) यांनी आपल्या शोध निबंधात राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक शैक्षणिक विचारांकडे आज दुर्लक्ष्य झाल्याची खंत व्यक्त केली आहे. श्रीरंग मंडले (मालवण) यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक विचारांचा आढावा घेऊन देखिल भारतीय जाती व्यवस्थेची चौकट शिथिल झालेली नाही अशी खंत व्यक्त केली आहे. सुषमा देशमुख (अमरावती) यांचा मते, महाराष्ट्राची जडणघडण राजर्षी शाहू महाराजांच्या क्रियाशील धोरणाने झाली. समाज परिवर्तनाची प्रक्रिया मूलभूत स्वरुपाची असते हे जाणून त्यांनी शेतकरी, कामकरी व इतर श्रमजीवी सामाजाला मार्गदर्शन केले. सौ.सुमित्रा पवार (भुसावळ) म्हणतात, राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांची आजच्या काळात आवश्यकता आहे. त्यांनी मानवी स्वातंत्र्य व सामाजिक समतेची घोषणाच केली नाही तर पददलितांची गुलामगिरीतून मुक्तता केली. डी.टी. पाटील व आर. एस. गडगे (सांगली) यांनी आपल्या शोधनिबंधात म्हटले आहे की राजर्षी शाहू महाराजांच्या सुधारणा करवीर संस्थानापुरत्या मर्यादित असल्या तरी त्या सुधारणातून एका सामाजिक क्रांतीने जन्म घेतला, उपाध्ये व विद्या सुतार (कोल्हापूर) आपल्या शोध निबंधात म्हणतात, राजर्षी शाहू महाराजांनी दूरदृष्टीने समाज सुधारणेबरोबर स्त्री शिक्षण, व स्त्री स्वातंत्र्याच्या दृष्टीने विचार करुन कायदे केले म्हणजे स्त्रिला स्वाभिमानाने व स्वतंत्रपणे समाजात जगता यावे, वावरता यावे म्हणून तिचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी एका बलाढ्य पुरुषाने स्त्री जातीला दिलेले वरदान होय, या नेमक्या शब्दांत राजर्षींच्या स्त्री विषयक कार्याचा आढावा घेतला आहे. सुग्रीव मुळे (लातूर) तसेच प.ब. कुलकर्णी व घाटगे, शकुंतला पाटील (इचलकरंगी) यांनी आजच्या जागतिकीकरणाच्या काळात आर्थिक व सामाजिक क्षेत्रात जे प्रश्न निर्माण झाले आहेत, त्यांच्या सोडवणुकीसाठी राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांची गरज प्रतिपादन केली आहे. माधव गायकवाड (औरंगाबाद) यांनी राजर्षी शाहू महाराजांचे मागासलेल्या समाजाला संधी प्राप्त करुन देण्याचे व संधीची समानता निर्माण करणारे विचार गुन्नार मिरडाल व अमर्त्य सेन यांच्या आर्थिक विकासाच्या विचारांपेक्षा वेगळे नाहीत असे म्हटले आहे. रा. ना. भालेराव व करकरे यांनी राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक व सामाजिक विचार समाजवादी समाजरचनेच्या निर्मितीला चालना देणारे होते, त्यामधून आधुनिक अर्थव्यवस्थेचा प्रणेता समाजवादी मुत्सद्दी शाहू महाराजांच्या रुपाने दिसून येतो असे म्हटले

आहे. उर्वरीत शोध निबंधकारांनी राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक व सामाजिक विचारांची विविधांगी चर्चा केली आहे.

**2. राजर्षी शाहू महाराजांचे शेती विषयक विचार**

या गटात शेती विषयक एकूण 5 शोध निबंध सादर झाले आहेत. त्यापैकी प्रकाश कांबळे (कराड) यांनी आपल्या शोध निबंधात राजर्षी शाहू महाराजांचे शेती विषयक विचार व त्यांच्या व्यावहारिकतेची पडताळणी अत्यंत सुस्पष्ट भाषेत केली आहे. ते म्हणतात छत्रपती शाहू खऱ्या अर्थाने व्यावहारिक उपयोजित अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांचे आर्थिक विचार हे संशोधनाचा विषय आहेत, त्यादृष्टीने त्यांची व्यावहारिकता पडताळून पाहणे आवश्यक आहे. भोंग (पुणे)यांनी शाहू महाराजांच्या कृषी धोरणाचा चिकित्सक आढावा मार्मिक शब्दांत घेतला आहे. राजर्षी शाहू महाराजांच्या शेतीविषयक कार्यास त्यांनी पंचसूत्री कार्यक्रम असे म्हटले त्यामुळे शेती क्षेत्रातील व्यावहारिक व तात्विक संशोधनाला गती मिळाली. त्यांच्या मते, राजर्षी शाहूच्या काळात त्यांचा शेतीवरील खर्च + 258.60% वाढला तर 1814 ते 1922 या 28 वर्षात शेतीवरील खर्चाचे एकूण खर्चाशी सरासरी प्रमाण8.37% होते. सिंचनावरील खर्च + 131.4% होता. विकास सुकाळे (लातूर) निलेश दांगट (सांगली जि. पुणे) अनिल वावरे (मलकापूर) यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या शेतीविषयक धोरणाचा समग्र आढावा घेऊन त्यां विचारांची आजच्या काळात आवश्यकता आहे असे म्हटले. माधुरी सपाटे व रेश्मा रानभरे (शिवाजी विद्यापीठ) यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या शेती विषयक धोरणाचा उहापोह आपल्या शोध निबंधात केला आहे.

**3. राजर्षी शाहू महाराजांचे औद्योगिक धोरण व कामगार चळवळ विषयक विचार**

राजर्षी शाहू महाराजांचे औद्योगिक धोरण व कामगार चळवळ या विषयावर एकूण 2 शोध निबंध सादर झाले आहेत. त्यामध्ये श्रीनिवास जाधव (गडहिंग्लज) यांनी कामगार चळवळीचा चिकितसक सैद्धांतिक आढावा घेतला आहे. शाहू महाराजांच्या प्रेरणेने करवीर इलाख्यात सुरु झालेली कामगार चळवळ ग्रामीण व शहरी भागात पसरली परंतु ती कार्ल मार्क्स, सिडने व वेब, फ्रन्क टॅनेन, बॉम, जॉन कॉमन्स, हेरॉल्ड लास्की, महात्मा गांधी यांच्या विचारांपासून किती दूर गेली आहे, याचा चिकित्सक आढावा घेतला आहे तर व्ही. एस्. सुतार व व्ही. एल.गवंडी (शिवाजी विद्यापीठ) यानी शाहू महाराजांच्या औद्योगिक कार्याचा सर्वांगीण आढावा घेऊन उद्योग धंद्यांची प्रगती विशद केली आहे.

**4. राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षणविषयक विचार व कार्ये**

राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षणविषयक विचार या विषयावर एकूण 8 शोध निबंध सादर करण्यात आले आहेत. त्यामध्ये आर. एस. म्होपरे व जे. एफ. पाटील यांनी आपल्या शोध निबंधात राजर्षी शाहू महाराजांच्या शिक्षणावरील खर्चाला मानवी भांडवल गुंतवणूक म्हणताना ''प्रो. शुल्टझ'' यांचा दाखला दिला. तसेच राजर्षीच्या शैक्षणिक कार्याचे समग्र विवेचन करताना शाहू महाराजांचा अर्थसंकल्प स्पष्ट करुन प्रगतीशील दर करपद्धतीचा पुरस्कार व अंमलबजावणी शाहू महाराजांनी करवीर संस्थानात केल्याचे सांगितले आहे. नेताजी पवार (कोल्हापूर) यांनी आपल्या शोध निबंधात राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षणा विषयक भाषणगगातील उतारे, त्यांचे शिक्षण विषयक जाहीरनामे, कायदे व राजाज्ञा याचे संदर्भ देत शोध निबंध अत्यंत समर्पक व नेटका मांडला आहे. राजर्षी शाहू महाराजांच्या काळातील शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेताना विविध प्रकारची

आकडेवारी दिली आहे. तेजस्विनी मुडेकर व अनघा पाठक (कोल्हापूर) यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक धोरणाचा सर्वस्पर्शी आढावा घेतला वसुधा पुरोहित खांदेवाले (औरंगाबाद) यांनी शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा 3 विभागात घेऊन शाहू पूर्व काळ, शाहू महाराजांचा काळ व आधुनिक काळाच्या संदर्भात शाहू महाराजांच्या विचारांचे मूल्यमापन करुन राजर्षींचे विचार आजच्या काळातील सरकार व राज्यकर्ते यांना दीपस्तंभासारखे मार्गदर्शक आहे असे म्हटले. निता चोरडिया (भुसावळ) यांनी शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचा उहापोह करुन त्यांच्या कार्याची चतु:सूत्री पुढीलप्रमाणे सांगितली आहे. प्राथमिक शिक्षणाणा अग्रस्थान, समाजातील दुर्बलांना अग्रस्थान, वसतीगृहांची साखळी व राखीव रोजगार संधी. तानाजी गिते (राजगुरुनगर) यांनी शिक्षणावरील खर्च एक राष्ट्रीय गुंतवणूक आहे, तिला 19व्या शतकात शाहू महाराजांनी चालना दिली. शिक्षणाद्वारे त्यांनी सामाजिक समता निर्माण करुन अमर्त्य सेन यांची कल्याणकारी अर्थशास्त्राची कल्पना प्रत्यक्ष राबविली असे नमूद केले आहे.

**भाग 3 चर्चेचा गोषवारा**

राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक व सामाजिक विचार'' या विषयावरील चर्चासत्रात एकूण 37 शोध निबंध सादर करण्यात आले. राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक व सामाजिक विचारांचा समग्र आढावा घेत असताना जगातील नामवंत आर्थिक, सामाजिक व राजकीय विचारवंत आणि शाहू महाराज यांच्या विचारातील साम्य सूत्रसंचालकांनी स्पष्ट केले. अर्थशास्त्रातील व्यापारवादी विचारवंतापासून ते कार्ल मार्क्स, केन्स, लर्नर व अमर्त्य सेन तसेच प्लेटो व ॲरिस्टॉटल या राजकीय विचारवंतांचे विचार व शाहू महाराजांचे विचार यावर देखील प्रकाश टाकला. शाहू महाराजांचे खरे कार्य म्हणजे त्यांनी मानवी साधन संपत्तीच्या विकासासाठी केलेले कार्य होय .

या चर्चासत्रात विविध वक्त्यांनी पुढील विचार मांडले. पायघन(बार्शी) यांनी आज शाहू महाराजांच्या विचाराकडे दुर्लक्ष झाले आहे, अशी खंत व्यक्त केली. कांचन मोरे (कराड) यांनी आधुनिक महाराष्ट्राची आर्थिक व सामाजिक सुधारणांची पायाभरणी शाहू महाराजांच्या विचार व कार्यातून झालेली दिसून येते. त्यांच्या प्रागतिक नेतृत्व व कतृत्वामुळे महाराष्ट्रात सामाजिक परिवर्तनाची अभूतपूर्व प्रक्रिया सुरु झाली असा विचार मांडला. सुषमा देशमुख (अमरावती)यांनी असे म्हटले की महाराष्ट्राची जडण घडण शाहू महाराजांच्या क्रियाशील धोरणाने झाली आहे. विद्या सुतार (कोल्हापूर) यांना शाहू महाराजांच्या दूरदृष्टीमुळे स्त्रियांचा सर्वांगिण विकास होण्यास मदत झाली असे मत मांडले . स्त्रीला स्वाभिमानाने व स्वतंत्रपणे जगता यावे म्हणून तिचे संरक्षण व संवर्धन व्हावे म्हणून शाहूनी केलेले कार्य म्हणजे स्त्री जातीला दिलेले वरदान होय असे म्हटले. घाटगे (पनवेल) यांनी आजच्या जागतिकीकरणाच्या काळात निर्माण झालेले प्रश्न सोडविण्यासाठी शाहू महाराजांचे विचार आवश्यक आहेत असे वाटते. माधव गायकवाड (औरंगाबाद) यांनी समाजातील मागासलेल्या वर्गाला संधीची समानता प्राप्त करुन देण्यात राजर्षींचा वाटा मोठा आहे असे सांगून प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ गुडनार मिरडाल व अमर्त्यसेन यांचे आर्थिक विचार शाहू महाराजांच्या विचारापेक्षा वेगळे नाहीत असे मत व्यक्त केले. प्रकाश कांबळे (कराड) यांना राजर्षी शाहू खऱ्या अर्थाने व्यावहारिक/उपयोजित अर्थशास्त्रज्ञ होते व त्यांच्या आर्थिक विचारांवर संशोधन झाले पाहिजे असे मत व्यक्त केले. विकास सुकाळे (लातूर), यांनी शाहू महाराजांच्या शेती विषयक धोरणाचा समग्र आढावा

घेतला, तर प्राध्यापक अनिल वावरे (मलकापूर) यांनी शाहूंच्या शेती विषयक धोरणाची विविधांगी चर्चा केली. रेश्मा रानभरे (कोल्हापूर) यांनी, शाहू महाराजांना आदर्श शेतीचे प्रयोग करवीर संस्थानात केल्याने ते आधुनिक हरित क्रांतीचे जनक होत असे म्हटले. श्रीनिवास जाधव यांनी शाहू महाराजांचे विचार व कामगार चळवळीचा चिकित्सक आढावा घेतला. आर. एस. म्होपरे (कोल्हापूर) यांनी शाहू महाराजांच्या शिक्षण विषयक धोरणाला मानवी भांडवली गुंतवणूक म्हटले. नेताजी पवार (कमला कॉलेज, कोल्हापूर) यांनी शाहू महाराजांचे शिक्षण विषयक विचार स्पष्ट केले. वसुधा पुरोहित-खांदेवाले (औरंगाबाद) म्हणतात शाहू महाराजांचे विचार आजच्या काळात राज्यकर्त्यांना दिपस्तंभासारखे मार्गदर्शक आहेत. निता चोरडिया (भुसावळ) यांनी शाहू महाराजांच्या शैक्षणिक धोरणाचा समग्र आढावा घेतला. करपे व किरण वेळापूरे यांनी शाहू महाराजांचे आर्थिक व सामाजिक विचार विशद केले.

त्यानंतर झालेल्या चर्चासत्रात एकंदर नउ वक्त्यांनी सहभाग घेतला. या चर्चेमध्ये त्यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या आर्थिक सामाजिक विचारांवर विविधांगी चर्चा केली, त्यामध्ये सर्जेराव ठोंबरे, जे.जे. कदम (पनवेल), सुरवसे, दिगंबर दगडे (सांगली) अतुल साळुंके (रोहा), रविंद्र जोशी, अ.द. पत्की, मानसी कुळीक, माधुरी सपाटे यांनी आपले विचार मांडले. उपरोक्त वक्त्यांपैकी अनेकांनी म्हटले की शाहू महाराजांच्या आर्थिक व सामाजिक विचारांवर संशोधन व्हावे आणि विविध विद्यापीठांच्या अभ्यासक्रमामध्ये त्यांचा समावेश व्हावा.

● ● ●

## माधवराव चितळे यांना कॉसमॉस पुरस्कार

कॉसमॉस बँकेचा यंदाचा कॉसमॉस पुरस्कार आंतरराष्ट्रीय ख्यातीचे जलतज्ज्ञ आणि मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ज्येष्ठ सदस्य माधवराव चितळे यांना प्रदान करण्यात आला आहे. मानपत्र आणि २५हजार रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

माधवराव चितळे यांचे हार्दिक अभिनंदन !

**प्रमुख संपादक**

अर्थसंवाद

# अर्थसंवाद - वार्षिक अहवाल : 2002-03

● विनायक श्रीधर देशपांडे
*प्रपाठक, अर्थशास्त्र विभाग, नागपूर विद्यापीठ*
*नागपूर आणि प्रमुख संपादक, अर्थसंवाद*

'अर्थसंवाद' च्या सन 2002-03 या वर्षातील सव्विसाव्या खंडाचा अहवाल, मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व सदस्यांसमोर संपादक या नात्याने मांडण्यात मला विशेष आनंद होत आहे. भूतपूर्व संपादक रवीन्द्र दोशी यांनी वार्षिक अहवाल विस्ताराने मांडण्याची प्रथा सुरू केली होती. ही प्रथा पुढे चालावी या हेतुने शक्यतोवर विस्तृत असा अर्थसंवादचा वार्षिक अहवाल आपल्या विचारार्थ सादर करीत आहे.

'अर्थसंवाद' च्या 26व्या खंडात एकूण 408 पानांचा मजकूर छापला गेला. त्यामध्ये 21 स्वतंत्र लेख, 1 पारितोषिक प्राप्त लेख, 3 भाषणे, 3 ग्रंथ परीक्षणे, 2 टिपणे, 1 सांख्यिकी पुरवणी, 4 अधिवेशन अहवाल, 3 विषयांच्या रूपरेषा आणि 9 संकीर्ण(यात 5 श्रद्धांजलीपर लेख आहेत) ह्या शिवाय एक प्रादेशिक अधिवेशन वृत्तांत आणि 2 संपादकीय लेख यांचा समावेश आहे. या खंडासाठी एकूण 39 लेखकांचे सहकार्य लाभले, ही बाब अत्यंत समाधानकारक आहे. याचे मुख्य कारण म्हणजे जुन्या नामवंत लेखकांबरोबरच नव्या दमाचे अभ्यासक लिहिते झाल्याने हे शक्य झाले. अर्थसंवादचा प्रत्येक अंक सुमारे 100 पानांचा ठेवण्याची पूर्वीच्या संपादकांची पद्धती यावर्षी देखील स्वीकारली होती. परंतु हे करतांना अंकाचे अर्थकारण सांभाळण्यात अडचणी आल्या. अर्थसंवाद वरील खर्चाबाबतची महत्त्वपूर्ण तौलनिक माहिती तक्ता 1 मध्ये मांडली आहे.

**2002-03 या वर्षातील अर्थसंवाद विषयक महत्त्वाच्या नोंदी**

1. या वर्षात अर्थसंवादच्या सरासरी 1,190 प्रती छापल्या. वर्षभरात चारही अंकांच्या मिळून एकंदर 4,760 प्रती छापण्यात आल्या. मागील वर्षाच्या तुलनेत या 110 ने जास्त आहेत.
2. अंक छपाईपासून तर वितरणापर्यंतचा एकूण खर्च दीड लाखाच्या वर पोचला आहे. वाढीव प्रती आणि विशेषत: छपाईच्या कागदाचे सातत्याने वाढणारे दर यासाठी कारणीभूत आहेत. या व्यतिरिक्त टपालदरात झालेली भरमसाठ वाढ लक्षात घेतली पाहिजे. अहवाल वर्षात प्रत्येक अंकासाठी रु. 5.30

**तक्ता क्र.1**
**'अर्थसंवाद' चे अर्थकारण**

| तपशील | 2000-01 | 2001-02 | 2002-03 |
|---|---|---|---|
| 1. चारही अंकाच्या एकूण प्रती | 4,600 | 4,650 | 4,760 |
| 2. चारही अंकांची एकूण पृष्ठे | 448 | 445 | 408 |
| 3. चारही अंकांचा एकूण खर्च | 1,05,591 | 97,052 | 1,52,540 |
| 4. दर नगाचा सरासरी खर्च (रु.) | 22.95 | 20.87 | 32.05 |
| 5. दर पानाचा सरासरी खर्च (रु.) | 0.20 | 0.18 | 0.31 |
| 6. जाहिराती पासून उत्पन्न (रु.) | 5,500 | 10,000 | 40,500 |

टपाल खर्च आला. (पूर्वी हा खर्च 2 रु. प्रति अंक होता). चारही अंकांचा टपाल खर्च रु. 25,000 पेक्षा वर जातो. या सर्व बाबी अपरिहार्य आहेत. दर पानाचा सरासरी खर्च अहवाल वर्षात 0.31 आला. वरील कारणांमुळे हा खर्च वाढलेला दिसतो. शिवाय या वर्षातील चारही अंकांची मुखपृष्ठे आकर्षक रंगसंगतीत छापण्याचा आवर्जून प्रयत्न केला. आता यापुढील अंक याच रंगात छापण्यात येतील. अर्थसंवादचा अंक हा नेमका कुठल्या तीन महिन्याच्या कालावधीचा आहे हे चटकन वाचकांच्या ध्यानात यावे व हे नियतकालिक आकर्षक व्हावे हा यामागील उद्देश होता. आधुनिक काळात छपाईचे काम संगणकाद्वारे होत असल्याने हे शक्य झाले. छपाईचा खर्च खूप जास्त न करताही हे साध्य करण्याचा प्रयत्न केला. अर्थसंवादच्या अंतर्बाह्य स्वरुपात बदल झाल्याचे वाचकांना जाणवले असेलच. या बदलाचे अनेक वाचकांनी, कार्यकारी मंडळातील सदस्यांनी वेळोवेळी स्वागत केले आहे. याशिवाय आंतरिक रचनात्मक बदलांमुळे कमी पृष्ठसंख्येत जास्तीत जास्त माहिती वाचकांना देता येणे शक्य झाले.

3. एप्रिल-जून 2002 चा अंक नागपूरहून निघणारा पहिलाच अंक असल्याने महाराष्ट्रातील नामवंत व्यक्तिंकडून लेख मागविण्यात आले होते. एप्रिल-जून 2002 चा अंक या अशा मंडळींच्या लेखांनी साकारण्यात आला होता.

4. जमेची बाजू म्हणजे जाहिरातीपासून उत्पन्न 2002-2003 या वर्षात रु. 40,500/- झाले . अर्थसंवादच्या चारही अंकात प्रत्येकी तीन जाहिराती याव्यात असे ध्येय निश्चित केले होते. परंतु या वर्षातील एका अंकात एक पान, जाहिराती विना कोरे राहिल्याने साधारणपणे रुपये 3,500/- इतक्या रकमेला आपल्याला मुकावे लागले. जानेवारी-मार्च 2003 च्या अंकासाठी जाहिरात प्राप्त होऊ शकली नाही. परिषदेच्या सदस्यांना आणि विशेषत: कार्यकारीमंडळातील सर्व सदस्यांना जाहिराती मिळवून देण्याबद्दल विनंती केली आहे. वाढता खर्च लक्षात घेतल्यास अर्थसंवादची जाहिरातींद्वारे अन्य मार्गाने मिळकत कशी वाढविता येईल याकडे विशेष लक्ष पुरविणे आपल्या सर्वांना आवश्यक आहे.

5. अहवाल वर्षात अर्थसंवादच्या वितरणाचे काम नागपूर येथून प्रथमच सुरु झाले. कोणत्या ना कोणत्या कारणाने अंकाच्या छपाईचे काम पूर्ण होण्यास विलंब

झाल्याने प्रत्येक अंकाचे वितरण लांबणीवर पडले याबद्दल खेद वाटतो. कागदाच्या उपलब्धतेतील अडचणी, खंडित वीज पुरवठा, टपालखात्याद्वारे प्रत्येक अंकाच्या वितरण प्रसंगी सांगण्यात आलेले नवनवीन नियम व त्यांचे पालन करण्यात आलेल्या अनेक अडचणी, तसेच बदलणारे टपाल दर अशी अनेक कारणे यामागे होती.

जाहिरातदारां मार्फत जाहिरात प्राप्त होईल या आशेने देखील अंकांचा खोळंबा होतो. एक जाहिरात प्राप्त झाल्यास किमान रु. 3,500/- प्राप्त होतात. त्यामुळे जाहिरातीची वाट बघण्याच्या प्रक्रियेत अंक पूर्ण होण्यास यावर्षी बराच वेळ खर्ची गेला. चारही अंकाच्या तिन्ही पानांवर जाहिराती दिल्यास अर्थसंवादला वर्षाकाठी रुपये 44,000/- चे उत्पन्न प्राप्त करता येईल. या रकमेतून वर्षातील एका अंकाचे काम पूर्णत्वाला नेता येईल. परिषदेच्या इतर उपक्रमांसाठी या जाहिरातीच्या उत्पन्नामुळे हातभार लागू शकेल. सध्या एका अंकाच्या 1200/- प्रती छापल्यास 40,000/- च्या आसपास खर्च येतो. पुरेशा जाहिराती नियमितपणे मिळवून देण्यात सन्माननीय सदस्यांनी सहकार्य केल्यास अंक वेळेत व कमी खर्चात प्रकाशित करणे सोयीचे होईल.

6. वितरणाबाबत नमूद करण्यासारखी एक बाब म्हणजे अर्थसंवाद वेळेवर प्राप्त न झाल्यास काही संस्था तसेच काही सदस्य आवर्जून विचारणा करु लागले आहेत. ही बाब समाधानकारक आहे असे मला वाटते. अंक वेळेवर मिळाला नाही की अर्थमंत्रालया सारख्या विविध ग्रंथालयांची स्मरणपत्रे येउ लागतात. संस्था आणि सदस्य याबाबत जागरुक आहेत हेच यातून लक्षात येते.

7. आजीव सदस्य आपल्या बदललेल्या पत्त्यांची लेखी सूचना कार्यालयाकडे देत नाहीत. त्यामुळे अर्थसंवादचे अंक परत येतात. अर्थात याचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होते आहे. अहवाल वर्षात जवळपास पन्नास अंक परत आले. आणि यामुळे साधारण 300 रु. वाया गेले. सदस्यांचे नवे पत्ते प्राप्त करुन घेण्याचा देखील अहवाल वर्षात प्रयत्न करण्यात आला.

8. अर्थसंवादच्या दृष्टीने महत्त्वाची घटना म्हणजे महाराष्ट्र टाईम्सच्या 3 जुलै 2003 च्या अंकातील अग्रलेखात झालेला अर्थसंवादचा उल्लेख. पर्यायी लोकसंख्या नीती या मथळ्या खालील अग्रलेखात परिषदेचे ज्येष्ठ सदस्य वसंत पेठे यांच्या "लोकसंख्या, गरिबी आणि मानवी गुणवत्तेचे इष्टतमीकरण" या अर्थसंवाद मधील लेखाची दखल घेण्यात आली. महाराष्ट्र टाईम्स सारख्या अग्रणी वृत्तपत्रातील अग्रलेखामुळे अर्थसंवाद या त्रैमासिकाबाबतची माहिती सामान्य वाचकांपर्यंत पोचली याचे समाधान वाटते.

9. अर्थसंवादला आर्थिक पाठबळ देण्यास भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान संस्था(ICSSR)नवी दिल्ली, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ मुंबई, रामचंद्र दत्तात्रय प्रतिष्ठान पुणे, यांच्याकडील अनुदान मोलाचे ठरले आहे. त्यांचे आभार मानतो.

10. अर्थशास्त्रातील विविध विचार प्रवाह, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील आर्थिक घडामोडींबाबत चिकित्सक स्वरुपाचे लिखाण अर्थसंवाद मध्ये प्रकाशित व्हावयास हवे असा प्रयत्न करण्यात आला. पीएच. डी पदवी प्राप्त करणाऱ्यानी तसेच विविध संशोधन प्रकल्प पूर्ण करणाऱ्या अभ्यासकांनी आपल्या संशोधन कार्यावर आधारित विस्तृत लेख अर्थसंवादसाठी पाठवावेत. श्रमाचे अर्थशास्त्र, परिवहन अर्थशास्त्र, कल्याणाचे अर्थशास्त्र तसेच पर्यावरणाचे अर्थशास्त्रीय सिद्धांत यासंबंधीचे विषय सामान्यत: दुर्लक्षित राहिले आहेत. होतकरु लेखकांना आपल्या लेखनासाठी ही क्षेत्रे देखील निवडता येतील.

11. अर्थसंवाद मध्ये आशयपूर्ण, चिकित्सक भूमिकेतून लिहिलेले, विषयाची सखोल मांडणी

करणारे लेख प्रकाशित करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. ज्येष्ठ अभ्यासकांचे लेख प्रकाशित करताना नवोदितांनाही प्रोत्साहन मिळेल व राज्यातील सर्व प्रदेशातील अभ्यासकांचे अर्थसंवाद हे व्यासपीठ होईल असा प्रयत्न करण्यात आला. निदान याबाबतीत तरी विदर्भ आणि मराठवाड्याचा अनुशेष कमी व्हावा, आणि त्या दिशेने अनुशेष दूर करण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे हे गेल्या सहा अंकांच्या आधारे प्रकाशित झालेल्या लेखांवरुन वाचकांच्या लक्षात आले असेलच. अर्थात् हे होताना पश्चिम महाराष्ट्रातील लेखांची संख्या कोणत्याही परिस्थितीत कमी होणार नाही याचीही काळजी घेतली जाईल.

12. संपादकीय अधिकार वापरल्याने काही लेखक नाराज झाले असावेत. पूर्ण विचारांती व चर्चाकरुन लेख अधिक आशय संपन्न व्हावेत यासाठीच संपादकीय संस्कार करण्यात येतात. हे कृपया सर्वांनी लक्षात घ्यावे. हे करतांना कोणाचाही अधिक्षेप करण्याचा उद्देश नव्हता व यापुढेही नसेल. सर्व लेखकांनी आवर्जून लिखाण केले, त्यासाठी अभ्यास, संशोधन व व्यासंग केला त्यामुळेच अर्थसंवाद अधिक समृद्ध करण्याचा प्रयत्न करता आला हे नमूद करणे मला महत्त्वाचे वाटते. अर्थसंवादच्या यशात या सर्व लेखकांचा वाटा मोलाचा आहे. संपादकांनी, केलेल्या बदलांचे सर्व परिषदेच्या सदस्यांनी, कार्यकारी मंडळाच्या सदस्यांनी वेळोवेळी कौतुक केले व उदंड प्रोत्साहन दिले. त्यामुळेच हा जगन्नाथाचा रथ पुढे नेता आला व अर्थसंवादची समृद्ध परंपरा पुढे चालविता आली हे विनम्रतेने नमूद करतो.

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे पहिले अध्यक्ष व अर्थसंवादचे आधारस्तंभ नी. वि. सोवनी यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळाल्याने अर्थसंवादचे संपादन करणे मला शक्य झाले. त्यांच्या पावन स्मृतीस नम्र अभिवादन करतो.

13. अर्थसंवादच्या संपादन व प्रकाशनाच्या कार्यात मला अनेकांचे सहकार्य लाभले. परिषदेचे अध्यक्ष, कार्याध्यक्ष, माजी प्रमुख संपादक अर्थसंवाद, परिषदेचे सदस्य, सल्लागार मंडळातील सदस्य हे सर्व विविध समस्या सोडविण्यास नेहमीच तत्पर असतात. सहायक संपादक रवींद्र जोशी, कार्यकारी मंडळ सदस्य चारुदत्त गोखले, व्यं. सु. पाटणकर, संतोष दास्ताने, श्रीहरी चावा, जितेंद्र बदानी व परिषदेचे आजीव सदस्य प्रमोद लाखे यांचे जाहिराती मिळविण्यात सहकार्य लाभले. या व्यतिरिक्त अर्थसंवादच्या कार्यात सहकार्य करणारे आमच्या विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागातील प्रपाठक किशोर महाबळ ह्यांचा उल्लेख आवर्जून करावासा वाटतो. टेक्नो एंटरप्रायजेसचे मदन आणि मनिषा पालोरकर, स्पार्क असोसिएट्सचे शैलेश देशपांडे यांनी अंकांची छपाई चांगली करुन अंक अधिक आकर्षित करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. अंक वितरणाच्या कामात निलेश धोटे यांनी मोलाची मदत केली. या सर्वांचे आणि जाहिरातदारांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

अर्थसंवाद हे नियतकालिक अधिकाधिक आशयपूर्ण व्हावे, त्याच्या वाचकांची व लेखकांची संख्या वाढावी या साठी यापुढेही आपण सर्व यथोचित प्रयत्न करुया. धन्यवाद.

●●●

# कार्यवाहांचा अहवाल : सत्ताविसावे वार्षिक अधिवेशन

● सर्जेराव ठोंबरे, *औरंगाबाद.*
*कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,*

परिषदेचे 27वे अधिवेशन सोनोपंत दांडेकर महाविद्यालय पालघर, जि. ठाणे येथे दि. 23, ते 25 नोव्हेंबर 2003 या दरम्यान संपन्न झाले. या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी परिषदेचे आजीव सदस्य व अर्थशास्त्राचे तज्ज्ञ अभ्यासक सूर्यकांत जगदाळे, प्राचार्य कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय, बार्शी, जि. उस्मानाबाद हे होते.

## उद्घाटन

अधिवेशनाचे उद्घाटन मुंबई विद्यापिठाचे मा. कुलगुरु भालचंद्र मुणगेकर यांच्या शुभहस्ते झाले. तर प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायूमंत्री, भारत सरकार मा.ना. राम नाईक हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. शिवराज भाई तिवारी, अध्यक्ष, सोनोपंत दांडेकर शिक्षक मंडळी, पालघर यांनी भूषविले.

आपल्या उद्घाटनपर भाषणात मुणगेकरांनी वर्तमानातील जागतिक स्तरावरील व्यापार संघटना व त्या अनुषंगाने भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे संभाव्य परिणाम यांचा सखोल आढावा घेतला. विशेषत: ज्या प्रमाणे जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणे निधी या संस्था विकसित राष्ट्रांचे आर्थिक प्रश्न सोडविण्यास प्राधान्य देतात, त्याच दिशेने जागतिक व्यापार संघटना कार्य करीत आहे, असे मत त्यांनी मांडले.

जागतिक पातळीवर अनेक संदर्भ देत त्यांनी आपल्या भाषणात असे म्हटले की, आपल्या देशातील स्वस्त मजूर हे विकसित राष्ट्रांचे मुख्य आकर्षण असून त्यांना विकसनशील देशातील कामगार, बालकामगार यांच्या कल्याणाची काही चिंता असल्याचे दिसत नाही.

या निमित्ताने मा. राम नाईक यांनी, पालघर भागातील मच्छीमार, आदिवासी इत्यादी उपेक्षित समाज घटकांच्या समस्यांचा अर्थशास्त्रज्ञानी अभ्यास करुन पाठपुरावा करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच त्यांनी त्यांच्या भाषणात केंद्र आर्थिक धोरण व शासनाने अवलंबिलेले विविध योजनांचे विस्तृत विवेचन केले.

रस्ते बांधणी, दूरसंचार सेवांचा बिस्तार, स्वयंपाकासाठी गॅसची सुलभतेने उपलब्धता इत्यादी

बाबत झालेल्या प्रगतीचा त्यांनी आढावा घेतला. भटक्या विमुक्त जातीसाठी केंद्र सरकारने आयोग नेमल्याचा त्यांनी आवर्जून उल्लेख करुन भारत चौफेर प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे, असे प्रतिपादन केले.

सूर्यकांत जगदाळे यांच्या अध्यक्षीय भाषणाचा विषय 'महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचे राजकीय अर्थशास्त्र' हा होता. त्यांनी आपल्या भाषणात महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचा सविस्तर आढावा घेवून त्याचे राजकीय पैलू स्पष्ट केले. राजकारणातील दबावगटांचा विकास प्रक्रियेवरील परिणाम स्पष्ट करून सहकारी चळवळ, शुगरलॉबी इत्यादींची उदाहरणे त्यांनी स्पष्टीकरणासाठी दिली. त्यांच्या भाषणाचा मसुदा याच अंकात इतरत्र छापला आहे.

उद्घाटनाच्या सत्रानंतर एकूण चार चर्चासत्रे पार पडली. या पैकी तीन चर्चासत्रांचे सविस्तर वृत्त या अंकात इतरत्र दिले आहे.

आयत्यावेळच्या चर्चासत्रात कॅनकून मंत्री परिषद व भारत या विषयावर चर्चा झाली. विनायकराव भिसे औरंगाबाद यांचे या विषयावर बीजभाषण झाले. त्यांनी आपल्या भाषणात कॅनकून परिषदेत भारताच्यावतीने मांडल्या गेलेल्या भूमिकेचे सखोल विवेचन करुन पुढील काळात विकसनशील राष्ट्राच्यावतीने भूमिका मांडतांना भारताने काय तयारी करावयास हवी या विषयी चर्चा केली. या चर्चा सत्रात काही प्रतिनिधींनी मते मांडली.

परिषदेच्या कार्यपद्धतीचा एक भाग म्हणून अधिवेशनाच्या दरम्यान दरवर्षी सर्वसाधारण सभा आयोजित केली जाते. या वर्षाची सर्वसाधारण सभा दिनांक 24 नोव्हेंबर 2003 रोजी संपन्न झाली. अध्यक्षस्थानी परिषदेचे अध्यक्ष सूर्यकांत जगदाळे हे होते.

सर्व साधारण सभेच्या कामकाजाचा सविस्तर अहवाल आगामी साधारण सभेत मांडला जाईलच, परंतु येथे सदस्यांच्या माहितीसाठी व प्रत्यक्ष कार्यवाहीच्या दृष्टिने महत्त्वाच्या बाबींची नोंद करणे योग्य ठरेल.

1. 2004 या आगामी वर्षातील 28व्या अधिवेशनाच्या आयोजनासाठी प्राचार्य, मूळजी जेठा महाविद्यालय, जळगाव, प्राचार्य राजर्षि शाहू महाविद्यालय, लातूर व प्राचार्य भाऊराव पाटील महाविद्यालय, इस्लामपूर जि. सांगली अशी तीन निमंत्रणे परिषदेकडे प्राप्त झाली होती. या पैकी कार्यकारिणीच्या शिफारशीनुसार सर्वसाधारण सभेने एकमताने प्राचार्य मूळजी जेठा महाविद्यालय, जळगाव यांचे निमंत्रण स्वीकारले आहे.

2. 28व्या अधिवेशनात चर्चेसाठी

1. विनिमय दर सिद्धांत व व्यवहार

2. भारतीय शेतीची आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मकता

3. महाराष्ट्रातील मानव विकासाची वास्तविकता

हे तीन विषय एकमताने निश्चित करण्यात आले.

3. 2004-2005 वर्षासाठी अध्यक्ष पदी मधुकर नारायणराव शिंदे, प्रपाठक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, कर्मवारी भाऊराव पाटील महाविद्यालय, इस्लामपूर जि. सांगली यांची बिनविरोध निवड झाली.

4. 2004-2007 या कालावधीसाठी विश्वस्त म्हणून नी.भा.सप्रे, पुणे यांची निवड करण्यात आली.

5. 2004-2007 या कालावधीसाठी कार्यकारी मंडळावर पुढील 3 सदस्यांची बिनविरोध निवड झाली.

1. केशव नामदेवराव घोरुडे, भोईसर (पूर्व) जि. ठाणे

2. सुभाष दिगंबर दगडे, सांगली.

3. बबन रघुनाथ,आदिक श्रीरामपूर

जि.अ. नगर

**आयत्या वेळच्या विषया संबंधित चर्चेत खालील निर्णय घेण्यात आले**

1. अर्थसंवादची वार्षिक वर्गणी रु. 150.00 वरुन रु. 250.00 करण्याचा ठराव एकमताने पारित झाला.

2. सामान्य सदस्यत्वाचे वार्षिक शुल्क रु. 150.00 वरुन रु. 250.00 करण्याचा ठराव एकमताने पारित झाला.

3. कार्यालय निधीसाठी सर्व सदस्यांनी प्रयत्न करावे व स्वत: किमान रु. 1000.00 तात्काळ परिषदेकडे जमा करावेत असा ठराव एकमताने पारित झाला.

परिषदेने 1 मे 2003 रोजी कार्यकारी मंडळात अर्थशास्त्र पाठ्यक्रम ग्रंथ निर्मिती योजना कार्यान्वित करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी दि.व्यं. जहागिरदार यांच्या अध्यक्षतेखाली ग्रंथ निर्मिती मंडळ नेमलेले आहे. जहागिरदार यांनी अर्थशास्त्र पाठ्यक्रम ग्रंथ निर्मिती योजनेची रुपरेषा मांडली व झालेल्या कामाचा अहवाल सादर केला.

**पारितोषिके**

1. अधिवेशनात सादर केलेल्या शोधनिबंधापैकी श्रीनिवास जाधव यांनी लिहिलेल्या ''राजर्षि शाहू प्रेरित कामगार संघटना चळवळ : एक सैद्धांतिक आढावा''. या शीर्षकाच्या शोधनिबंधास ग.प्र. पिंपरकर पारितोषिक व कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठानचे अमर्त्य सेन पारितोषिक प्रदान करण्यात आले.

2. रविंद्र सबनीस पारितोषिक श्री. सुभाशिष गंगोपाध्याय व गुरुबचनसिंग यांच्या Avoiding Bank in Transition Economies : The Role of Risk Neutral Capital या लेखास रु. 2200/- चे पारितोषिक देण्यात आले.

3. अर्थसंवाद मधील सर्वोत्कृष्ट लेखाबद्दलचे मो.स.भावे पारितोषिक शरद शंकर जोशी, पुणे यांना त्यांच्या ''केन्सोत्तर अर्थशास्त्र'' या अर्थसंवाद जुलै - सप्टेंबर 02 व ऑक्टो. डिसेंबर-02 या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखास मिळाले.

4.2002 या वर्षातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे उत्कृष्ट ग्रंथ निर्मिती पारितोषिक पुष्पा सुभाष तायडे, वर्धा 'विदर्भातील साखर उद्योगाचे अर्थशास्त्र' या ग्रंथासाठी मिळाले.

**समारोप**

या अधिवेशनाच्या समारोपासाठी प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ स.ह. देशपांडे हे उपस्थित होते. तर विशेष अतिथी म्हणून सोनोपंत दांडेकर शिक्षण मंडळी या संस्थेचे विश्वस्त नवनीत भाई शहा व अध्यक्ष शिवराज तिवारी हे उपस्थित होते. स.ह. देशपांडे यांनी आपल्या भाषणांत आपल्या परिसरातील परिस्थितीच्या संदर्भात अर्थशास्त्राचे सैद्धांतिक चिंतन अर्थशास्त्राच्या अभ्यासकांनी करावे असे प्रतिपादन केले.

● ● ●

# मराठी अर्थशास्त्र परिषद
## अठ्ठाविसावे वार्षिक अधिवेशन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अठ्ठाविसावे वार्षिक अधिवेशन ऑक्टोबर/नोव्हेंबर 2004 मध्ये मूळजी जेठा महाविद्यालय, जळगाव येथे आयोजित होणार आहे. कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, इस्लामपूर जि. सांगली येथील प्रपाठक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख मधुकर नारायण शिंदे हे अध्यक्षस्थान भूषवितील. अधिवेशनातील चर्चासत्रांसाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

1) विनिमय दर सिद्धांत आणि व्यवहार

2) भारतीय शेतीची आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मकता

3) महाराष्ट्रातील मानवी विकासाची वास्तविकता

या विषयांची रूपरेषा 'अर्थसंवाद' च्या याच अंकात देण्यात आली आहे . चौथा विषय तत्कालिन परिस्थितीशी संबंधित असेल आणि तो परिषदेचे अध्यक्ष यथावकाश जाहीर करतील. त्या विषयावर निबंध मागविले जात नाही.

निबंध लेखकांनी जास्तीत जास्त 2,000 शब्दांत विषय मांडावयाचा असून निबंधासोबत 300 शब्दात त्याचा गोषवारा सादर करणे अनिवार्य आहे. निबंधाच्या दोन प्रती आणि सोबत गोषवारा सादर करणे जरुरीचे आहे. निबंधाच्या दोन प्रती आणि सोबत गोषवारा पाठविल्याखेरीज त्याविषयाचा निर्णय अध्यक्षांकडून पाठविला जाणार नाही.

निबंध मराठीत असावेत. ते पूर्वी कोठेही सादर केलेले वा प्रसिद्ध केलेले नसावेत. लेखकांनी आपले संपूर्ण नाव व पत्ता, महाविद्यालयाचे /विद्यापीठाचे / शैक्षणिक व अन्य संस्थांचे नाव, पत्ता हा सर्व तपशील मराठीतच देणे आवश्यक आहे.

प्रत्येक निबंध लेखकाचा केवळ एकच निबंध (स्वतंत्र वा संयुक्तपणे लिहिलेला ) अधिवेशनासाठी स्वीकारला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

31 ऑगस्ट, 2004 ही निबंध स्वीकारण्याची अंतिम तारीख असून त्यानंतर पाठविलेले निबंध स्वीकारले जाणार नाहीत. निबंध लेखकांनी आपले निबंध पुढील पत्त्यावर पाठवावेत :

**मधुकर नारायण शिंदे**
प्रपाठक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर जि.सांगली
दूरध्वनी : (02342) 221980

**सर्जेराव ठोंबरे**
कार्यवाह - खजिनदार

# निबंध लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

(1) चर्चासत्रासाठी विषयाचे जे शीर्षक जाहीर केलेले असते तेच आपल्याही निबंधाला देणे आवश्यक नाही. त्याच्या अंतर्गत एखादा उप-विषय निवडून त्या अनुषंगाने योग्य असे शीर्षक आपणास देता येईल. अधिवेशनातील चर्चासत्रांसाठी निश्चित करण्यात आलेल्या कोणत्या विषयांतर्गत आपला निबंध येतो हे स्पष्ट लिहावे.

(2) सामान्यपणे विषयाचा ऐतिहासिक आढावा घेणसाठी पूर्ण निबंधाचा उपयोग करूनये. त्यात अनेक वादग्रस्त मुद्यांचे विश्लेषण असल्यास आणि त्यातून नवीन अर्थ लावण्याचा प्रयत्न करणार असल्यासच विस्तृत आढावा घ्यावा.

(3) जी माहिती एम.ए. पर्यंतच्या पाठ्यपुस्तकांमध्ये उपलब्ध असते तिचा संदर्भ म्हणून उपयोग करावा. परंतु त्या पातळीचे विश्लेषण निबंधात असू नये; कारण ते सर्वांना माहीत असते. त्या माहितीतील सांख्यिकी संबंध शोधून त्यापलीकडे जाऊन विश्लेषणाचा प्रयत्न करणे योग्य राहील.

(4) समाजाच्या आर्थिक जीवनाचा (राष्ट्रीय / प्रादेशिक आणि आवश्यकतेनुसार स्थानिक) सामाजिक-सांस्कृतिक जीवनाशी येणारा संबंध, त्यात होणारे बदल आणि शासनाचे आर्थिक धोरण यावर निबंधात त्या त्या विषयाच्या अनुषंगाने भर असावा.

(5) निबंधात वेगवेगळ्या भागांमध्ये जे संबंध आपण दर्शवितो आणि निष्कर्ष प्रस्थापित करतो त्यांच्यात अंतर्गत सुसंगती साधण्याचा प्रयत्न केला जावा.

(6) निबंधात शक्य तो महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या 'अर्थशास्त्र परिभाषा कोश', आणि 'शासन व्यवहार कोश' यातील परिभाषेचा उपयोग करावा. त्यातील शब्दांचा अर्थ पटत नसल्यास इतर शब्दांचा उपयोग करावा. महत्त्वाच्या मराठी संज्ञांचे मूळ इंग्रजी शब्द कंसात द्यावेत.

(7) निबंधातील आकडेवारीचे संदर्भ अचूक, सुस्पष्ट, परिपूर्ण आणि मान्य पद्धतीनुसार असणे आवश्यक आहे.

(8) निबंधाची मांडणी केवळ सांख्यिकी माहितीचे संकलन करून वर्णन करणारी न ठेवता संशोधनात्मक पद्धतीची असावी. त्यामुळे निबंधाची पातळी उंचावेल. निबंध इतर भाषांतून केवळ भाषांतरित नसावेत.

(9) निबंधाच्या शेवटी संदर्भ टीपा / संदर्भ सूची प्रमाणित पद्धतीने असावी.

(10) निबंधाच्या अखेरीस गोषवारा द्यावा (300 शब्द)

निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयांची रूपरेषा

# 1. विनिमयदर सिद्धांत आणि व्यवहार

● बी. बी. कवडे, *औरंगाबाद.*
***प्राध्यापक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ***

नवीन आर्थिक धोरणाच्या काळात विनिमय दरास विशेष साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. विनिमय दर म्हणजे एका चलनाची दुसऱ्या चलनाच्या रूपात व्यक्त केलेली किंमत होय. विनिमय दराच्या विविध संकल्पना आहेत. नाममात्र विनिमय दर आणि वास्तव विनिमय दर, वायदा विनिमय दर आणि हजर विनिमय दर इत्यादि.

जगातील विविध देशांनी विविध प्रकारच्या विनिमय दर पद्धतींचा अवलंब केला आहे. तथापि, मूळ दोन प्रकारच्या विनिमय दर पद्धती आहेत. (1) नम्य किंवा लवचिक विनिमय दर पद्धती आणि (2) स्थिर विनिमय दर पद्धती. लवचिक विनिमय दर पद्धतीमध्ये दोन चलनांचा विनिमय दर हा त्याना असलेल्या मागणी व पुरवठ्याच्या साहाय्याने ठरतो. मागणी व पुरवठ्यात बदल झाल्यास, विनिमय दर बदलतो. 1947 ते 1971 या काळात विनिमय दर निश्चितीची सुवर्ण प्रतिमान पद्धती प्रचलित होती यालाच स्थिर विनिमय दर पद्धती म्हणतात. या पद्धतीमध्ये अमेरिकन डॉलरचे मूल्य सोन्याच्या विशिष्ट वजनात व्यक्त केले जाते आणि इतर चलनांची किंमत डॉलरच्या संदर्भात व्यक्त केली जाते.

या दोन मूळ अति विषम पद्धतीं मध्ये विविध विनिमय दर पद्धती अस्तित्वात आहेत. सरकता कील (Crawling Peg) विनिमय दर पद्धती, मिश्र नम्य व स्थिर विनिमय दर पद्धती, नियंत्रित तरंगता विनिमय दर पद्धती आणि मुक्त तरंगता विनिमय दर पद्धती.

चलनाची मागणी आणि पुरवठा, सापेक्ष भाववाढ, पैशाचा पुरवठा, विदेशी ऋण, राजकीय धोक्याचे प्रमाण, भविष्यातील विनिमय दरासंबंधी अपेक्षा इत्यादि अनेक घटक विनिमय दर ठरवितात. दोन प्रमुख सिद्धांतामध्ये विनिमय दर निश्चितिची यंत्रणा स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

(1) क्रयशक्ति तुल्यता सिद्धांत (2) आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंद सिद्धांत किंवा मागणी व पुरवठा सिद्धांत. क्रयशक्ति तुल्यता सिद्धांतामध्ये संतुलित विनिमय दर (व त्याच्यातील चढ-उतार) हे विविध देशातील किंमत पातळ्या व त्यांच्यातील बदलांच्या स्वरूपात सांख्यिकीय दृष्ट्या मोजण्याचा प्रयत्न केला आहे. क्रयशक्ति तुल्यता

सिद्धांत दोन स्वरूपात स्पष्ट केला आहे. (1) निरपेक्ष आणि (2) सापेक्ष.

निरपेक्ष क्रयशक्ति तुल्यता सिद्धांतामध्ये दोन देशांच्या किंमत पातळीच्या आधारे संतुलित विनिमय दर निश्चित केला जातो.

$$R = \frac{P}{P^*}$$

R = संतुलित विनिमय दर

P व P* = दोन देशातील किंमत पातळ्या

सापेक्ष क्रयशक्ति तुल्यता सिद्धांतामध्ये मूळच्या संतुलित विनिमय दरावरील भाववाढीचे परिणाम स्पष्ट केले जातात. दोन्ही स्वरुपावर अनेक विध घटकांच्या मर्यादा आहेत.

1971 मध्ये तरंगता विनिमय दर पद्धतीचा अवलंब केल्यानंतर विनिमय दर निश्चितीचा मौद्रिक दृष्टीकोन मांडण्यात आला. या दृष्टीकोनात, विनिमय दर निश्चितीसाठी पैशाच्या संख्यामान सिद्धांताची व क्रयशक्ति तुल्यता सिद्धांताची मिसळ किंवा संयोग करण्यात आला. मौद्रिक दृष्टिकोनात विनिमय दर पुढील घटकांवर अवलंबून असतो. (1) दोन देशातील सापेक्ष पैशाचा पुरवठा (2) सापेक्ष परिचलन वेग व (3) सापेक्ष वास्तव उत्पादन.

भारताच्या विनिमय दर निश्चितीच्या पद्धती तीन टप्प्यात बदललेल्या दिसून येतात.

(1) नाणेनिधीने ठरवून दिलेली सुवर्ण प्रतिमान पद्धती (1947 ते 1972)

(2) रिझर्व्ह बँकेने स्वीकारलेली चलन टोपली यंत्रणा (1974 ते 1992)

(3) नियंत्रित तरंगाची विनिमय दर पद्धती (1992 नंतर)

शोधनिबंध तयार करताना पुढील बाबींवर प्रकाश टाकता येईल.

(1) विनिमय दराची संकल्पना, प्रकार व पद्धती.

(2) लवचिक किंवा नम्य विनिमय दर पद्धतीची अनुकूल व प्रतिकूल बाजू

(3) स्थिर विनिमय दर पद्धतीची अनुकूल व प्रतिकूल बाजू

(4) या दोन पद्धतींचे तुलनात्मक लाभ व नुकसान

(5) विनिमय दर ठरविणारे घटक व विनिमय दर निर्धारणाच्या सिद्धांताचे टीकात्मक परीक्षण.

(6) भारताच्या विनिमय दर निश्चितीच्या पद्धती

(7) विविध देशांच्या प्रामुख्याने भारताच्या विनिमय दरातील प्रवृत्ती

(8) भारताच्या विनिमय दर धोरणाचे परीक्षण.

● ● ●

# भारतीय शेतीची आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मकता

● *अंजली प्रकाश कुलकर्णी , नागपूर.*
*प्राध्यापक व विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, नागपूर विद्यापीठ*

**जा**गतिकीकरणाच्या प्रक्रियेत कृषीक्षेत्राचा अंतर्भाव झाल्यापासून कृषीक्षेत्राच्या संदर्भात विविध दृष्टिकोनातून चर्चा होत असून त्यात प्रामुख्याने कृषीचे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्थान, तिचे योगदान, परकीय चलन मिळवून देण्याची किंवा आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे आव्हान स्वीकारण्याची कृषीक्षेत्राची क्षमता यांचा अंतर्भाव केला जातो. जागतिक व्यापार संघटनेच्या (WTO) सीॲटल, कॅनकून इ. च्या विविध फेऱ्यानंतर या चर्चेला नवीन दिशा मिळाली. कृषीची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धात्मकता या विषयावर सध्या अनेक व्यासपीठांवर चर्चा होत आहे.मराठी अर्थशास्त्र परिषदेने भारतीय शेतीची स्पर्धात्मकता हा समयोचित विषय अर्थशास्त्र परिषदेच्या जळगाव येथील अधिवेशनात चर्चेसाठी ठेऊन त्यावर संपूर्ण महाराष्ट्रातील अर्थशास्त्राच्या प्राध्यापकांकडून या विषयासंबंधी शोध निबंध मागविले याबद्दल परिषदेचे हार्दिक अभिनंदन.

भारतीय शेतीच्या स्पर्धात्मकतेचे दोन पैलू आहेत.

1. कृषी उत्पादनाची अंतर्गत बाजारपेठेतील स्पर्धात्मकता.
2. कृषीची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धात्मकता.

भारतीय शेतीच्या स्पर्धात्मकतेचा विचार करताना स्पर्धात्मकता ठरविणाऱ्या विविध निकषांचा येथे आढावा घेणे उचित ठरेल. तसेच अंतर्गत स्पर्धेचे निकष हे आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या निकषांपासून वेगळे आहेत कां? बाजारपेठांच्या विविध स्वरुपानुसार (उदा. पूर्ण स्पर्धेतील निकष अपूर्ण स्पर्धेतील निकष) ते बदलतात कां? तसेच संस्थात्मक रचनेनुसार त्यात बदल संभवतो कां ? ह्या सर्व बाबींचा त्यात उल्लेख होणे अपेक्षित आहे.

कृषीच्या स्पर्धात्मकतेचा विचार प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या संदर्भात केला जातो. सैद्धांतिक दृष्टीकोनातून कृषीच्या स्पर्धात्मकतेचा विचार केल्यास रिकार्डोच्या तुलनात्मक परिव्यय व परतावा दराच्या तत्त्वाचा आधार कृषी व अन्य वस्तूंच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचे समर्थन करतो. रिकार्डोच्या 'Principles of

Political Economy and Taxation' या पुस्तकातील आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधी लिहिलेल्या प्रकरणात वस्तूच्या उत्पादनपरिव्ययात केवळ भूमि, श्रम व भांडवल या तीन घटकांचा प्रामुख्याने समावेश केलेला आढळतो. परिव्ययातील व परताव्यातील भिन्नतेवर रिकार्डोच्या तुलनात्मक लाभाच्या तत्त्वाचा आधार असून त्यात विविध कर, अर्थसहाय्य, अनुदाने इत्यादि बाबींचा वस्तूच्या सापेक्ष किंमतीवर होणाऱ्या परिणामांचा उल्लेख केलेला फारसा आढळत नाही.

एखाद्या संपन्न राष्ट्राने अर्थसहाय्य, अनुदाने किंवा करमाफीचा आधार घेऊन, कृषी उत्पादनाचे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील विक्रीमूल्य जाणीवपूर्वक कमी ठेवून, इतर देशांतील स्पर्धकांना बाजूस सारुन, आंतरराष्ट्रीय बाजारपेठ काबीज केल्यास त्याचे उत्तर आपल्याला रिकार्डोच्या सिद्धांतात सापडते कां ? यातूनच पूर्ण स्पर्धेचे निकष, समानपातळीवरील आंतरराष्ट्रीय व्यापारातील स्पर्धा इत्यादि बाबींचा चर्चेच्या दृष्टिने उहापोह होणे आवश्यक ठरते. दोन देशातील कृषी उत्पादनाच्या सापेक्ष विक्री मूल्याचा आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या दृष्टिने विचार करताना कृषीला अंतर्गत संरक्षण देऊन किंवा विविध अर्थसहाय्याचा लाभ देऊन ठरणारे विक्री मूल्य किंवा कृषीच्या बाबतीत भेदभावाचे धोरण अवलंबून उद्योगांना संरक्षण देण्याची नीति अवलंबिणाऱ्या देशांनी ठरविलेले कृषीमूल्य किंवा केवळ उत्पादन घटकाच्या कार्यक्षमतेचा इष्टतम वापर करुन निश्चित झालेले कृषी विक्रीमूल्य यांची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धात्मकता समान राहील कां?

दोन देशांतील स्पर्धात्मकतेचा विचार करताना ती स्पर्धा समान पातळीवर होते कां ? याचा विचार करताना बाल्यावस्थेतील उद्योगांचे समर्थन (Infant Industry Argument) या बाबीचा विचार येथे करावा लागेल. दोन देशांची विकासाची अवस्था, विकासाची पातळी, आधारभूत संरचनेची प्रगत/अप्रगत स्थिती, एक देश वसाहतवादाच्या जोखडातून नुकताच मुक्त होऊन आंतरराष्ट्रीय व्यापारात पाउल टाकणारा तर दुसरा देश अत्याधुनिक तंत्रज्ञान, विकसित आधारभूत संरचना याच्या आधारावर कृषीमूल्य निश्चित करणारा अशी जर दोन देशांची पार्श्वभूमि असेल तर त्यांची 'समान' पातळीवर स्पर्धा होऊ शकेल का ? त्यासाठीच आंतरराष्ट्रीय संस्थात्मक सोयींची उपलबधता करुन देऊन दोन देशांना समान संधी व समान पातळीवरआंतरराष्ट्रीय व्यापार करु देण्याची गरज निर्माण झाली व त्यातून जागतिक व्यापार संघटना सारख्या संस्थांचा उदय झाला का ? ह्या सर्व बाबींचा परामर्श घेणे निबंधलेखकांकडून अपेक्षित आहे ?

**जागतिक व्यापार संघटना व भारताच्या कृषिमालाची स्पर्धात्मकता.**

गॅट 1994 हा सर्व राष्ट्रांच्या विचाराने देवाणघेवाणीने व तडजोडीने झालेला समझोता असून त्यातूनच 1995 यावर्षी जागतिक व्यापार संघटनेची स्थापना होऊन ती कार्यान्वित झाली. त्यात कृषिउत्पादनाचा व्यापार हा नवीन विषय चर्चेला आला आहे. कृषी व्यापार खुला करुन त्या दिशेने वाटचाल करण्याच्या दृष्टीने गॅट 1994 या वर्षी काही गोष्टी मान्य करण्यात आल्या. आजवरच्या आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढते प्रशुल्क, कोटा पद्धत, निर्यात वस्तू स्वस्त राखण्यासाठी निर्यातदरांना आर्थिक सहाय्य अशासारखे जे अडथळे आले ते घालविण्याचे किंवा कमी करण्याचे गॅट हे व्यासपीठ होते त्यातूनच जा.व्या.सं.ची स्थापना होऊन कृषी व्यापाराचा देखील जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत किंवा जा.व्या.सं.च्या कक्षेत समावेश केला गेला त्या दृष्टिकोनातून खालील बाबीवर निबंधलेखकांनी आपले विचार मांडावे

(1) कृषी उत्पादनाचा व्यापार

(2) उत्पादकांना मिळणारा समग्र आधार व कृषी क्षेत्रात स्पर्धा

(3) कृषी अर्थसहाय्य व कृषीची स्पर्धात्मकता.

(4) बौद्धिक स्वामित्वाचा अधिकार व कृषीची स्पर्धात्मकता.

**कृषी क्षेत्राला दिले जाणारे अर्थसहाय्य :**

कृषी क्षेत्राला दिल्या जाणाऱ्या अर्थसहाय्याचे वर्गीकरण तीन गटात केले गेले आहे. या प्रत्येक गटाला रंगानुसार वर्गीकृत करण्यात आले आहे. ज्या अर्थसहाय्यामुळे व्यापाराचा विपर्यास होत नाही किंवा कमी प्रमाणात विपर्यास होतो त्याचा 'हिरव्या गटात' समावेश असून या अर्थसहाय्याचे प्रमाण कमी करण्याची आवयकता नाही. सर्व शासकीय सेवा कार्यक्रम या गटात मोडतात. उत्पादन कमी करण्याची अट असणारे अर्थसहाय्य निळ्या रंगातील गटाचे आहे, पिवळ्या रंगातील गटात दिले जाणारे अर्थसहाय्य व्यापाराचा विपर्यास करतात व त्यातून बाजार किंमतीत वाढ होते असे गृहीत धरलेले आहे. या सर्व गटातील अर्थसहाय्यांचा भारताच्या कृषी व कृषी संदर्भातील व्यापारावर काय परिणाम होतो ह्याचे विवेचन निबंध लेखकाने करणे आवश्यक आहे.

या संदर्भात एका नवीन 'उपजीविका गटा' ची निर्मिती करण्यात आली आहे त्याचा रंग अजून निश्चित केलेला नाही. त्या गटातील राष्ट्रांना (प्रामुख्याने विकसनशील राष्ट्रांना) कृषीमालाच्या आयातीवर संख्यात्मक बंधने घालण्याची मुभा द्यावी कारण अशा आयातीमुळे छोटा व सीमांतिक, भूमिहीन कामगार, छोटे व्यापारी व कृषि आधारित उद्योग, लघु चक्की मालक यांची उपजीविकेची संधीच नाहीशी होईल त्यासाठी 2015 पर्यंत ह्या नवीन उपजीविका गटास मान्यता द्यावी अशी मागणी आहे. त्या संदर्भात देखील निबंध लेखकांनी आपले विचार व्यक्त करावे.

आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या खुलेपणात व स्पर्धात्मकतेत मूल्याव पतनामुळे विरुपण येते. त्यामुळे कृषीउत्पादनाच्या विक्रीवर परिणाम होऊ शकतो. या दृष्टिने कृषी उत्पादनाच्या बाबतीत मूल्यावपतनाच्या नोंदविल्या गेलेल्या तक्रारी व त्यासाठी उभी केलेली तक्रार निवारण यंत्रणा यांचा अभ्यास देखील या विषयाच्या संदर्भात होऊ शकतो.

**कृषीची स्पर्धात्मकता व प्रादेशिक व्यापारी गट**

विविध प्रादेशिक गटांची निर्मिती उदा. नाफ्टा, ओपेक, ईयू, युरो ही आंतरराष्ट्रीय बाजारातील कृषी उत्पादनाची स्पर्धा टीकविण्यास पोषक आहे किंवा त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारातील खुलेपणास अडथळा निर्माण होऊन स्पर्धेचे स्वरुप बदलते. प्रत्येक गटाचे गटाबाहेरील देशांशी भिन्न भिन्न प्रकारचे करार/समझोते आहे. व्यापारातील विभेदकारी वागणूकीत (Preferential Treatment)त्यामुळे वाव मिळतो. या दृष्टिने हे विविध प्रादेशिक गट व त्यांचा कृषीच्या खुल्या स्पर्धेवर होणारा परिणाम ह्यांचा विचार येथे होणे आवश्यक आहे.

**कृषी क्षेत्रातील खुली स्पर्धा व उचित व्यापार**

खुल्या व्यापाराचा पाया खुली स्पर्धा आहे. तेव्हा ही स्पर्धा सर्वत्र समान पातळीवर होणे आवश्यक

आहे. समान पातळीवरील स्पर्धेने होणारा खुला व्यापार हा उचित (फेअर, समन्यायी) व्यापार होय. समान पातळी म्हणजे कृषी कामगारांसंबंधी कामाचे तास, मजुरीचे दर, कृषीच्या व्यवस्थापनातील सारखेपणा किंवा विभिन्नता या सर्वांचा कृषी उत्पादनाच्या विक्रीमूल्यावर परिणाम होऊ शकतो. शेतीच्या असंघटित स्वरूपामुळे या क्षेत्रातील मजूरी दर कमी राहून, तसेच त्यातील कौटुंबिक स्वरुपाची उत्पादन व्यवस्था (ज्यात बालश्रमिकांची देखील महत्त्वाची भूमिका असते.) यामुळे स्पर्धेवर अनुकूल किंवा प्रतिकूल परिणाम होण्याची संभाव्यता टाळता येत नाही. कृषीमालाच्या उचित व्यापारासाठी सर्व देशांचे कायदे, धोरणे, उत्पादन प्रक्रिया व उत्पादन व्यवस्था ही संवादी, जुळणारी, समान पातळीवरची, त्यात विभेद नसणारी हवी. खुला व्यापार उचित व्यापार होण्यासाठी संवादी वातावरण असणे अनिवार्य आहे.

संवादित्वाला भर देणाऱ्या या तत्त्वाला मानव जातीच्या कल्पनाचा आणि नैतिकतेचा आधार आहे असे सांगितले जाते.

कृषीच्या स्पर्धात्मकतेचा विचार करतांना कृषी व्यापाराच्या उचिततेचा विचार होणे देखिल आवश्यक आहे.

**कृषी मालाची स्पर्धात्मकता व बौद्धिक स्वामित्वाचा अधिकार**

गॅट 1994मध्ये प्रथमच बौद्धिक स्वामित्वाच्या अधिकाराचा समावेश गेला गेला आहे. यात एकस्व (Patent) मिळवून नवे तसेच नवा टप्पा गाठणारे संशोधन करणाऱ्यांचे अधिकार शाबूत राखण्याची तरतूद आहे. कृषीसंबंधात वनस्पतींचे वैविध्य राखण्याचा व नवनवीन बियाणांचा विचार बौद्धिक स्वामित्वाच्या अधिकारात येतो. नवीन बियाणे ती शोधून काढणाऱ्यांकडून विकत घ्यावी लागतात. भारतातील शेतकरी स्वत:च्या उत्पादनातील काही भाग नव्या पेरणीसाठी राखून ठेवतो.

अमेरिकेने वनस्पतींचे वैविध्य रक्षण करणारा कायदा 1970 साली संमत केला. 1980 मध्ये त्यात सुधारणा करण्यात आली. 1978 च्या आंतरराष्ट्रीय अधिवेशनात अशा तऱ्हेचे वनस्पतीचे वैविध्य राखणाऱ्या नवीन प्रकारचे रक्षण करणारा, मसुदा तयार करण्यात आला.हा यूपॉव्ह (UPOV) करार (Union for the Protection of New Varieties of crop plants) म्हणून संबोधिला जातो.

यूपॉव्ह समझोत्याचा भारतीय शेतकऱ्यांना फटका बसेल. अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे नवीन वनस्पतींची पैदास करणाऱ्यांची मक्तेदारी वाढेल, बियाण्यांच्या किंमती वाढतील तसेंच प्रत्यक्ष शेती करताना प्रयोगातून नवीन तऱ्हेची बियाणे तयार करता यावयाचे नाही . नव्या जातीचे बियाणे कुठूनही घेण्याला, साठविण्याला, शेजारच्या शेतकऱ्यांना विकायला आज जे स्वातंत्र्य भारतीय शेतकऱ्यांना आहे ते हिरावले जाईल अशी भीति व्यक्त केली जाते.

**कृषी मालाची स्पर्धा व कृषीमालाच्या गुणवत्तेचे निकष**

या करारानुसार सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण करण्याच्या दृष्टिने कृषीमालाच्या गुणवत्तेचे निकष निश्चित करण्याचा अधिकार आयात करणाऱ्या देशास दिलेले आहेत. त्यामुळे सार्वजनिक आरोग्याची हानी होते या कारणास्तव आपल्या कृषी उत्पादनाच्या, विविध देशांमधे होणाऱ्या आयातीवर आयातदारांनी (देशांनी)

निर्बंध घातले आहेत. त्याचा विपरित परिणाम कृषीमालाच्या स्पर्धेवर झाला आहे कां ? हे निर्बंध कोणत्या वस्तूंवर आहेत या सर्वांचा अभ्यास होणे आवश्यक आहे. या संबंधित स्पर्धात्मक परिस्थितीचा लाभ लहान, मध्यम आणि मोठ्या शेतकऱ्यांना कशा रीतीने प्राप्त होउ शकेल याचा उहापोह देखील निबंध लेखकांना करता येईल.

• • •

## अर्थसंवादचा अंक मिळत नसल्यास

अर्थसंवाद आपणास नियमितपणे प्राप्त होत नसल्यास त्याबाबतची विचारणा प्रमुख संपादकांकडे करावी. आपण परिषदेचे आजीव सदस्य असल्यास किंवा वार्षिक वर्गणीदार असल्यास सदस्य क्रमांक देऊन पत्रव्यवहार प्रमुख संपादकांकडे करावा. आपला पत्ता स्पष्टपणे नमूद करावा. अंक पाठविण्याची व्यवस्था प्रमुख संपादकांमार्फत करता येईल. अर्थसंवादसाठी वर्गणी मनीऑर्डर ने पाठविल्यास आपला पत्ता सुस्पष्ट लिहावा.

मनीऑर्डरवर पत्ता नसल्यास रक्कम प्राप्त होऊन देखील अंक पाठविणे शक्य होत नाही. अंक पाठविणे सोयीचे व्हावे या दृष्टिने सहकार्य करावे. वर्गणी कार्यवाहांकडेच पाठवावी. प्रमुख संपादकांकडे पाठवू नये. पावती कार्यवाहांमार्फतच आपणास प्राप्त होऊ शकेल.

**सर्जेराव ठोंबरे**
कार्यवाह - खजिनदार

# 3. महाराष्ट्रातील मानवी विकासाची वास्तविकता

● व्ही. बी. घुगे
*माजी कुलगुरु, औरंगाबाद.*
*डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.*

**मा**नवी विकास म्हणजे मानवी भांडवल अथवा मानवी साधन संपत्तीचा विकास होय. देशाचा आर्थिक विकास व मानवी साधन संपत्तीचा विकास या दोहोत 'धन' सहसंबंध असतो. त्यामुळे आर्थिक विकास हा देशातील मानवी भांडवलाच्या विकासावर अवलंबून असतो. आर्थिक विकासातील मानवी भांडवलाचा विकास या घटकाचे महत्त्व विचारात घेऊन सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन यांनी देखील अविकसित देशांनी आपल्या मानवी भांडवलाचा विकास करण्यासाठी प्राथमिक शिक्षणावर भर द्यावा असे म्हटले. आर्थिक विकास व मानवी भांडवल या घटकांतील संबंधाचा शोध अनेक अर्थतज्ज्ञांनी घेतला. त्यामध्ये टी. डब्ल्यू. शुल्टझ, हरबीसन, टेनिसन, केन्ड्रीक, ॲब्रामोव्हीज, बेकर, बोमॅन, क्रूगर, कुन्ट, गालब्रेथ, ऑर्थर लेवीस, मॅकलेलॅन्ड वगैरेंचा समावेश होतो. इतकेच नव्हे तर ॲडम स्मिथ, व्हेबलेन, मार्शल यांनी देखील उत्पादनाच्या क्रियेतील मानवी भांडवलाचे महत्त्व विशद केले. मानवाच्या अर्जित व उपयुक्त क्षमतांचा समावेश ॲडम स्मिथने राष्ट्राच्या स्थिर भांडवलात केला. तर मार्शलने शिक्षण म्हणजे राष्ट्रीय गुंतवणुक असे मानून मनुष्यातील गुंतवणूकीला त्याने सर्वांत जास्त मौल्यवान भांडवल असे म्हटले. मानवी भांडवलातील गुंतवणुकी अभावी देशाचा आर्थिक विकास मंदावतो असे अर्थशास्त्रज्ञांनी प्रतिपादन केले. शिक्षण, ज्ञान, तंत्रज्ञान यांच्या वाढीशिवाय आणि लोकांचे कौशल्य व कार्यक्षमतेत वाढ झाल्याशिवाय भौतिक भांडवलाची उत्पादकता कमी राहते. अमर्त्य सेन यांनी शिक्षण व मानवी भांडवलाचा विकास यामध्ये 'धन' सहसंबंध असतात हे दाखवून दिले. शिक्षणाच्या प्रचार व प्रसारामुळे मानवी साधन संपत्तीचा विकास होतो व मानवी साधन संपत्तीच्या विकासामुळे राष्ट्राच्या आर्थिक विकासाला चालना मिळते हे स्पष्ट केले. याचा अर्थ देशाच्या आर्थिक विकासाचे जे अनेक घटक आहेत त्यापैकी मानवी साधन संपत्तीचा विकास हा देखील आर्थिक विकासाचा एक घटक आहे असे अमर्त्य सेन यांनी म्हटले. आर्थिक विकास हे मानवी विकासाचे फलन होय. त्यामुळे आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी मानवी भांडवलाचा विकास घडवून आणणे महत्त्वाचे ठरते. मानवी विकास म्हणजे मनुष्याची कार्यक्षमता व उत्पादनक्षमता वाढविणे होय.

मनुष्याच्या कार्यक्षमता वाढीसाठी जे विविध घटक आवश्यक असतात त्या घटकात वाढ घडवून आणून मनुष्याची कार्यक्षमता व पर्यायाने उत्पादन क्षमता वाढवून आर्थिक विकासाला चालना देणे हा मनुष्यबळ विकासाचा अंतिम उद्देश असतो. त्यासाठी मनुष्यबळातील गुंतवणूक आवश्यक असते. शिक्षण, आरोग्य, रोजगार संधीची उपलब्धता वगैरे घटकांवर केला जाणारा खर्च म्हणजे मानवी भांडवलातील गुंतवणूक होय. ही गुंतवणूक राष्ट्राच्या आर्थिक विकास प्रक्रियेला चालना देण्यासाठी, तिचा वेग वाढविण्यासाठी आवश्यक असते. म्हणून शासन संस्था, सामाजिक संस्था व इतर घटकांनी मानवी भांडवलात गुंतवणूक करणे इष्ट ठरते.

मानवी भांडवल विषयक जे सिद्धांत मांडले गेले, त्यामध्ये शिक्षण, प्रशिक्षण, आहार, आरोग्य यावरील खर्चामुळे मनुष्याची शारीरिक व बौद्धिक क्षमता वाढून कार्यक्षमता व उत्पादन क्षमता वाढते. त्याच्या उत्पन्न, वेतन व उत्पादन वाढीवर अनुकूल परिणाम घडून येतो. तसेच प्रचलित तंत्रज्ञानाचा कार्यक्षम वापर होऊन नवनवीन शोध लागतात, परिणामी विकास प्रक्रिया गतिमान होते. म्हणून मानवी भांडवल गुंतवणूक महत्त्वाची ठरते असे सिद्धान्तकर्त्यांनी म्हटले आहे.

मानवी विकास म्हणजे मूलभूत गरजांची पूर्तता करणे होय, असाही एक अर्थ अभिप्रेत आहे. मूलभूत गरजा म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा होय. या ठिकाणी मूलभूत गरजांचा व्यापक अर्थ अभिप्रेत आहे. उच्च राहणीमान मिळविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गरजांचा समावेश यामध्ये होतो. सकस व समतोल आहार, आरोग्य व आरोग्य सुविधांची उपलब्धता, शिक्षण, प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या सोयी व सुविधा, प्रशिक्षण विषयक सोयी, उत्पन्न मिळविण्यासाठी रोजगार विषयक सोयीची उपलब्धता वगैरेंचा समावेश मूलभूत गरजांमध्ये होतो. त्यामुळे मानवी कार्यक्षमता वाढून आर्थिक विकासाची प्रक्रिया गतिमान होण्यास मदत होते. मानवी विकास म्हणजे मानवी कल्याणात वाढ घडवून आणणारी प्रक्रिया होय. मानवी कल्याणात भर घालणाऱ्या घटकांशी मानवी विकासाची प्रक्रिया निगडित आहे. म्हणून निरक्षरता, रोगराई, दारिद्र्य, उच्च मृत्युदर, झोपडपट्टी यासारख्या मानवी कल्याणावर प्रतिकूल परिणाम घडवून आणणाऱ्या समस्यांचे निर्मूलन करण्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण, आरोग्य, रोजगार, सकस आहार इ. सोयी व सुविधांच्या उपलब्धतेसाठी त्यावर होणारा खर्च हा मानवी भांडवलातील गुंतवणूक ठरतो. हा खर्च शासन संस्थेने करुन समाजाला वेगवेगळ्या सामाजिक सोयी उपलब्ध करुन देणे इष्ट ठरते. मानवी विकास म्हणजे सामाजिक सुरक्षितता असाही या संकल्पनेचा एक अर्थ अभिप्रेत आहे. सामाजिक सुरक्षितता म्हणजे आर्थिक संकटकाळात मनुष्याला संरक्षणाची हमी देणे होय. त्यासाठी मनुष्याला किमान उत्पन्नाची हमी देण्यासाठी दारिद्र्य निर्मूलन, शिक्षण, आरोग्य, रोजगार, संपत्तीचे वाटप इ. सोयी व सुविधा सरकारने उपलब्ध करुन देण्याच्या धोरणाचा समावेश मानवी विकासात होतो म्हणून सामाजिक सुरक्षिततेचा पाठपुरावा सामाजिक साधनांच्याद्वारे व्हावा असे अमर्त्य सेन यांनी म्हटले. या सोयी व सुविधांच्या उपलब्धतेमुळे मनुष्याची कार्यक्षमता वाढून आर्थिक विकासाची प्रक्रिया गतिमान होण्यास मदत होते.

राष्ट्राचा आर्थिक विकास मानवी विकासावर अवलंबून असतो. त्यामुळे मानवी विकासाच्या मापनावरुन आर्थिक विकासाचे मोजमाप करता येते. म्हणून मानवी विकासाचे मापन आवश्यक ठरते. संयुक्त राष्ट्र संघाने आपल्या सन 1990च्या मानवी विकास अहवालात विशिष्ट निर्देशकांच्या आधारावर मानवी विकासाचे मोजमाप केले आहे. त्या मापनावरुन जागतिक पातळीवर प्रत्येक देशाला क्रमांक दिला गेला त्या क्रमांकावरुन त्या

देशाची मानवी विकासाची पातळी निश्चित करण्यात आली. सन 1997 मध्ये मानवी विकासाच्या संदर्भात 174 देशांमध्ये भारताचा 135वा, सन 1999 मध्ये 126 वा, तर सन 2001 या वर्षात 124वा क्रमांक लागतो.

मानवी विकास मापकांमध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर बालमृत्युदर, बालकल्याण, महिला सक्षमीकरण, आयुर्मान, शिक्षण, साक्षरता, उत्पन्न, सार्वजनिक आरोग्य, वैद्यकीय सोयींची उपलब्धता, आहार व पोषण, दारिद्रय निर्मूलन, रोजगाराच्या संधी वगैरेंचा समावेश करण्यात आला. अशा रीतीने आयुर्मान, शिक्षण व उत्पन्न हे तीन निकष मानवी विकास मापनामध्ये महत्त्वाचे मानले गेले. आंतरराष्ट्रीय पातळीवर आर्युमान मर्यादा किमान 25 वर्षे व कमाल 85 वर्षे, साक्षरता मर्यादा 0 ते 100% आणि उत्पन्न मर्यादा किमान 100 डॉलर्स व कमाल 40,000 डॉलर्स ठरविण्यात आली. तसेच मानवी विकासाचे चित्र अधिक स्पष्ट होण्यासाठी मानवी विकास निर्देशकांच्या वंचनाचा देखील विचार केला गेला. ही निर्देशके आरोग्य वंचन, शिक्षण वंचन, उत्पन्न वंचन ही होत. त्यावरुन मानवी विकासाच्या वंचनाचा निर्देशांक तयार करून मानवी विकासाचे मापन केले जाते. हा मानवी विकास वंचन निर्देशांक, वरील सोयी व सुविधांपासून लोक किती दूर व जवळ आहेत ते दर्शवितो हा निर्देशांक जेवढा शून्याच्या (0) जवळपास असेल तेवढा तो सोयी व सुविधांच्या उपलब्धतेची वाईट स्थिती दर्शवितो. तर हा निर्देशांक जेवढा 1च्या अधिक जवळ असेल तेवढा तो मानवी विकासाची चांगली पातळी दर्शवितो.

## महाराष्ट्रातील मानवी विकास

महाराष्ट्र शासनाने, केंद्र शासनाचे नियोजन मंडळ व युनोच्या सहाय्याने सन 2002 या वर्षात महाराष्ट्र राज्याचा मानवी विकास अहवाल तयार केला आहे. हा अहवाल महाराष्ट्रातील आरोग्य, शिक्षण व उत्पन्न आणि त्यांच्याशी संबंधित सोयी व सुविधांची स्थिती दर्शवितो. आर्थिक विकासाचा अंतिम उद्देश समाजाच्या राहणीमानाचा दर्जा सुधारणे हा असतो. मानवी विकास निर्देशांकावरुन राज्यातील मानवी विकासाची पातळी समजते. समाजाच्या समतोल विकासासाठी शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, रोजगार निर्मिती इ. क्षेत्रात गुंतवणूक वाढविण्याची जबाबदारी राज्याला पार पाडावी लागते व त्या गुंतवणुकीचा सर्वांना सारखाच फायदा होईल याची दक्षता घ्यावी लागते. शासकीय धोरणांचा समाजातील वेगवेगळ्या स्तरातील लोकांना किती फायदा झाला हे मानवी विकासाच्या विविध निर्देशकावरुन स्पष्ट करता येते.

मानवी विकास म्हणजे लोकांना मिळणाऱ्या संधींच्या विस्तारीकरणाची प्रक्रिया होय. त्यापैकी दीर्घ व निरोगी जीवन जगणे, शिक्षण, चांगले राहणीमान उपभोगण्याच्या संधी महत्त्वाच्या आहेत. त्या बरोबरच राजकीय स्वातंत्र्य, मानवी हक्कांचे रक्षण, स्वत्त्वाची जपणूक हे हक्कही सर्वांना मिळावेत. मानवी हक्क संरक्षणामध्ये स्त्री-पुरुष समानता, आर्थिक समानता, अन्न, पाणी, शिक्षण, आरोग्य सेवा व सुरक्षित पर्यावरण या हक्कांचा समावेश होतो.

महाराष्ट्रातील एकूण 9.37% कोटी लोकसंख्येपैकी 10.6 दशलक्ष लोक झोपडपट्टीत राहतात. म्हणजे महाराष्ट्रातील 28% नागरी लोकसंख्या झोपडपट्टीत राहते. सन 2002च्या महाराष्ट्र मानव विकास अहवालानुसार मुंबईतील 49% जनता झोपडपट्टीत राहते. हे प्रमाण कोलकत्ता 33%, चेन्नई 26%, दिल्ली 19% व बेंगलोरमध्ये 8% इतके होते. म्हणजे भारतातील मोठ्या शहरांशी तुलना करता महाराष्ट्र (मुंबई) झोपाडपट्टीत राहण्याच्या

लोकांचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

आरोग्याच्याबाबतीत महाराष्ट्रात अनारोग्यता दर हा शहरी विभागात दर हजारी 48 तर ग्रामीण भागात 52 आहे. हा दर शिक्षण, उत्पन्न,पोषण वगैरे घटकांवर अवलंबून असतो. महाराष्ट्रात न्यूनपोषितांचे प्रमाण शहरी भागात दर हजारी 54.8% तर ग्रामीण भागात 57.4% आढळते. ग्रामीण भागात 54% लोकांना पिण्याचे सुरक्षित पाणी उपलब्ध नाही. तर 25% शहरात सांडपाण्याची व्यवस्था उपलब्ध नाही. शिक्षण, आरोग्य वगैरे सोयींच्या समाजातील उपलब्धतेबाबत शासनाचे धोरण महत्त्वाची भूमिका पार पाडते. त्यामध्ये सार्वजनिक खर्चाचे योगदान महत्त्वाचे असते. महाराष्ट्र सरकारच्या एकूण खर्चाशी आरोग्यविषयक सोयींवरील खर्चाचे प्रमाण 1980 ते 1998-99 या काळात 6.5% वरुन 4.6% पर्यंत घटले आहे, त्यामुळे आरोग्य वंचन प्रमाणात वाढ होईल .

शिक्षण व साक्षरतेबाबत देखील महाराष्ट्र किमान व कमाल परिमाणामध्ये फार मोठी तफावत आढळून येते. राज्यात मुंबई जिल्हयातील सरासरी साक्षरता दर 86.62% हा कमाल आहे तर नंदुरबार जिल्हयातील 56.06% हा साक्षरता दर किमान आहे. या दोहोंतील 30.76% ही तफावत फार मोठी आहे. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या विभागात देखील साक्षरतेबाबत अशीच तफावत आढळून येते. मुंबई-56.98%, मराठवाडा - 68.95%, खानदेश- 69.82%, प. महाराष्ट्र 76.75%, विदर्भ - 77.30% व कोकणात 78.54% साक्षरता आढळते. मुंबई विभागात कमाल व मराठवाडा विभागात किमान साक्षरता आढळून येते.

सन 2002 च्या मानवी विकास अहवालानुसार महाराष्ट्रात 26.26% लोक दारिद्र्यरेषेखाली होते. मुंबई व रायगड जिल्हयात दारिद्र्याचे प्रमाण 10% आहे. ते राज्यात किमान आहे, तर खानदेशातील धुळे जिल्हयात 45.57% कमाल होते. सन 1998-99 या वर्षात सर्वात जास्त दरडोई उत्पन्न मुंबई विभागात 45,471 रुपये होते, तर सर्वात कमी दरडोई उत्पन्न धुळे व नंदुरबार जिल्ह्यात 11,789 रुपये होते. महाराष्ट्रातील विविध विभागात दरडोई उत्पन्नाच्याबाबत प्रादेशिक विषमता आढळून येते. मुंबई विभागात 45,471 रुपये, कोकण 24,483 रुपये, खानदेश 15,165 रुपये, प. महाराष्ट्र 19,707 रुपये, मराठवाडा 14,252 रुपये, तर विदर्भात 1,706 रुपये होते. सरासरी दरडोई उत्पन्न मुंबई विभागात सर्वात जास्त तर मराठवाड्यात सर्वात कमी असल्याचे दिसून येते.

दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाचे प्रमाण हा निकष विचारात घेता, सन 1997-98 या वर्षात महाराष्ट्रातील विविध विभागात दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण पुढे दर्शविले आहे. मराठवाडा 26.99%, कोकण 38.68%, खानदेश 50.85% तर प. महाराष्ट्र 19.83% कुटुंबे दारिद्र्यरेषेखाली होती. खानदेशात सर्वात जास्त तर प. महाराष्ट्रात सर्वात कमी कुटुंबे दारिद्र्यरेषेखाली होती.

अशा रीतीने महाराष्ट्राचा 2002चा मानवी विकास अहवाल शिक्षण व साक्षरता, दारिद्र्य दरडोई उत्पन्न वगैरे घटकांबाबत प्रादेशिक विषमता दर्शवितो. सन 2000 या वर्षात मुंबई व उपनगरातील मानव विकास निर्देशांक उच्च प्रतीचा आहे. खानदेशात नाशिक व जळगांव जिल्ह्यातील हा निर्देशांक मध्यमप्रतीचा तर उर्वरित धुळे व नंदूरबार जिल्ह्यात तो कमी प्रतीचा आहे. पश्चिम महाराष्ट्रात अहमदनगर व सोलापूर जिल्हे वगळता इतर सर्व जिल्हे उच्च मानव विकास निर्देशांक दर्शवितात. मराठवाडा विभागातील औरंगाबाद जिल्हा (मध्यम) वगळता इतर सर्व जिल्हे कमी प्रतीचा मानव विकास निर्देशांक दर्शवितात. विदर्भातील नागपूर (उच्च), अमरावती व वर्धा

(मध्यम) हे जिल्हे सोडून इतर सर्व जिल्हे कमी मानव विकास दर्शवितात. मराठवाडा व खानदेशातील एकही जिल्हा उच्च प्रतीचा मानव विकास निर्देशांक दर्शवित नाही. म्हणजेच महाराष्ट्रात मानव विकास निर्देशांकाबाबत देखील प्रादेशिक विषमता आढळून येते. राज्याच्या मानव विकास निर्देशांकामध्ये विषमता असल्यामुळे राज्याची आर्थिक धोरणे, विकास कार्यक्रम व साधनसामुग्रीचे वाटप याबाबत फेरविचार करुन नव्याने अग्रक्रम ठरविण्याची गरज आहे. सारख्याच उत्पन्नाच्या दोन देशांचा मानव विकास निर्देशांक भिन्न असू शकतो अथवा सारखाच मानव विकास निर्देशांक असलेल्या देशांच्या आर्थिक सुबत्तेत फरक असू शकतो. त्यामुळे मानवी विकास म्हणजे त्या समाजाचा सर्वांगिण विकास होय. समाजाच्या समतोल विकासासाठी शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, रोजगार निर्मिती वगैरे क्षेत्रात गुंतवणूक वाढविण्याची जबाबदारी राज्याला पार पाडावी लागेल व त्या गुंतवणूकीचा सर्वांना सारखाच फायदा होईल, याची दक्षता घ्यावी लागेल. आजच्या जागतिकीकरणाच्या युगात शासन संस्था आपली विविध कार्ये कमी करुन सार्वजनिक खर्चात कपात करीत आहे. त्यामुळे भविष्यात मानव विकास घडवून आणण्याची जबाबदारी खाजगी संस्था व स्वयंसेवी संस्थांनाच पार पाडावी लागेल.

अशा रीतीने मानव विकास व त्यांच्याशी संबंधित घटकांची ओळख करुन दिल्यानंतर निबंधकर्त्यांनी विषय निवडताना खालील मुद्दे लक्षात घ्यावेत व त्या अनुषंगाने इतर मुद्यांचा देखील विचार लेखकांनी करावा.

1) मानव विकास संकल्पना, व्याप्ती व उद्देश

2) मानव संसाधन व आर्थिक विकास

3) विकसनशील राष्ट्रे व मानव संसाधन विकास

4) मानव संसाधन विकास प्रक्रिया संरचना

5) मानव विकास व आरोग्य आणि आरोग्य विषयक सोयी व सुविधा

6) मानव विकास व उत्पन्न, दारिद्र्य व राहणीमान

7) मानव विकास व शिक्षण आणि शिक्षण विषयक सोयी व सुविधा

8) मानवी विकासातील शासनाची भूमिका

9) मानव विकास व खाजगी स्वयंसेवी संस्था

10) मानवी भांडवल विकास प्रक्रिया व जागतिकीकरण

11) महाराष्ट्रातील मानवी विकास निर्देशांकातील प्रादेशिक विषमता, त्याची कारणे व उपाय योजना या अनुषंगाने शोध निबंध लिहिता येतील.

## संदर्भ सूची

1) Kendrick J. W. ,(1961)"Productivity Trends in the United States."

2) जहागिरदार मुक्ता (2003) 'मानवी विकास : आशय आणि निष्पत्ती' अर्थसंवाद, खंड 27, अंक 2 जुलै-सप्टेंबर.

3) Panchmukhi, P. R. (1965) 'Educational Capital in India" I.J.E Jan. March.

4) महाराष्ट्राचा मानवी विकास अहवाल. (2002) महाराष्ट्र शासन

5) Schultz, T. W. (1961)"Educational and Economic Growth in Social Forces Influencing American Education. N. B. Henry. (ed.)

6) Schultz T. W.,(1990)"Capital Formation by Education" JPE, Dec.

7) Human Resource Development Report. (1990 )UNO

8)Human Resource Development in Maharashtra (2002) Govt. of Maharashtra.

• • •


## मराठी अर्थशास्त्र परिषद

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मराठी भाषेत प्रसिद्ध झालेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय ग्रंथास रु. 1001/- चे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक प्रतिवर्षी देण्यात येते. 1 जानेवारी ते 31 डिसेंबर 2003 या वर्षात प्रसिद्ध झालेल्या मराठीतील अर्थशास्त्रीय ग्रंथांच्या लेखकांना स्पर्धेत सहभागी होता येईल. स्पर्धेचे नियम व अटी इत्यादींसाठी सर्जेराव ठोंबरे, कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा समन्वयक, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र, विवेकानंद महाविद्यालय, समर्थ नगर, औरंगाबाद - 431001 यांच्याशी संपर्क साधावा. विहित नमुन्यातील अर्ज, सबंधित ग्रंथाच्या पाच प्रतिसह कार्यवाहांना 30 सप्टेंबर 2004 पर्यंत मिळावेत.

प्रमुख संपादक

अर्थसंवाद

# कृष्ण राज

**(18 ऑक्टोबर 1937 - 17 जानेवारी 2004)**

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल विकली या नियतकालिकाचे संपादक कृष्ण राज यांचे 17 जानेवारी 2004 रोजी निधन झाले. डिसेंबर 1966 पासून ई.पी.डब्ल्यू. या प्रसिद्ध नियतकालिकाची धुरा कृष्ण राज यांनी उत्तमरित्या सांभाळली. आंतरराष्ट्रीय स्तरावर या नियतकालिकास लोकप्रिय करण्यात कृष्ण राज यांचा मोलाचा वाटा होता. सामाजिक शास्त्रातील नवनवीन सिद्धांत आणि नव्या विचारांना चालना देण्याचे कार्य त्यांनी सातत्याने पार पाडले. गेली चार दशके या नियतकालिकाची जडणघडण कृष्ण राज यांच्या नेतृत्वाखाली झाली. भारतात या नियतकालिका सारखे दुसरे नियतकालिक आजतरी इंग्रजी भाषेत अस्तित्वात नाही. त्यांच्या मुळे प्रत्येक अंकात विविध सामाजिक आर्थिक प्रश्नांबद्दलची अर्थपूर्ण माहिती व विश्लेषण वाचकांना वाचायला मिळू लागले. राष्ट्रा समोरील सामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिस्थितीचे चिकित्सक आकलन या नियतकालिकात मांडले जावे असा कृष्णराज यांचा प्रयत्न असे. या नियतकालिकाने सामाजिक शास्त्रातील अभ्यासकांना एक उत्तम व्यासपीठ उपलब्ध करुन दिले. भारतातील विविध प्रदेशातील समस्यांचा अभ्यास करणे वाचकांना सहजरित्या शक्य होऊ लागले. कृष्ण राज यांच्या मुळे अर्थशास्त्र, वाङ्मय, समाजशास्त्र, व्यवस्थापन, राज्यशास्त्र, पर्यावरण आणि सामाजिक शास्त्रात गणिताची भूमिका अशा विविध नाविन्यपूर्ण विषयांबद्दल संशोधनपर लिखाणांचा समावेश या नियतकालिकात होऊ लागला. हे नियतकालिक म्हणूनच आगळेवेगळे आहे. प्रत्येक आठवड्याला दर्जेदार साहित्य असलेले नियतकालिक प्रकाशित करणे म्हणजे तारेवरची कसरत आहे. जगातील नामवंत ग्रंथालयांमधे इ.पी.डब्ल्यू. आवर्जून घेण्यात येतो. कृष्ण राज यांच्या संपादनामुळे हे नियतकालिक लोकप्रिय झाले. अमेरिकन इकॉनॉमिक रिव्ह्यु, दि क्वार्टरली जर्नल ऑफ इकॉनॉमिक पर्सपेक्टिव या सारख्या नियतकालिकांमधे इ.पी.डब्ल्यू. च्या लेखांचा संदर्भ आढळतो, यात संपादक म्हणून कृष्ण राज यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

नव्या सिद्धांताचे, संकल्पनांचे परीक्षण आणि नवा दृष्टिकोन या बाबींना कृष्ण राज यांनी नेहमीच प्रोत्साहन दिले. उत्कृष्ट संपादनाचे रामनाथ गोयनका पारितोषिकाचे कृष्ण राज हे मानकरी होते. या पारितोषिकाची एक लाखाहून अधिकची रक्कम कृष्ण राज यांनी इ. पी. डब्ल्यू. प्रकाशित करणाऱ्या समीक्षा न्यास या संस्थेला देणगी म्हणून दिली. विचारांचे स्वातंत्र्य, समताधिष्ठीत समाज आणि वैज्ञानिक दृष्टिकोन ही मूल्ये त्यांच्या जीवननिष्ठेचा भाग होती.

कृष्ण राज यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**विनायक देशपांडे**
प्रमुख संपादक

# पॉल मार्लर स्विझी

(1910-2004)

ख्यातनाम अर्थशास्त्रज्ञ पॉल एम. स्विझी यांचे 28 फेब्रुवारी 2004 रोजी निधन झाले. मार्क्सवादी अर्थशास्त्रज्ञ म्हणून स्विझी सुपरिचित होते. मॉरिस डॉब, माइकेल कलेकी, ऑस्कर लँगे यांच्या समवेत स्विझी यांनी प्रगत भांडवलशाही जगात मार्क्सवादी म्हणून आपला ठसा उमटविला. मार्क्सवादी परंपरेला त्यांनी निव्वळ समृद्धच केले असे नव्हे तर अर्थशास्त्राला अधिक सामाजिक आणि समर्पक आयाम देण्याचा जाणिवपूर्वक प्रयत्न केला. "Monopoly and Competition in the English Coal Trade 1550-1850" हा त्यांनी डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी या पदवी साठी सादर केलेल्या प्रबंधाचा विषय होता. अल्फ्रेड मार्शल यांच्या ''पेढ्यांचा उत्कर्ष आणि पतन '' या सिद्धांताचे सर्वसमावेशक आणि उत्कृष्ट परीक्षण पॉल एम. स्विझी यांनी या प्रबंधा द्वारे केले. हार्वर्ड येथे पॉल स्विझी यांना सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ जोसेफ शुम्पीटर यांचे मार्गदर्शन लाभले.

विकुंचित मागणी वक्राच्या साहाय्याने अल्प-जनाधिकार बाजाराचे स्पष्टीकरण पॉल स्विझी यांनी सर्वप्रथम केले. त्यांचे योगदान मौलिक स्वरूपाचे होते. Monthly Review या नियतकालिकाचे ते संस्थापक संपादक होते. The Theory of Capitalist Development (1942)", Monopoly Capital" हे त्यांचे ग्रंथ विशेष उल्लेखनीय आहेत. न्यून उपभोगवाद हा त्यांचा सिद्धांत बराच गाजला. मागणीच्या संकुचनामुळे सामाजिक उत्पन्नाचे वितरण श्रमिकांकडून भांडवलदारांकडे कशाप्रकारे हस्तांतरित होते या बाबतचे विश्लेषण या सिद्धांतात आढळते.

पॉल मार्लर स्विझी यांना भावपूर्ण श्रद्धांजली

**विनायक देशपांडे**

प्रमुख संपादक

## मराठी अर्थशास्त्र परिषद

# आजीव सदस्यांची यादी

(जानेवारी - मार्च 2003 अंकावरुन पुढे चालू)

| अ.क्र. | आजीव सदस्यांची नांवे | आजीव सदस्य क्रमांक |
|---|---|---|
| 1 | प्रा. युगंधरा देशपांडे-टोपरे, औरंगाबाद | 1022 |
| 2 | प्रा. विलास तुळशीराम गजबिये, गोरेगांव | 1023 |
| 3 | प्रा. गोपाल सदाशिव हलमारे, गोरेगांव | 1024 |
| 4 | प्रा. प्रकाश तितरे, भद्रावती | 1025 |
| 5 | प्रा. आशिष कृ. महातळे , ब्रम्हपूरी. | 1026 |
| 6 | प्रा. मनोज बी. सोनकुसरे, नेरपरसोपंत | 1027 |
| 7 | डॉ. सौ. मृणालिनी तापस, नागपूर | 1028 |
| 8 | प्रा.ज्योत्स्ना सं. देशपांडे, नागपूर | 1029 |
| 9 | श्री. चंद्रशेखर पांडुरंग गाडगीळ, पुणे | 1030 |
| 10 | श्री. भास्कर सुखदेव काळे, इस्लामपूर | 1031 |
| 11 | प्रा. बाळासाहेब पांडुरंग पाटील, इस्लामपूर | 1032 |
| 12 | प्रा. सुनिल श्रीपतराव शिंदे, पुणे | 1033 |
| 13 | डॉ. संध्या डे, नागपूर | 1034 |
| 14 | श्री. प्रमोद लाखे, नागपूर | 1035 |
| 15 | श्री मिलिंद पत्तरकिने, नागपूर | 1036 |
| 16 | प्रा. समाधान के. पाटील., पुणे. | 1037 |
| 17 | प्रा. कु. डी. व्ही. चौरे , अमरावती | 1038 |
| 18 | प्रा. बाळासाहेब पांडुरंग पाटील, इस्लामपूर. | 1039 |
| 19 | प्रा. अर्जुने दिलीप सोपानराव, जालना | 1040 |
| 20 | प्रा.श्रीरंग दिनकरराव कुडूक, कळवा | 1041 |
| 21 | प्रा. युवराज दौलत बेडीस्कर, शिरपूर | 1042 |
| 22 | दुरदना सिद्दीकी, औरंगाबाद | 1043 |
| 23 | दिगंबर सोमनाथ भिडे, कल्याण | 1044 |
| 24 | प्रा. अशोक मारुती कोरडे , काडा | 1045 |
| 25 | अभिजित केळकर, नागपूर | 1046 |

26 प्रा. बालाजी अण्णासाहेब सुखरे, कोंडाघाट 1047

27 प्रा. बी.के. धोडके, वाडा 1048

28 प्रा. विनायक नामदेव चौधरी, वाडा 1049

29 प्रा. नागनाथ विठ्ठलराव कांबळे, नांदेड 1050

30 प्रा. अतुल हंसराज साळुंके, भुवनेश्वर 1051

31. प्रा. चंद्रकांत बन्सी माळी, मानगाव 1052

32. प्रा. सुनील सखाराम बलखंडे, पोलादपूर 1053

33. डॉ. एस.पी.खामकर, उल्हासनगर 1054

34. प्रा. राजेंद्र बंडोबा पवार, सातारा 1055

35. प्रा. रासकर भिमा रंगनाथ, बीड 1056

36. प्रा. दिलीप पांडुरंग महाजन, चिखली 1057

37. प्रा. ज्ञानोबा रामकृष्ण कास्ते, लातुर 1058

38. प्रा. दिपक गुंडोपंत मनोळकर, वाशी 1059

39. प्रा. श्यामराव शेषांद्रीराव कुलकर्णी, कुळगाव 1060

40. प्रा. संजय नि. तुपे, नाशिक 1061

41. प्रा. सुग्रीव भानुदास भंडारे, आजरा 1062

42. प्रा. राजेंद्र एन. बोरसे , बुलढाणा 1063

43. प्रा. मनीषा कृ. काकडे , बारामती 1064

44. प्रा. अंजली वाचासुंदर, नागपूर 1065

45. प्रा. प्रज्ञा एम. बागडे , नागपूर 1066

46. प्रा. कल्पना ए. भजनी, नागपूर 1067


● ● ●

# अर्थसंवाद

## ( खंड 27, 2003 – 04 )

## (अ) लेखसूची

### स्वतंत्र लेख


1 अर्थशास्त्रावरील गंडांतरे 65–72

2 अर्थशास्त्रातील नोबेल–2002 152–58

3 अर्थ शब्दांची वाट पाहे 288–89

4 आरक्षणाने सामाजिक समता प्रस्थापित झाली का ? 159–66

5 कोल्हापूर जिल्हयातील व्यापारी बँकांचा ग्रामीण क्षेत्रातील शाखा विस्तार 43–64

6 कोल्हापूर जिल्हयाच्या ग्रामीण क्षेत्रातील पतपुरवठा संस्थांचे बहुसंस्थात्मक चित्र 101–27

7 जे.आर. हिक्स यांच्या विचारांचा आढावा 167–77

8 जागतिकीकरण : एक पुनरीक्षण 329–34

9 भारताच्या विदेश चलन निधीचा प्रश्न 3–33

10 भागरुपी विकल्प : संपन्नतेचा सोपान 178–81

11 भारतीय रिझर्व्ह बँकेची सेवाक्षेत्र योजना 201–27

12 महाराष्ट्र राज्याची दयनीय आर्थिक स्थिती 34–42

13 महाराष्ट्रातील संघटित वस्तू निर्माण क्षेत्र 228–62

14 राज्यांचा राजकोषीय व्यवहार 263–87

15 विविध वित्त आयोग आणि महाराष्ट्र एक आढावा. 135–41


### भाषणे


1 अर्थशास्त्राने हायजॅक केलेला 'विकास'! (जमनालाल बजाज (उपक्रम बीज भाषण स्मृती) 315–21

2. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचे राजकीय अर्थशास्त्र – 299–312

3 मानवी विकास : आशय आणि निष्पत्ती (एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ मुंबई व्याख्यान) 142–51

4 राज्य सरकारे : काही राजकोषीय प्रश्न, काही अविचार (धुळे व्याख्यानमाला धुळे) 128–34

## पारितोषिक प्राप्त लेख

1 राजर्षी शाहू प्रेरित कामगार संघटनेची चळवळ : एक सैद्धांतिक आढावा 322-28

## ग्रंथ परिक्षणे

1 दर्या खवळला, गलबत हाकारले 290-94

2 महाराष्ट्रची अर्थव्यवस्था बदलती संरचना व नवे प्रवाह 339-45

## टिपणे

1 जागतिकीकरण व भारतीय शेती 182-88

2 भारतातील स्त्रियांची रोजगार स्थिती 83-86

3 वरकड मूल्याचा विनियोग आणि कामगार वर्ग 335-37

## सांख्यिकी पुरवणी

1 प्राधान्यक्षेत्राला बँक कर्जाचे उपयोजन 95-96

2. कर थकबाकी आणि राजकोषीय स्थिती 287

## अधिवेशन वृत्तांत

1 अर्थसंवाद : वार्षिक अहवाल 2002-03 365-68

2 कार्यवाहांचा अहवाल 369-71

3 खाजगीकरण व निर्गुंतवणुकीकरण 353-56

4 छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे आर्थिक व सामाजिक विचार 357-64

5 माहितीचे अर्थशास्त्र 346-52

## प्रादेशिक अधिवेशन वृत्तांत

1 मराठवाडा अर्थशास्त्र परिषद वृत्तांत 87-89

## विषयांची रुपरेषा

1 भारतीय शेतीची आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मकता 376-80

2 महाराष्ट्रातील मानवी विकासाची वास्तविकता 381-86

3 विनिमय दर सिद्धांत आणि व्यवहार 374-75

## संकीर्ण

1 कृषी उत्पादनातील बदल (मराठवाडा) 189-95
2 कृष्ण राज - श्रद्धांजली 387
3 पॉल मार्लर स्विझी - श्रद्धांजली 388
4 बचतगट आणि स्त्रिया- शोध व बोध 77-82
5 भारतातील निवडक अर्थशास्त्रीय संस्थांची संकेत स्थळे 92-94
5 मराठी अर्थशास्त्र परिषद रौप्य महोत्सवी निधी- देणगीदार 2001-2002 90-91
6 मराठी अर्थशास्त्र परिषद आजीव सदस्यांची यादी 389-90
7 महाराष्ट्र सिंचन परिषदेत मराठी अर्थशास्त्र परिषदेचा सहभाग 295
8 लोकसंख्या महत्त्वाची (आशयघन) आहे काय ? (कवडसा) 73-76
9 हार्दिक अभिनंदन - वसंत जुगळे 296

# (आ) लेखक सूची

## स्वतंत्र लेख

1 कुलकर्णी ,श्री.प्र. 167-77
2 खंदारे ,विलास 135-41
3 खेर, सी.पं. 65-72, 263-87
4 खोबरे, शिवकुमार 288-89
5 गायकवाड, माधव 159-66
6 जोशी ,शरद शंकर 3-33
7 दोशी , रवीन्द्र 43-64, 101-27, 201-27
8 बुरंगे ,एल.जी. 228-62
9 माने ,शि.ना. 73-76,178-81, 329-34
10 म्हस्के ,बी.एस. 34-4 2
11 वर्तक, अनिल 152-58

## भाषणे

1 कुलकर्णी ,दिलीप
2 जगदाळे ,सूर्यकांत 299-314
3 जहागिरदार, मुक्ता 142-51
4 सप्रे ,नी. भा. 128-34

## पारितोषिक प्राप्त लेख

1 जाधव, श्रीनिवास बी. 322-28

## ग्रंथ परीक्षण

1 पडोशी ,अ.रा.339-45
2 माने, शि.ना. 290-94

## टिपणे

1 जोशी, वसुधा 335-38
2 बियाणी, प्रमोद 83-86
3. शिंदे ,एम. एन. 182-88

## सांख्यिकी पुरवणी

1 देशपांडे ,स्नेहा 95-96

## अधिवेशन वृत्तांत

1 कुलकर्णी, अंजली 346-52
2 जुगळे ,वसंत 353-56
3 ठोंबरे ,सर्जेराव 369-71
4 देशपांडे ,विनायक 346-52, 365-68
5 दोशी ,रवीन्द्र 353-56
6 शिंदे, एम.एन. 357-64

## प्रादेशिक अधिवेशन वृत्तांत

1 वाकोडकर, उत्तम दे. 87-89

## विषयांची रुपरेषा

1 कवडे ,बी. बी. 374-75
2 कुलकर्णी ,अंजली 376-80
3 घुगे व्ही. बी. 381-86

## संकीर्ण

1 जोशी ,वसुधा 77-82
2 टकले ,एस.आर. 189-95
3 देशपांडे, विनायक 92 -94, 387,389
4 माने, शि.ना. 73-76

## (इ) अंकांचा तपशील

| अंक | तिमाही | पृष्ठे |
|---|---|---|
| 1 | एप्रिल-जून,2003 | 1-96 |
| 2 | जुलै-सप्टेंबर,2003 | 99-196 |
| 3 | ऑक्टोबर-डिसेंबर,2003 | 199-296 |
| 4 | जानेवारी-मार्च, 2004 | 299- 394 |


● ● ●

हे त्रैमासिक सर्जेराव आसाराम ठोंबरे यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता श्रीनिवास मुद्रणालय, धंतोली नागपूर-440012 येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, 42 रंजन 1 सोसायटी एन-9 सिडको, औरंगाबाद 431003 येथे प्रसिद्ध केले.